# संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम)

## वार्षिक अहवाल २०१८–१९



# ‘संग्राम’ची कार्ये

१) वेश्या अन्याय मुक्ती परिषद

२) विद्रोही महिला मंच

३) मित्रा

४) मुस्कान

५) नजरिया

**कार्यक्रम**

१) टार्गेटेड इंटरव्हेन्शन्स (एचआयव्ही एडस् प्रतिबंध काळजी व औषधोपचार)

२) ग्रामीण पातळीवरील एचआयव्ही एडस् जनजागृती व महिलांवरील होणाऱ्या हिंसेविरोधी अभियान

३) आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प

४) ग्रामीण भागातील मुस्लिम महिलांकरिता आरोग्य शिक्षणाबाबत जनजागृती

५) सेक्स वर्कर्सच्या मुला-मुलींकरिता शिकवणी वर्ग, स्वाध्यायन आणि मित्रा हॉस्टेल

# प्रस्तावना

समाजापासून दूर, निराधार तसेच अन्याय, अत्याचाराच्या दबावाखाली जीवन कंठणाऱ्या घटकांसाठी 'दुरितांचे तिमिर जावो...' या संतांनी सांगितलेली उक्ती साध्य करण्यासाठी अविरतपणे कार्य करणारी संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम). रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या या संस्थेने कित्येकांचे जीवन प्रकाशमय केले असून, अनेक कुटुंबांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे.

'संग्राम' संस्थेने प्रारंभी एचआयव्ही एडस् प्रतिबंध, काळजी आणि बाधितांच्या आजाराची काळजी यावर काम सुरू केले. धंदा करणाऱ्या महिलांना धोके सांगणे, आरोग्याची काळजी कशी घ्यायची, एचआयव्ही एडस् कशाने होतो आणि त्याचे दुष्परिणाम काय आहेत, याबाबत प्रारंभी जागृतीस केली. हे काम करीत असताना अन्य गोष्टीही कार्यकर्त्यांच्या निदर्शनास येऊ लागल्या. त्यात अन्याय, अत्याचार, कलंक, भेदभाव आदींचा समावेश आहे. दबाव, अन्याय, अत्याचारातून होणाऱ्या संबंधाद्वारे एचआयव्हीचे प्रमाण वाढल्याची गंभीर बाब समोर आली. याला कुठेतरी प्रतिबंध घालावयाचा असेल, तर संघटना बांधणी महत्त्वाची असल्याचे मानून त्यासाठी काम करणाऱ्यास सुरुवात केली. यातूनच प्रारंभी वेश्या अन्यायमुक्ती परिषद या संघटनेची बांधणी केली. त्यानंतर ग्रामीण महिलांबरोबर विद्रोही महिला मंच, समलिंगी संबंधातील पुरुष, ट्रान्सजेंडर्स यांच्यासाठी 'मुस्कान', वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या मुला-मुलींसाठीची 'मित्रा' संघटना, एचआयव्हीबरोबर जगणाऱ्या सेक्स वर्करांची 'वँप प्लस' संघटना तसेच मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी 'नजरिया'ची बांधणी केली.

या संघटनांच्या माध्यमातून या घटकांमध्ये प्रत्यक्ष जाऊन जनजागृती, समाजप्रबोधन, मदत तसेच न्याय मिळवून देण्यासाठी दुवा म्हणून कार्यक्रम राबविले जात आहेत. तसेच 'कसम' ह्या माहिती केंद्रामार्फत 'संग्राम'ने समाजाच्या परिघाबाहेर राहणाऱ्या समाजघटकांच्या विविध समस्यांवर संशोधन करून माहिती संकलन, प्रसारण, प्रबोधन आदी कामे सुरू आहेत. याचबरोबर शासकीय सहाय्यातून टार्गेटेड इंटरव्हेन्शन (टीआय) हे महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटी यांच्यामार्फत, तर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया 'संग्राम'मार्फत राबविली जात आहे.

'संग्राम'मार्फत वरील सर्व संघटना विविध पातळ्यांवर कार्य करीत असून, ते त्यांचा अहवाल लेखी स्वरूपात देतात. यावर्षी मात्र सर्व संघटना व कार्यक्रमात आलेले प्रत्यक्ष अनुभव व केलेले कार्य यांची माहिती संदर्भासह वार्षिक अहवालात दिली आहे. त्यामुळे 'संग्राम'चे कार्य किती आणि कोणत्याही पातळीवर सुरू असून, त्यात आव्हाने, यश आदी बाबी स्पष्ट होतात.

सांगली, सातारा, कोल्हापूर, बेळगाव, बागलकोट या जिल्ह्यात कार्य करणारी संघटना दुरितांचे जीवन उजळविण्याचे काम करीत आहे. ज्या घटकांत राहून काम करणे सोपे नाही, त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आधार देणे, न्याय मिळवून देणे, औषधोपचारासाठी सहाय्य करणे, वादातून दुभंगलेला संसार उभा करणे तसेच त्यांच्या मुलांच्या भवितव्याचा मार्ग सुलभ करून देणे आदी कार्य करीत संस्था व संघटना मदतीचा हात देत आहे.

■■■

# ‘संग्राम’च्या कार्याचा रौप्यमहोत्सव

समाजाच्या प्रचलित वैचारिक, पारंपरिक चौकटीतून पुढे सरकून स्वत:वर होणारा अन्याय, अत्याचार सहन न करता त्यावर संघटनेमार्फत तोडगा काढण्याची पद्धत ‘संग्राम’ने सर्वच संघटनांच्या बांधणीतून पुढे आणली. स्वत:च्या प्रश्नासाठी स्वत:च उभे राहणे. अन्याय, अत्याचार सहन न करणे. हिंसा रोखणे. आरोग्याच्या प्रश्नांना वेळीच ओळखून त्यावर लगेचच तोडगा काढणे. कम्युनिटीची गरज ओळखून त्या गरजांना प्रतिसाद देताना कम्युनिटीचा सहभाग घेणे. ज्याच्याकरिता काम करणे आवश्यक आहे. त्या समाजघटकाबरोबर बैठका घेऊन प्रशिक्षण आयोजित करून, प्रसंगी बाहेरून रिसोर्स व्यक्तींना बोलवून कार्यकर्त्यांच्या कलाकौशल्यात वाढ करणे, ही ‘संग्राम’ची कार्यपद्धती. एच.आय.व्ही./एड्स प्रतिबंध, काळजी आणि आधाराच्या कामाने सुरुवात झालेल्या ‘संग्राम’च्या कार्यात प्रचलित समाजाच्या परिघावर राहणाऱ्या सामाजातील सेक्स वर्कर्स, त्यांची मुले-मुली, समलिंगी संबंधातील स्त्री-पुरुष, ट्रान्सजेंडर्स, वंचित घटकातील व्यक्ती, ग्रामीण स्त्री-पुरुष, युवक-युवती, मुस्लिम समाजातील महिला यांच्या संघटना बांधणीतून कलंक, भेदभाव, हिंसा, अन्याय, अत्याचाराविरोधात विशेष अभियान राबविले जाते. ‘संग्राम’ने स्थानिक, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या सर्व समाजघटकांच्या आवाजाला वारंवार व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. आरोग्य यंत्रणेपासून सामाजिक योजना, न्यायव्यवस्था, ध्येयधोरणे बनविणाऱ्या सहकारी यंत्रणाबरोबर संघटना कायमच प्रबोधन करत आली आहे.

‘संग्राम’च्या या कार्याला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. हे ‘संग्राम’च्या कामाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. त्याचे औचित्य साधून ‘संग्राम’च्या संघटनांनी आपापल्या कार्यक्षेत्रात कार्यक्रम घेतले. वेश्या अन्यायमुक्ती परिषद (वँप), विद्रोही महिला मंच मुस्कान, नजरिया, मित्रा या संघटनांबरोबर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील कार्यकर्ते, कसम प्रकल्पातील कार्यकर्ते या सर्वांनी एकत्रित बैठक घेऊन ‘संग्राम’च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्याचे ठरविले व त्यानुसार सर्व कार्यक्षेत्रांत वेगवेगळ्या कार्यक्रमांची आखणी करून कार्यक्रमही घेतले. ‘वँप’मार्फत मिरज, सांगली, कराड, सातारा, उत्तर कर्नाटक आदी ठिकाणी गल्लीमध्ये विद्युतरोषणाई केली. रंगरंगोटी केली. गल्लीतल्या रस्त्यावर रांगोळी स्वरूपात ‘संग्राम’च्या सर्व संघटनांचे लोगोसोबत माहितीही रेखाटली. प्रत्येक संघटनेचा एक एक लोगो रांगोळीतून प्रकट केला. गल्लीत लावण्यात आलेल्या संघटनेच्या/संस्थेच्या बोर्डला फुलांनी सजविले गेले. गल्लीतल्या सर्वजणींना एकत्र बोलावून ‘संग्राम’ व संघटनेच्या कामाची सविस्तर माहिती दिली. यातून ‘संग्राम’बरोबरच्या कामाच्या अनुभावला नव्याने उजाळा मिळाला. प्रत्येक ठिकाणच्या कार्यक्रमावेळी जिलेबी, पेढे यांबरोबरच ‘संग्राम रौप्यमहोत्सवी २५ वर्षे ’ या नावाने केकदेखील कापण्यात आला. सलग दोन-तीन आठवडे चाललेल्या या कार्यक्रमात पणत्या व मेणबत्या लावून एच.आय.व्ही.मुळे मृत्यू पावलेल्या तसेच संघटनेच्या उभारणीत हातभार लावून मृत्यू पावलेल्या प्रत्येक कार्यकर्तीला श्रद्धांजली वाहण्यात आली. सर्व ठिकाणी लाल रंगाच्या साड्या घालून ठरावीक दिवशी नाचून-गाऊन जल्लोषदेखील केला. या सर्व कार्यक्रमांकरिता स्थानिक पत्रकार, प्रतिष्ठित व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, सरकारी तसेच निमसरकारी पातळीवरील काम करणारे अधिकारी यांना निमंत्रित करून त्यांनाही कार्यक्रमात सहभागी करण्यात आले होते.

‘मुस्कान’मार्फत सर्व ठिकाणी असणाऱ्या कार्यालयांमध्ये रंगरंगोटी केली होती. पताका, भित्तिपत्रके याचबरोबर रांगोळीदेखील काढण्यात आली होती. सर्व कार्यक्रमात एमएसएम व ट्रान्सजेडर्स कम्युनिटीच्या

सदस्यांना सहभागी करून आनंद व्यक्त करण्यात आला. सन २००० पासून 'संग्राम'मार्फत 'मुस्कान'ची बांधणी कशी केली गेली, हे कार्यकर्त्यांना मनोगतातून स्पष्ट केले. एच.आय.व्ही.मुळे मृत्यू पावलेल्या व संघटनेला हातभार लावणाऱ्या मृत व्यक्तींच्या आठवणींना उजाळा देण्याच्या दृष्टीने मेणबत्ती पेटवून श्रद्धांजली वाहण्यात आल्या. याचबरोबर ठरावीक दिवशी पारंपरिक लावणी सादर करण्याचा कार्यक्रम आयोजित केला. प्रत्येक कार्यक्रमास केक कापला.

सांगली, कराड, सातारा, कोल्हापूर, इचलकरंजी, मिरज येथील एमएसएम व ट्रॉन्सजेंडर्सना एकत्रित केले गेले. त्यांच्या त्यांच्या ठिकाणी कार्यक्रम घेतले गेले. विशेषकरून 'संग्राम'च्या मीना मॅडम, शीतल प्रताप आष्टी, आरती पै मॅडम, शशिकांत माने, शांतिलाल काळे यांचेदेखील त्यांनी दिलेल्या पाठिंब्याच्या मदतीचे आणि मार्गदर्शनाचे 'मुस्कान'मार्फत कौतुक केले गेले.

नजरिया व विद्रोही महिला मंचमार्फत सर्व तालुक्यांच्या ठिकाणी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमांचे नियोजन केले होते. यामध्ये शिराळा येथील पंचायत समिती हॉल, वाळवा तालुक्यात इस्लामपूर येथील 'संग्राम'च्या मोफत आरोग्य सल्ला व मार्गदर्शक केंद्रामध्ये पलूस, तासगाव, जत, कवठेमहंकाळ, आटपाडी येथेही 'संग्राम'च्या केंद्रात, तर मिरजमध्ये आमदार सभागृह, कडेगावमध्ये पंचायत समिती हॉल, विटा येथील एका मंगल कार्यालयात हे कार्यक्रम घेतले गेले. प्रत्येक ठिकाणी सरपंच, पंचायत समिती सदस्य, पॅरालिगल व्हॉलंटियर्स, वकील, वैद्यकीय अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी, बी.डी.ओ. महिला संरक्षण अधिकारी, स्थानिक पोलिस स्टेशनचा स्टाफ, शिक्षकवर्ग, पत्रकार, आशा वर्कर्स, बचत गटाच्या महिला, 'संग्राम' मैत्रिणी, ग्रामएकता समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. 'संग्राम'बरोबर गेल्या अनेक वर्षांपासून जोडले गेलेल्या एच.आय.व्ही.बरोबर जगणाऱ्या महिला, पुरुष तसेच जोडप्यांचा यात विशेष सहभाग होता. त्यांच्या हस्ते केक कापण्यात आला.

या कार्यक्रमदरम्यान 'संग्राम'ने आतापर्यंत आरोग्यक्षेत्रात तसेच मानवी अधिकाराला धरून हक्क आणि न्याय मिळण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील स्त्री-पुरुष, युवक-युवतींबरोबर अभियान राबविले. त्या सर्वांच्या बरोबरीने विद्रोही महिला मंचमार्फत संघटना उभारली. तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहोचण्याचे काम केले. त्याची माहिती दिली. त्याच जोडीला महिलांवर होणाऱ्या हिंसेविरोधी उभे राहण्याच्या दृष्टीने कायदेविषयक माहितीपण दिली. उपस्थितांमधील व्यक्तींनी 'संग्राम'च्या कामाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी 'संग्राम'च्या तालुकापातळीवर कार्यरत असणाऱ्या सल्ला व मार्गदर्शन केंद्राची रंगरंगोटी करून पताका लावल्या होत्या. भव्य मंडप घालून रांगोळीच्या माध्यमातून '२५ वर्षे रौप्यमहोत्सव' असे लिहिले होते. सर्व कार्यक्रमामध्ये महिलांचा मोठा सहभाग होता. विविध ठिकाणी विद्रोही महिला मंचमार्फत 'संग्राम रौप्यमहोत्सवी २५ वे वर्ष' असे लिहिलेले बॅनर्स लावले होते. परिणामी, 'संग्राम'च्या अनेक वर्षांपासूनच्या ग्रामीण पातळीवरील अभियानाची पूर्वओळख तसेच संघटना बळकटीसाठी उपयोग झाला.

मित्रा संघटनेने 'वँप', 'मुस्कान'बरोबर सर्व कार्यक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदविला. तसेच सी.बी.एम. प्रकल्पातील कार्यकर्ते तसेच 'कसम' प्रकल्पातील कार्यकर्त्यांनीही विविध पातळींवरील कार्यक्रमात सहभागी होऊन 'संग्राम'च्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा आनंद द्विगुणीत केला.

■■■

# रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त...













# लक्षगट प्रकल्प (टारगेटेड इंटरव्हेन्शन–टीआय)

**(सांगली वॅंप, मिरज वॅंप, संग्राम सांगली, संग्राम सातारा)**

राज्य शासनांतर्गत (महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण) टीआय (टारगेटेड इंटरव्हेन्शन) हा कार्यक्रम आम्ही सांगली, मिरज, कराड व सातारा ह्या ठिकाणी सेक्स वर्कर्स (एफएसडब्ल्यू), एमएसएम व ट्रान्सजेंडर्स यांच्यामध्ये गेली अनेक वर्षे राबवित आहोत.

सुरुवातीला जेव्हा 'संग्राम' एफएसडब्ल्यू, एमएसएम व ट्रान्सजेंडर्स यांच्यामध्ये काम करू लागले, त्यावेळेस असे निरीक्षणास आले की, हे लोक व त्यांचे आरोग्य जास्त धोक्यात आहेत. त्यांच्यामध्ये आरोग्याच्या समस्या व प्रश्न आहेत. 'टीआय' कार्यक्रम महाराष्ट्र शासनाचा प्रकल्प असून, तो वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, पुरुष, ट्रान्सजेंडर्स यांच्यामध्ये अनेक वर्षे राबविला जात आहे. स्वत:च्या आरोग्याविषयी जागृती करण्याविषयी हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात एच.आय.व्ही. व गुप्तरोग यांचा संसर्ग होऊ नये. आरोग्य चांगले रहावे व जर हा आजार झाला असेल, तर त्याची काळजी कशी घ्यावी यावर भर देण्यात आला आहे. त्याला प्रतिबंध कसा करावा, त्याचबरोबर निरोधबाबत योग्य पद्धतीने माहिती दिली जाते. महाराष्ट्र शासनाच्या या कार्यक्रमांतर्गत ज्या नवीन मुली धंद्यात येतात, त्यांच्यासाठी 'टीआय'च्या सेवासुविधा आहेत. त्या त्यांच्यापर्यंत पोहोचविल्या जातात. या कार्यक्रमामध्ये तीन महिन्यांतून एकदा रेग्युलर मेडिकल चेकअप (आरएमसी) केले जाते. आरएमसी म्हणजे आतून तपासणी करणे. यामध्ये महिलेच्या गुप्तांगावर कोठे जखम आहे का?, लघवी करताना जळजळ होते का? अंगावरून पांढरे पाणी जाते का? या बाबी तपासल्या जातात. ट्रान्सजेंडरच्या गुदद्वाराला जखम आहे का? किंवा लिंगातून ओटीपोटात दुखणे, पिशवीला सूज येणे, आदी लक्षणे बघतिली जातात. 'आरएमसी'साठी आमच्या सर्व 'टीआय'मध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हा कार्यक्रम सामुदायिक असल्यामुळे आम्ही समाजातील लोकांना घेऊन हा कार्यक्रम राबवितो.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेंतर्गत चालविण्यात येणाऱ्या टीआय कार्यक्रमांतर्गत सर्व टीआय, एफएसडब्ल्यू व ट्रान्सजेंडर्स यांची सहा महिन्यांत एकदा व वर्षातून दोनदा तपासणी केली जाते. सुरुवातीला जेव्हा आम्ही त्यांना आयसीटीसी तपासणी (ऐच्छिक) का करायची व त्याचे फायदे काय आहेत, याची सर्व माहिती एफएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू व ट्रान्सजेंडर्स यांना समजावून सांगितली. त्यानंतर स्त्रियांना समलिंगी पुरुष व ट्रान्सजेंडर्स यांना त्यांचे महत्त्व पटले व हळूहळू आपणहून तपासणीसाठी ते येऊ लागले. आम्ही अगोदर कौन्सिलर, आऊटरिच व पीअर यांच्यासोबत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तपासणी कुठे घ्यायची याचे नियोजन करून सर्व एफएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू व ट्रान्सजेंडर्स यांना सांगून ज्या त्या हॉटस्पॉटवर येण्यास सांगतो. काहीजण न सांगताही येऊ लागले. तपासणी करण्यासाठी ज्या एफएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू व ट्रान्सजेंडर्स यांना वाचता, लिहिता येत नाही, त्या मागील सहा महिन्यांचा अहवाल घेऊन आणून दाखवितात आणि कधी यायचं हेही विचारतात. तपासणीचं हे आमचं एक मोठं यश आहे की त्यांना आपल्या आरोग्याचे महत्त्व कळाले. पॉझिटिव्ह लोकांच्या एचआयव्हीची तपासणी होत नाही. मग आम्ही ठरवले की, फक्त त्या लोकांच्या सिंफिलीसची तपासणी करायची. त्यासाठी आम्ही शिबाराचे नियोजन करून शिबिर घेतले व सिंफिलीसची तपासणी केले. एकूण ८३ सिंफिलीसच्या तपासणी झाल्या. नियमित तपासणी, प्रतिबंधात्मक औषधोपचार, गुप्तरोग तपासणी, ऐच्छिक एचआयव्हीची रक्त तपासणी सर्व टीआयचे आरएमसी, क्लिनिक, पीटी, एसटीआय व आयसीटीसीची माहिती पुढील पानावर आहे.

| | एकूण क्लिनिक | आरएमसी | पीटी | एसटीआय |
|---|---|---|---|---|
| वँप एफएसडब्ल्यू टीआय ९०० (सांगली) | २४७२ | २३७९ | ८७ | ६ |
| वँप मिरज एफएसडब्ल्यू टीआय- ६०० | २४६३ | २३७९ | ६३ | २१ |
| संग्राम टीआय सीसी सातारा- ६०० | २८०५ | १७६९ | ३६ | ०० |
| संग्राम टीआय एमएसएम/ टी.जी./टीसी, टीआय ५००- सांगली | १६७४ | १६१३ | ४५ | १६ |
| **एकूण** | **८४१४** | **८१४०** | **२३१** | **४३** |

कमीत कमी सहा महिन्यांपासून एकदा एचआयव्ही आणि गुप्तरोगाच्या तपासणीमध्ये रक्ताची तपासणी करतो. एकदा घेतलेल्या रक्तामधूनच दोन्ही तपासण्या केल्या जातात. जे सकारात्मक लोक आहेत, त्यांची गुप्तरोगाचीसुद्धा तपासणी करतो. सहा महिन्यांतून सीडी फोरची तपासणी करतो.

| | एकूण ऐच्छिक तपासणी | सिंफिलीसची तपासणी | एकूण तपासणी | कौन्सिलिंग |
|---|---|---|---|---|
| वँप एफएसडब्ल्यू टीआय ९०० (सांगली) | ११९९ | ११९९ | | |
| वँप एफएसडब्ल्यू टीआय ६०० (निरज) | १०४८ | १०४५ | | २०७५ |
| सबग्राम एमएसएम/ टीजी/सीसीटीआय-५०० | ८२८ | ८२८ | ८०९ | |
| संग्राम एफएसडब्ल्यू टीजी सीसीटीआय-७०० | १४६७ | | | १५४३ |

पीअर एज्युकेटर हे सेक्स वर्कर्स, एमएसएम व टीजी यांच्यासोबत एकास एक माहिती तसेच गट चर्चा करून त्यांना आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यायची, तसेच आपल्या टीआयमध्ये क्लिनिकमध्ये ऐच्छिक तपासणीला कधी कधी यायचे या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या जातात. फिल्डमध्ये निरोधचे प्रात्यक्षिक

करून दाखविले जाते, तसेच निरोधचे महत्त्व सांगितले जाते. संबंध ठेवताना निरोध कसा वापरायचा आणि त्याचे फायदे तसेच संबंधावेळी निरोध नाही वापरला, तर कोणकोणते संसर्गजन्य रोग होऊ शकतात, याचीही माहिती सांगितली जाते. तसेच पीअर एज्युकेटर, फिल्डवरती सर्वांना भेटून प्रत्येकाची निरोधची मागणी किती आहे? हे विचारून कंडोम गॅप ॲनालिसिस करून गरजेप्रमाणे निरोध दिले जाते. जर एखादेवेळेस निरोध फाटल्यास ते आम्हाला येऊन सांगतात. त्यानंतर आम्ही त्यांना सिव्हिल हॉस्पिटलला घेऊन जातो आणि त्यांना योग्य ते औषधोपचार मिळवून देतो.

मागील वर्षामध्ये एचआयव्हीची तपासणी वँप एफएसडब्ल्यू व टीआय पूर्ण वर्षामध्ये आलेल्या पॉझिटिव्ह लोकांचा अहवाल.

| | **एकूण पॉझिटिव्ह** | **प्री एआरटी** | **ऑन एआरटी** |
|---|---|---|---|
| वँप एफएसडब्ल्यू टीआय-९०० सांगली | ०० | ०० | ०० |
| वँप एफएसडब्ल्यू टीआय-६०० मिरज | ०२ | ०१ | ०१ |
| संग्राम सीसी टीआय-७०० (सातारा) | ०० | ०० | ०० |
| संग्राम एमएसएम/टीजी टीआय-५०० (सांगली) | ०१ | ०१ | ०१ |

गेल्या अनेक वर्षांमधील पॉझिटिव्ह लोकांची आकडेवारी आणि २०१८-१९ मध्ये पॉझिटिव्ह आलेल्या लोकांची आकडेवारी यामध्ये तुलना केली असताना पॉझिटिव्हचे प्रमाण कमी आलेले आहे.

पॉझिटिव्ह लोकांचे प्रमाण कमी येण्याचे कारण म्हणजे पीअर एज्युकेटर व ओ.आर.डब्ल्यू. यांनी फिल्डवर सर्वांना निरोधची माहिती व्यवस्थित पोहोचवली व निरोधचे प्रात्यक्षिक करून दिले. यामुळे सर्वांना निरोधबद्दल माहिती मिळाली. तो कसा वापरावा याचीदेखील माहिती दिली, तसेच प्रत्येक एका कस्टमरला एकच निरोध वापरावा याचीदेखील माहिती दिली. त्यामुळे निरोध फाटण्याचे प्रमाणदेखील कमी झाले. ज्या लोकांना लिहिता-वाचता येत नाही, त्यांना निरोधची अंतिम तारीख किंवा निरोध चांगला आहे की खराब झाला आहे, हे कसे ओळखावे याचीही माहिती दिली.

### मागील वर्षातील निरोधची गरज व त्याचे वाटप

| | निरोध मागणी | निरोध वाटप |
|---|---|---|
| वँप एफएसडब्ल्यू टीआय-९०० सांगली | ११,४२,३०८ | १०,७३,६५४ |
| वँप, एफएसडब्ल्यू टीआय-६०० मिरज | ४,८३,९९२ | ४,१३,८५३ |
| संग्राम सीसी टीआय -७०० (सातारा) | ८,२२,७३२ | ७,६९,९९० |
| संग्राम एमएसएम/टीजी सीसीटीआय-५०० सांगली | २,९७,३९४ | २,७०,५२७ |

एचआयव्ही तपासणी केल्यानंतर जी व्यक्ती पॉझिटिव्ह आली होती, तिला समजावून सांगून त्या व्यक्तीसोबत चर्चा करून तसेच त्या व्यक्तीशी योग्य तो सल्लामसलत करून त्यास असे सांगितले जाते की, जरी एचआयव्ही आजार न बरा होणारा असला तरी योग्य औषधोपचार व योग्य आहार घेतल्यास ती व्यक्ती इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणे जीवन जगू शकते, तसेच त्यांना एआरटी (अँटी रिटेरो व्हायरल थेरपी)ची माहिती देऊन त्यांना त्याचे महत्त्व पटवून दिले जाते. नंतर त्या व्यक्तीस सरकारी रुग्णालयात घेऊन जाऊन त्याची पुन्हा एकदा तपासणी केली जाते आणि त्यातूनदेखील ते पॉझिटिव्ह असल्यास त्याचे एआरटीसाठी रजिस्ट्रेशन केले जाते. तेव्हा त्यांची सीडी४, एचबी व टीबी तपासणी केली जाते.

गेल्यावर्षी 'नॅको'मध्ये अशी गाईडलाईन आली की, प्रत्येक पॉझिटिव्ह व्यक्तीस सीडी ४ कितीही असो, त्यास एआरटी औषधे चालू करावयास पाहिजेत. सांगली 'टीआय'मधून असे लोक जे प्री-एआरटीवरती लिंक होती, त्या लोकांनादेखील शासकीय रुग्णालयात एआरटी चालू केली गेली. तसेच प्रत्येक एआरटी सेंटरला प्रत्येक महिन्याला टीआयकडून कौन्सिलर मीटिंगसाठी जातात. त्यामध्ये ज्यांनी गोळ्या घेणे बंद केले आहे व जे लोक वेळेवर गोळ्या घेत नाहीत, याबद्दल चर्चा केली जाते, तसेच एआरटी सेंटरकडून मागील महिन्यात ज्या लोकांची सीडी ४ तपासणी करावयाची आहे, त्यांचीदेखील माहिती एआरटी सेंटरबरोबर चर्चा करून घेतली गेली. त्यामुळे जे लोक पुढील महिन्यात सीडी ४ साठी जाणार नाहीत किंवा त्यांना सीडी ४ ची तारीख माहीत नाही, त्यांना 'टीआय'मधील पीअर किंवा ओ.आर.डब्ल्यू. एआरटी सेंटरला घेऊन जातात, तसेच जरी कोणतीही व्यक्ती इतर कोणत्या आजारालादेखील सामोरे जात असल्यास त्यास आम्ही सरकारी रुग्णालयात घेऊन जातो.

मागील वर्षीपासून व्हायरल लोड (विषाणूचा दाब) तपासणी सुरू झाली आहे. एफएसडब्ल्यू सांगली 'टीआय'मध्ये २६ लोकांची व्हायरल लोडची तपासणी झाली आहे. मिरज येथे ८ लोकांचे व्हायरल लोड तपासणी झाली व सांगली एमएसएम/टीजी यामध्ये ०६, तर सातारा येथे १८ लोकांची व्हायरल लोड तपासणी झाली.

| | एकूण पॉझिटिव्ह | प्रथम लाईन | दुसरी लाईन | तिसरी लाईन |
|---|---|---|---|---|
| वँप, एफएसडब्ल्यू टीआय-९०० सांगली | १४५ | १३६ | ०८ | ०१ |
| वँप, एफएसडब्ल्यू टीआय-६००मिरज | ४२ | ३६ | ०५ | ०१ |
| संग्राम सीसी टीआय-७०० (सातारा) | ६० | ५७ | ०३ | ०० |
| संग्राम एमएसएम/टीजी सीसीआयटी-५००, सांगली | ३७ | ३७ | ०० | ०० |

धंदाच्या वेळी स्त्रियांना तसेच एमएसएम/टीजी यांना मारहाण होत असते, त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याचे खूप मोठे धोके आहेत. 'टीआय'मार्फत प्रत्येक 'टीआय'मध्ये एक-एक तंटामुक्ती कमिटी तयार केली गेली आहे. त्यासाठी आम्ही आठवड्याच्या मिटिंगमध्ये चर्चादेखील करतो. धंद्यावेळी सेक्स वर्करना गुंड लोक, पोलिस लोक तसेच काही कस्टमर यांच्यामुळेदेखील महिलांना मारहाण होते. त्यामुळे तंटामुक्तीसाठी काही लोक नेमले आहेत. त्यांनी एकत्र येऊन मारहाण करणाऱ्या लोकांना समजावून सांगतात किंवा त्याबद्दल पोलिस स्टेशनमध्ये जातात.

मागील वर्षात सातारा, सांगली, मिरज या सर्वच ठिकाणी जे काही स्थानिक गुंड आहेत, ते स्त्रियांकडे येणाऱ्या कस्टमरकडून पैसे घेतात, तसेच त्यांना मारहाणदेखील करतात. सातारामध्ये वाढे फाटा येथे काही स्थानिक गुंड अशा प्रकारचा त्रास एमएसएम/टीजी यांना देत होते. त्याची तक्रार तंटामुक्ती कमिटीने पोलिस स्टेशनला दिली. पोलिसांनीदेखील त्यांच्यावर कारवाई केली. त्यामुळे आता तेथे याचे प्रमाण कमी आहेत.

मिरज येथे ट्रान्सजेंडर लोक जेव्हा त्यांच्या घरी जात होते, तेव्हा काही गुंडांनी त्यांना सेक्सची मागणी केली व जेव्हा ट्रान्सजेंडर्स काही कारणामुळे त्यांना नाही बोलले, तेव्हा त्या गुंडांनी त्यांना मारहाण केली. नंतर 'टीआय'मधील स्टाफ व क्रायसेस कमिटी यांनी मिळून जवळील पोलिस स्टेशनमध्ये जाऊन त्याची तक्रार दिली.

मिरज येथे एका स्त्रीच्या तोंडावर चिली स्प्रे मारून तिला बेशुद्ध करण्याचा प्रयत्नदेखील झाला. परंतु, शेजारील इतर स्त्रिया तेथे आल्या व त्यांनी त्या गुंडाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

सातारा येथे खूप वेळ पोलिसांची रेड पडत असल्यामुळे त्या महिलांचे आरोग्य धोक्यात येत होते. तेव्हा 'टीआय' स्टाफ व 'संग्राम' यांच्यामार्फत पोलिसांबरोबर मिटिंग घेतल्यानंतर त्याचेदेखील प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे. जेव्हा ट्रान्सजेंडर लोक सरकारी रुग्णालयात काही कारणासाठी जातात तेव्हा तेथील डॉक्टर लोक त्या ट्रान्सजेंडर लोकांकडे वेगळ्या नजरेने पाहत होते. तेथील डॉक्टर लोकांना ट्रान्सजेंडर लोकांबद्दल माहिती नसल्याने या समस्या येतात.

आम्ही तसेच नगरसेवक, पोलिस अधिकारी, शासकीय कर्मचारी, सिव्हिल हॉस्पिटल, वकील तसेच कलेक्टर ऑफिस, घरमालक, फॅमिली, कम्युनिटी, गुरू, यार, पानपट्टीवाले, रिक्षावाले, विक्रेता, स्टेक

होल्डर, शौचालय कामगार इत्यादी सर्वांशी ॲडव्होकसी करतो.

सरकारी योजनांची माहिती फिल्डवर दिली जाते. उदा. रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक, पेन्शन योजना, जन्माचे दाखले इत्यादी.

| | | |
|---|---|---|
| मतदान ओळखपत्र – ३४ | आधारकार्ड – ११ | बँक पासबुक – १२ |
| पेन्शन योजना – ४ | जन्माचे दाखले – ५ | |

कराडमध्ये २ नवीन हॉटस्पॉट शोधून काढले. तेथील सीमरनजीत ढाबा येथे (हॉटस्पॉट) पाच एफएसडब्ल्यू स्त्रिया आढळून आल्या. सौदापूर येथे तीन एमएसएम आढळून आले. 'टीआय' व 'संग्राम'ने मिळून जिल्हा विधिसेवा प्राधिकरण (दालसा)बरोबर सातारा आणि सांगली अशा दोन ठिकाणी प्रोग्रॅम केले. त्याचा फायदा असा की, ज्यांच्याकडे मतदान ओळखपत्र व आधारकार्ड नव्हते, त्यांना ते काढून देण्यात आले. त्यासाठी कोणत्याही कागदपत्रांची गजर भासली नाही. त्यामध्ये ट्रान्सजेंडर लोकांना इतर असे म्हणून ओळखपत्र मिळाले होते. आता त्यांना ट्रान्सजेंडर म्हणून मतदान ओळखपत्र मिळाले. हा 'टीआय' कार्यक्रमाचा फायदा झाला.

'दयार' व संस्थेमध्ये गैरसमज होते. संघटनेद्वारे 'दयार'मधील गैरसमज मिटवून पुन्हा ट्रान्सजेंडर्स संस्थेमध्ये पीअर म्हणून कामास येऊ लागले. त्यामुळे ट्रान्सजेंडरच्या तपासणीत वाढ होऊ लागली व त्यानंतर कल्याणकर डीआयसी घेतले. त्याचा फायदा स्टँडवरच्या सर्व ट्रान्सजेंडर्स डीआयसी (ड्रॉप इन सेंटर)मध्ये येऊ लागले. त्यामुळे आमचे क्लिनिक व ऐच्छिक तपासणी वाढली. त्याचप्रमाणे आम्ही डीआयसीमध्ये वेगवेगळे कार्यक्रमसुद्धा घेतले. दालसा, ट्रान्स बिल व 'कलम ३७७ तेरा जमाना गया' असे विविध कार्यक्रम घेतले.

एफएसडब्ल्यूमध्ये टेस्टिंगचे प्रमाण वाढले. कारण क्लस्टर ॲक्टिव्हिटी व स्वत:हून स्त्रिया तपासणीकरिता पुढे येऊ लागल्या. घरगुती ठिकाणी व रस्त्यावर जागेची समस्या असल्यामुळे त्या समस्या आम्ही सोडवल्या व तपासणी व क्लिनिक वाढले. २०१२ ते २०१४ मध्ये ज्या पॉझिटिव्ह आल्या होत्या, त्या केवळ 'प्री–एआरटी'वर होत्या. त्यांना मागील वर्षी २०१८–१९ ला 'एआरटी'वर आणले तसेच ज्या लोकांनी गोळ्या घेणे बंद केले होते, त्यांना पुन्हा कौन्सिलिंग करून गोळ्या चालू करण्यास भाग पाडले.

फिल्डवर काम करत असताना स्त्रियांमध्ये फंगल इन्फेक्शन, स्तनाच्या गाठी, हिमोग्लोबीनचे प्रमाण, शुगर, बीपी, मूळव्याध अशा प्रकारच्या तक्रारी आढळून आल्या. त्यामध्ये फंगल इन्फेक्शनचे प्रमाण जास्त आढळून आले. त्यासाठी 'संग्राम' संस्थेने आठ दिवसांची औषधे दिली आणि आठ दिवसांची विकत घेण्यास सांगितले. असा पंधरा दिवसांचा कोर्स करण्यात आला. त्यातून फंगल इन्फेक्शनचे प्रमाण कमी झाले, तसेच एका स्त्रीला स्तनाच्या गाठी झाल्या होत्या. तिला हॉस्पिटलमध्ये नेऊन तिच्यावर उपचार करण्यात आले, तसेच आम्ही फक्त एचआयव्हीपुरता विचार न करता त्यांच्या इतर आरोग्याच्या समस्यांवर काम केले. त्यामुळे त्यांच्यात व आमच्यात चांगले संबंध निर्माण झाले आहेत.

पोलिसांबरोबर आम्ही ॲडव्होकसी केलेली आहे. त्यामुळे एखादी परस्पर तक्रार कोण नोंदविली असेल, तर ते प्रथम आम्हाला फोनवरून ही तक्रार आम्ही नोंदवून घेऊ का की तुम्ही हे प्रश्न सोडविता, या तक्रारीवर काहीतरी उपाय करता का? असे विचारतात. यातून आम्ही दोन्हीकडील विचार घेऊन तसेच आमच्या कम्युनिटीमध्ये चर्चा करून तो प्रश्न अथवा ते भांडण मिटविण्याचा प्रयत्न करतो. आम्ही एआरटी सेंटरच्या संपर्कात राहतो आणि आढावा घेतो. त्यामुळे एआरटी सेंटरचे व आमचे संबंध चांगले झाले आहेत.

■■■

# वँप कार्यक्रम













# लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकिया, कोल्हापूर

## आजरा व हातकणंगले तालुका

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान २००५ मध्ये सुरू झाले. आरोग्य यंत्रणेंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे मूल्यमापन होण्यासाठी लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेची राष्ट्रीय पातळीवर बांधणी करण्यात आली. महाराष्ट्रात ही प्रकिया रुजली, वाढली आणि विस्तारलीसुद्धा.

कोल्हापूर जिल्ह्यात 'संग्राम' या स्वयंसेवी संस्थेने लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाचे (Community Based Monitering Program) कार्यविशेष सहभागाने आणि पुढाकाराने कार्यरत आहे. लोकाधारित देखरेख प्रक्रियेचा मूळ गाभा म्हणजे गाव ते जिल्हापातळीवर देखरेख व नियोजन समिति लोकप्रतिनिधी, आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक संस्था, संघटना अशा विविध घटकांतील यांना एकत्र घेऊन या समितीची बांधणी केली आहे.

ज्यावेळी आम्ही कार्यकर्ते गावामध्ये गेलो, त्यावेळी प्रथम लोकांमध्ये ही चौकशी केली की, त्यांना आरोग्यविषयक मिळणाऱ्या सर्व मोफत सेवा कितपत माहिती आहेत. तेव्हा आम्हाला असे कळले की, बऱ्याचशा सेवा लोकांना माहीत नाहीत, तेव्हा प्रथम आम्ही लोकांमध्ये जनजागृतीवर कार्यक्रम आयोजित केले. त्यामध्ये खालील कार्यक्रम घेण्यात आले.

आम्ही महिलांची बैठक घेऊन त्यांना आरोग्यविषयक ज्या सेवा मोफत आहेत, त्या समजावून सांगितल्या. शाळेतील मुले, गरोदर महिलांना, किशोरवयीन मुली, दिव्यांग, १ ते ६ वयोगटांतील मुले-मुली, ४० ते ६० वयोगटांतील महिला, अंगणवाडी सेविका, विविध प्रकारचे शेतीकाम करणाऱ्या महिला व पुरुष यांना आरोग्यविषयक माहिती दिली.

प्रत्यक्ष काम करतेवेळी असे दिसून आले की, बरेचसे लोक शासकीय सेवांचा लाभ कमी प्रमाणात घेतात. कारण तेथील कामाची पद्धत, डॉक्टर उपलब्ध नसणे, कोणत्या सेवा आहेत ते माहीत नसणे, इतर कर्मचाऱ्यांकडून मिळणारी वाईट वागणूक, वाहन सेवा इत्यादी गोष्टी माहीत नसल्यामुळे बरेचसे लोक तिकडे जाण्याचे टाळत होते.

बऱ्याचशा गरोदर महिला फक्त डोसपुरत्याच शासकीय दवाखान्यात जात होत्या; पण आम्ही त्यांना त्या गावातील उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकत्रित करून तेथील प्रसूतीसेवा, खास डॉक्टर, अनुभवी नर्स, वाहन सेवा, राहण्या- जेवणाची सोय तसेच विविध रक्ताच्या चाचण्या याविषयी सर्व सविस्तर माहिती दिली व तुम्हाला जर तेथेही प्रसूतीवेळी, सिझर किंवा रक्त चढविण्याची गरज लागली, तर ताबडतोब ॲम्ब्युलन्समधून पुढील मोठ्या सेवा असणाऱ्या शासकीय दवाखान्यात हलविण्यात येईल. त्यांच्याबरोबर नर्स व प्रकल्पातील कार्यकर्ते पूर्णपणे सोबत राहील, इत्यादी गोष्टींची माहिती देऊन विश्वास संपादन केला, त्यामुळे त्यांच्या मनातील भीती दूर झाली. परिणामी आता प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीचे प्रमाण हे वाढले आहे. वार्षिक प्रमाण ४ ते ५ होते; पण आता ते ४० ते ५० पर्यंत गेले आहे, त्यामुळे एका प्रसूतीपाठीमागे ४० ते ५० हजार होणारा खर्च वाचला आहे.

४० ते ५० वयोगटांतील महिलांना विविध गर्भाशयाचे आजार, स्तनाचे आजार होत असतात; पण ह्या महिला हे आजार गुपीत ठेवतात असे समजून आले. त्या महिला शेतकरी कामकरी असल्यामुळे पुढील उपचारासाठी आपण दवाखान्यात गेलो, तर आपल्याला खर्च परवडणार नाही म्हणून

त्या आजार लपवून ठेवत होत्या.

कॅन्सरसारखे आजार तसेच स्तनातील गाठी काढणे यांसारखे उपचार हे शासकीय सेवेत मोफत मिळतात, याची माहिती नसल्याने त्या जात नव्हत्या; पण मेळाव्यामध्ये आम्ही आजाराविषयी सविस्तर माहिती देऊन शासकीय दवाखान्यात मोफत उपचार होतात, हे समजावून सांगितले.

१३ ते १८ वयोगटांतील मुलींचे हिमोग्लोबीन कमी असते, त्यामुळे त्या अशक्त किंवा कमी वजनाच्या असतात व पुढील काळात त्यांना विविध शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते, यासाठी आम्ही महिला व बालकल्याण विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या कार्यशाळेत उपस्थित राहून त्यांची हिमोग्लोबीन तपासणी करून घेण्याचे कार्यक्रम लावले. हिमोग्लोबीन कमी असणाऱ्या मुलींना विशिष्ट आहार व औषधे तसेच निधी उपलब्ध करून त्यांना पूरक आहार देण्याचे कार्यक्रम आयोजित केले. शाळा, कॉलेज, तरुण मंडळे इत्यादी घटकांना भेटून विविध कार्यक्रम घेऊन शासकीय योजना समजावून सांगितल्या. शाळेत येणारे शाळा तपासणी पथक, त्याची कार्ये, तपासण्या, त्यांच्या वेळोवेळी शाखांना भेटी, त्यांच्याद्वारे मिळणाऱ्या सेवा व पुढील मोफत उपचार यांविषयीचे कार्यक्रम आयोजित केले.

आशांकडून मिळणाऱ्या सेवा, शासनाकडून मिळणारे आर्थिक लाभ इत्यादी बाबी मिळविण्यासाठी लागणारी कागदपत्रे, आशांकडे मिळणारे प्राथमिक उपचार यांविषयी माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले.

**जिल्हा पातळीवरील उपक्रम**

आरोग्य सभापती यांच्या अध्यक्षतेखाली, आरोग्य सभापती दालन, जिल्हा परिषद कोल्हापूर या ठिकाणी जिल्हा देखरेख व नियोजन समितीची बैठक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दुपारी ३ वाजता घेण्यात आली.

'संग्राम' संस्थेच्या जिल्हा समन्वयक रविराज कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संवाद संस्थेचे रवी देसाई यांनी लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया या प्रकल्पाबद्दल सविस्तर माहिती दिली.

सभापतींनी तालुका पातळीवरील मुद्यांची चर्चा सुरू करण्यास सांगितले, त्यानुसार पहिल्यांदा हातकणंगले व नंतर आजरा आणि भुदरगड अशी तालुक्यातील समस्यांची चर्चा झाली. जिल्हा देखरेख व नियोजन समिती आणि जिल्हा सुकाणू समिती यांच्या विस्तारीकरणाबाबत चर्चा झाली. सभापतींनी पदसिद्ध सदस्य आणि इतर सदस्यांची यादी तयार करून मान्यतेसाठी पाठवावी, अशा सूचना दिल्या. सुकाणू समितीचा विस्तार करून लवकरात लवकर बैठक लावावी, ही समन्वयक संस्थांची विनंती मान्य करून तशा सूचना दिल्या.

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्पातील कामातून पुढे येणारे मुद्दे, प्रश्न वेळोवेळी सभापतींच्या अध्यक्षतेखालील आरोग्य समितीला कळविण्यात यावेत, अशी सूचना सभापतींनी दिली. जेणेकरून निर्माण झालेले मुद्दे लवकर सुटतील. लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यास यानिमित्ताने मदत होईल असे सभापतींनी सांगितले.

**लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प हातकणंगले**

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पांतर्गत हातकणंगले महिला दलित व्यक्तींना आवर्जून प्राधान्य देण्यात आले. समाजातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यरते, आदींचाही समावेश करण्यात आला आहे. देखरेख समितीच्या माध्यमातून सामान्य लोकांना आरोग्यसेवांवर देखरेख करण्यासाठी अधिकार मिळाले.

लोकाधारित देखरेख नियोजन समितीमध्ये गावातील काही लोक प्राथमिक आरोग्य केंद्रपातळीवर

समितीमध्ये, तर प्राथमिक आरोग्य केंद्र समितीचे काही सदस्य तालुका देखरेख समितीमध्ये घेण्यात आलेले आहेत. समितीकडून ग्रामपंचायत सदस्य, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, बचतगट, तरुण मंडळे, स्थानिक ग्राम मंडळे, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य समितीने या घटकांना घेऊन एप्रिल २०१८ ते २०१९ पर्यंत आरोग्याच्या समस्यांची पाहणी करून त्या सोडविण्यात आल्या आहेत.

**उद्देश**

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पांतर्गत उपक्रम घेण्यामागे उद्देश हा होता की, आरोग्यसेवेच्या हक्काबद्दलची जाणीव करून देणे, सरकारी आरोग्य केंद्रात आरोग्यसेवा मिळताना आलेल्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करणे व लोकांमध्ये शासकीय आरोग्ययंत्रणेबद्दल असलेली उदासीनता दूर करणे, वंचित रुग्णांना उपचार, सेवाशुल्क इत्यादींबद्दल माहिती समजावून सांगणे. सर्व रुग्णांना विशेषतः गरीब रुग्णांना आदराची वागणूक दिली जाते का? याविषयी देखरेख करणे, उपचारबद्दल सविस्तर माहिती देणे.

**उपक्रम**

१. प्रक्रियेंतर्गत येणाऱ्या १८ गावांमधून VHNSC समितीवरती आशांची सचिव म्हणून नेमणूक करण्यासाठी विशेष सहभाग व पुढाकार
२. लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेंतर्गत येणाऱ्या साजणी, माणगाव, माणगाववाडी, कबनूर, तिळवणी या गावांमध्ये महिलांची हिमोग्लोबीन तपासणी करून घेण्यात आली.
३. जागृती कार्यक्रमात ४१ जण उपस्थित होते. महिला, वंचित घटक, तरुण मंडळांच्या बैठका, आशांच्या आरोग्य बैठकाद्वारे बाह्यरुग्णसेवा, आतंररुग्णसेवा, माता व बालआरोग्य संदर्भातील सेवा, कुटुंब नियोजन, लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प कार्यवाही, बळंतपाणानंतरच्या सेवा, रुग्नहक्क, शालेय व किशोरवयीन आरोग्य, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम यांची जनजागृती करण्यात आली.
४. प्राथमिक आरोग्य केंद्र देखरेख समिती बैठका.
५. प्रक्रियेतील गावामधून VHNSC बैठकांचे आयोजन करून कुपोषित व गरोदर महिलांच्या प्रश्नांची मांडणी करून ती सोडविण्यात आलीत.
६. हातकणंगले तालुक्यामध्ये यावर्षी नव्याने सुरू केलेली विकेंद्रित नियोजन प्रक्रिया गावस्तरापर्यंत पूर्ण झालेली आहेत. तालुकास्तरावर बैठकीचे आयोजन करण्याचे नियोजन सुरू आहे.

प्रकल्पांतर्गत ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांना वेळच्या वेळी भेटी देऊन पाहणी करण्यात आलेले विषय :

१. सर्व रुग्णांना समान वागणूक.
२. आरोग्यसेवा मोफत व अल्पदारात सेवेची हमी.
३. भेदभाव न करता सर्वांना सहज उपलब्ध अशा दर्जेदार आरोग्यसेवांची हमी.
४. आरोग्य केंद्रामध्ये सर्व अत्यावश्यक औषधे कायम असल्याची खात्री करण्यात आली.
५. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची इमारत पक्क्या स्थितीत असावी, कर्मचारी निवासाची व्यवस्था असावी.
६. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये पुरेसा पाणीपुरवठा आहे का नाही याची पाहणी करण्यात आली.

७. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये वीजपुरवठा व इटंरनेट सुविधांची पाहणी करण्यात आली.
८. शासकीय कुठल्याही आरोग्यसेवेसाठी रुग्णांकडून पैसे मागितले जाणार नाही, याची पाहणी करण्यात आली.
९. रोज सकाळी व संध्याकाळी बाह्य रुग्म विभागात डॉकटरांकडून रुग्णाची तपासणी व उपचार
१०. रक्त, लघवी, थुंकी तपासणीसाठी नमुना घेणे व रिपोर्ट मिळवणे व्यवस्था प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत २०१८ मध्ये महालेब्सची सुविधा शासकीय यंत्रणेकडून करण्यात आली आहे.
११. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २४ तास बाळंतपणाच्या सुविधांची पाहणी करण्यात आली
१२. अपघातातील रुग्णांसाठी तातडीने मोफत ॲम्ब्युलन्स सुविधा, गंभीर आजारांना संदर्भसेवा.
१३. समितीतील कार्यकर्त्यांकडून गावभेटी, अंगणवाडी भेटी, वंचित घटकांना भेटी देऊन साथीच्या व गंभीर आजारांची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्रात सांगून आरोग्याच्या समस्या प्रथम जाणून घेण्यात आल्या.

**गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता बैठक**

बैठकीमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य गावातील आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, अंगणवाडी सेविका, नर्स, एएनएम व बचतगटांतील स्त्रिया या सर्व घटकांना घेऊन माले, अतिग्रे, घुणकी, कबनूर, माणगाव, माणगाववाडी, साजणी, तिळवणी आणि चोकाक या गावातील VHNSC च्या बैठका प्रकल्पांतर्गत घेण्यात आल्या. या सर्व बैठकांमध्ये चर्चा करण्यात आलेले विषय खालीलप्रमाणे आहेत.

१. नर्स व MPW यांच्या दर महिन्याला दोनवेळा गावभेठी केल्या जातात का?
२. प्रत्येक गावातील उपकेंद्रात नियमित लसीकरण होते का?
३. गावामध्ये पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी काही उपाययोजना राबविल्या जातात का?
४. गावामध्ये सांडपाणी व्यवस्था आहे का?
५. बाळंतपणासाठी व १ वर्षापर्यंतच्या बाळासाठी तातडीच्या वैद्यकीय उपचारासाठी ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध केल्या जातात का?
६. गावामध्ये कुपोषित बालकांच्या आहाराविषयी चर्चा
७. अंगणवाडीमध्ये मिळणाऱ्या आहारातल्या दर्जाविषयी चर्चा
८. प्रत्येक गावासाठी मिळणाऱ्या मुक्त म्हणजेच अबंधित निधीच्या वापरासंदर्भात चर्चा.
९. प्रत्येक गावासाठी ग्रामपंचायातीकडून १४ व्या वित्त आयोगाकडून किती टक्के निधी आरोग्य व आरोग्याच्या सुविधांसाठी वापरला गेला आहे, याची माहिती सरपंचांकडून कडून घेणे.
१०. तालुक्यातील गरोदर व अतिजोखमीच्या मातांना मिळणाऱ्या लाभाची व सेवांची माहिती घेण्यात आली असून, ज्या गरोदर मातांचे हिमोग्लीबीन ९ पेक्षा कमी आहे, अशा मातांना IRON SUKROSE IV वेळच्या वेळी दिला जातो का, याची पाहणी करण्यात आली, तसेच VHNSC समितीच्या बैठकीवेळी गरोदर मातांचे प्रश्न मांडून ते सोडविण्यात आले.

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पांतर्गत येणाऱ्या २० गावांमध्ये आशांची सचिव म्हणून नेमणूक करून प्रकल्प कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने करून घेण्यात आली, आशा सचिव नेमत असताना काही गावांमध्ये गावपातळीवर राजकीय हस्तक्षेपामुळे लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले.

प्रकल्पांतर्गत येणाऱ्या १५ गावांमधून ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व एका ग्रामीण रुग्णालयात D-T-COLLETTION हा उपक्रम राबविण्यात आला.

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प हातकंणगले यांच्याकडून एसएमएसच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणाऱ्या औषधांवर एसएमएस प्रणालीच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आले.

पट्टणकोडोली, पुलाची शिरोली, साजणी, हेरले, भादोले या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधाची उपलब्धता किती आहे, याचे सर्वेक्षण करून एसएमएस करण्यात आले. तसेच प्रा. आ. केंद्रात आवश्यक औषधांची उपलब्धता दर्शविणारा तक्ता, फार्मासिस्टचे कायमस्वरूपी पद भरलेले आहे का? प्रा.आ. केंद्रात औषधांचा स्टॉक भरताना काही अडचणी येतात का? प्रा.आ. केंद्र ते औषधांची शेवटची मागणी कोणत्या महिन्यात केली? प्रा.आ. केंद्र ते जिल्हा औषधी भांडाराचे अंतर सोयीस्कर आहे का? या सर्व माहितीचे एकत्रिकरण करून एसएमएसद्वारे पाठविण्यात आले.

--

## लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प हातकणंगले

प्राथमिक आरोग्य केंद्र लोकसहभाग अंकेक्षण व नियोजन

(पार्टिसिपेटरी ऑडिट प्लॅनिंग P-P)

लोकाधारित देखरेख व नियोजन अंतर्गत जानेवारी व मार्चमध्ये हातकणंगले तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र हेरले, साजणी, पट्टणकोडोली, भादोले, आळते, सावर्डे येथील सामाजिक लेखापरीक्षण करण्यात आले. पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, रुग्ण कल्याण समिती सचिव व देखरेख समिती सदस्य यांच्या उपस्थितीत सामाजिक लेखापरीक्षण आले. सामाजिक लेखापरीक्षणामध्ये आरोग्य केंद्रामध्ये मागील आर्थिक (२०१७-१८) वर्षात रुग्ण कल्याण समिती निधी किती जमा झाला आहे व तो कोणकोणत्या गोष्टींवर खर्च करण्यात आला आहे, याची समितीकडून पडताळणी करण्यात आली.

सामाजिक लेखापरीक्षणावेळी लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प कार्यकर्त्यांना असे दिसून आले की, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण कल्याण निधीतून आरोग्य केंद्रांच्या वाहनांच्या विम्यासाठी व वाहन पासिंगसाठी निधी वापरण्यात येतो. परिणामी, औषध खरेदीसाठी हा निधी कमी पडतो. त्यासाठी आरोग्य केंद्रांतील वाहन घेण्यासाठी विशेष निधीची तरतूद असणे गरजेचे आहे. २०१७-१८ साठी मिळालेला निधी कमी आहे. त्यामुळे औषध खरेदीसाठी तो कमी पडला. त्यामुळे वाढीव स्वरूपात निधी मिळाला पाहिजे. RKS समितीतील काही सदस्यांना निधी वापरासंबंधीची माहिती नव्हती असे जाणवले असता लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प कार्यकर्त्यांकडून याबाबत माहितीदेखील देण्यात आली.

| अ.नं. | प्राथमिक आरोग्य केंद्र | सामाजिक अन्वेषण दिनांक |
|---|---|---|
| १. | हेरले प्राथमिक आरोग्य केंद्र | ०३/०१/२०१९ |
| २. | साजणी प्राथमिक आरोग्य केंद्र | १०/०१/२०१९ |
| ३. | भादोले प्राथमिक आरोग्य केंद्र | २०/०२/२०१९ |
| ४. | आळते प्राथमिक आरोग्य केंद्र | २१/०२/२०१९ |
| ५. | सावर्डे प्राथमिक आरोग्य केंद्र | २२/०२/२०१९ |
| ६. | पट्टणकोडोली प्राथमिक आरोग्य केंद्र | २५/०२/२०१९ |

**हातकंणगले तालुक्यामध्ये झालेले सकारात्मक बदल**

१. लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पांतर्गत हातकंणगले तालुक्यामध्ये प्रकल्प कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे ते ७५० महिलांची आणि किशोरवयीन मुलींची सीबीसी तपासणीअंतर्गत हिमोग्लोबीन तपासणी आणि पांढऱ्या व तांबड्या पेशींची तपासणी करण्यात आल्यामुळे महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे.

२. साजणी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कबनूर गावामध्ये आरोग्यसेविका व MPW हे रिक्त पद प्रकल्प पाठपुराव्यामुळे भरण्यात आले.

३. हेरले प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये देखरेख समिती सदस्यांच्या पुढाकाराने वृक्षारोपण करण्यात आले.

४. माणगावमध्ये दलित वस्तीशेजारी घनकचरा प्रकल्प बांधण्यात येत होता. तो स्थलांतरित करण्यासाठी पाठपुरावा केला गेला व दलित वस्तीतील लोकांचे होणारे आरोग्याचे नुकसान टाळण्यास मदत झाली.

५. हातकणंगले तालुक्यातील अंगणवाड्यांना सतत भेटी देऊन त्यांचे प्रश्न जाणून घेऊन ते VHNSC समिती बैठकीमध्ये मांडले गेले व अंगणवाडीचे इमारत प्रश्न, कुपोषित बालकांचे प्रश्न सोडविले.

६. नवीन अंगणवाड्या बांधण्यासाठी मंजुरी प्रक्रियेमध्ये विशेष सहभाग.

७. हातकंणगले तालुक्यातील प्रक्रियेंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये महिला बचतगट, वंचित घटक बैठका, वृद्ध महिलांच्या बैठका घेऊन आरोग्यसेवांबाबत जनजागृती करण्यात आली.

८. साजणी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी फिल्टर घेण्यात आला.

९. साजणी आरोग्य केंद्रात रिक्त असलेले शिपाई पद भरण्यात आले.

१०. प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषधपुरवठा थोड्या प्रमाणात सुरळीत चाललेला दिसून येत आहे.

११. प्राथमिक आरोग्य केंद्रातील RKS निधीच्या खर्चावर देखरेख करण्यात आल्यामुळे जास्तीत जास्त निधी औषध खरेदीसाठी होत आहे.

१२. प्रक्रियेतील गावांमध्ये महिला व मुलींचे मेळावे घेऊन रक्तातील हिमोग्लोबिन वाढीसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केल्यामुळे महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली.

१३. माणगावमधील प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचे फॉर्म भरण्यासाठी झेरॉक्सचे निमित्त सांगून लाभार्थ्यांकडून पैशाची मागणी केली जात होती. ती प्रकल्पांतर्गत पाठपुराव्यामुळे बंद करण्यात आली व लाभार्थ्यांना लाभ घेताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या.

१४. प्रक्रियेतील १८ गावांमधून VHNSC समितीवर आशांची सचिवपदी नेमणूक करण्यात आली.

**आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्था | संग्राम | संस्था | संपर्क व्यक्ती | श्री शिवाजी गुरव, ९८६०१११६३२ |
| तालुका | आजरा | जिल्हा | कोल्हापूर | |

१. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या वर्षात झालेले उपक्रम

२. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ मध्ये प्रक्रियेंतर्गत उपस्थित मुद्दे, झालेली कार्यवाही, प्रलंबित मुद्दे

**गावपातळी / उपकेंद्र**

देखरेख प्रक्रियेंतर्गत उपस्थित झालेले मुद्दे, झालेली कार्यवाही/निर्णय, आलेले यश तसेच प्रलंबित प्रलंबित मुद्दे सोडविण्यासाठी केलेला पाठपुरावा

पोळगावला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला गळती लागली होती, त्यामुळे पाणी वाया जात होते. व्ही.एच.एन.एस. समितीमध्ये हा मुद्दा चर्चेला घेण्यात आला. चर्चेनुसार पाईपलाईनची दुरुस्ती दोन दिवसांत करण्यात आली.

गवसे उपकेंद्र उघडण्याची वेळ लोकांच्या सोईप्रमाणे असावी, असा मुद्दा चर्चेला आला. व्ही.एच.एन.एस. समितीच्या मिटिंगवेळी नर्ससोबत चर्चा केली असता डोंगराळ भागातील ७ गावे गावांचा समावेश असलेले उपकेंद्र सकाळी ८ ते ९ व सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुरू असावे, अशी मागणी पुढे आली. व्ही.एच.एन.एस.च्या समितीमध्ये मुद्दा चर्चेला घेऊन संबंधित नर्सकडून या सात गावांच्या भेटीचे नियोजन करण्यात आले.

किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा आहार खाल्ला जात नसून, त्याऐवजी ताजा सकस आहार देण्यात यावा. पूर्वीप्रमाणे गाव मिटिंगमध्ये चर्चा करण्यात आली. ताजा सकस आहार मिळण्यासाठी तालुका पातळीवर चर्चा केली; पण हा विषय जिल्हा पातळीवर जाणे गरजेचे आहे.

कागिनवाडी येथील अंगणवाडीमध्ये पिण्याचे व खर्चाचे पाणी एकत्र होते. टाकी साफ केली जात नव्हती. व्ही.एच.एन.एस. समितीच्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा करून व प्रत्यक्ष टाकीची पाहणी करून पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यासोबतच टाकीची स्वच्छता करण्याचे ठरले. पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र फिल्टरची व्यवस्था करण्याचे ठरले. त्यासाठी ग्रामपंचायतीकडून मागणी केली व सदरची टाकी ताबडतोब स्वच्छ करण्यात आली. याकामी समिती सदस्य व अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबीन तपासणी केली जात नाही. ती कागदावर फक्त दाखविली जाते. त्यासाठी स्वतंत्र कॅम्प लावण्याचा निर्णय झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांना भेटून एच.बी. तपासणी कॅम्प लावण्यासाठी तारीख निश्चित केली व शाळांच्या मुख्याध्यापकांना भेटून माहिती देण्यात आली. मागणी केलेल्या गावातील शाळेतच एच.बी. तपासणी कॅम्प घेण्यात आले.

उपकेंद्रामध्ये औषध पुरवठा होत नाही. औषध पुरवठ्याबाबत माहिती घेण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भेटावे असे ठरले. त्यासाठी जिल्हास्तरावर मुद्दा चर्चेला घेतला. सध्या औषध पुरवठा सुरळीत आहे.

पोळगावमध्ये पिण्याचे पाणी सायपन पद्धतीने येते. त्या पाण्यामध्ये कचरा व गाळ साचल्याचे कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आले. व्ही.एच.एन.एस. समितीसमोर हा मुद्दा चर्चेला घेण्यात आला. गाव बैठक घेऊन गाळ व पालापाचोळा काढून स्वच्छ पाणीपुरवठा करण्याचे बैठकीत ठरले. पाणीपुरवठा जमिनीतून

होणाऱ्या नळाला गळती होती, तीही ताबडतोब काढण्यात आली व पाण्याचा स्त्रोत स्वच्छ करण्यात आला. यासाठी गाव सहभाग मोठा होता.

कोवाड येथे शालेय तपासणी झाली नाही. त्यामुळे शाळा तपासणी पथकाला तालुका देखरेख समितीने सूचना केल्या. त्यानंतर सदर गावामध्ये शाळा तपासणी करण्यात आली.

व्ही.एच.एन.एस. समितीचा निधी खर्च होत नाही, अशी बऱ्याच गावांची तक्रार होती.
व्ही.एच.एन.एस. समितीच्या बैठकांना कार्यकर्ते हजर राहून व महिला बालकल्याण विभागाला सूचना देऊन कार्यवाही केली. व्ही.एच.एन.एस. समितीसमोर हजर राहून व तालुका स्तरावर चर्चा करून मार्गदर्शन केले. सदरचा निधी खर्च झाला नाही, तर तो आपल्याच गावचा तोटा असून, तो योग्य बाबींवर खर्च करावा, असे मार्गदर्शन केल्यामुळे बऱ्याच गावांचा निधी खर्च झाला आहे.

**केस स्टोरी १**

**हातकणंगलेत हिमोग्लोबीन तपासणीला वेग**

जून २०१८ मध्ये माणगाव, कबनूर, साजणी गावामध्ये लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकाल्पातील कार्यकर्ते व तालुका समन्वयकांनी VHNS बैठकांचे आयोजन केले होते, तसेच प्रत्येक महिन्याला गावभेटी, बचतगटांच्या बैठका घेण्यात येत होत्या. बैठकांमध्ये महिलांच्या आरोग्याच्या समस्यांविषयी चर्चा करण्यात येत आसता, किशोरवयीन मुली व महिलांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात यावी असे अनेक महिला व लोकप्रतिनिधींकडून मांडण्यात आले होते, तसेच प्रकल्पांतर्गत येणाऱ्या गावांमधील शाळांमध्ये मुलींची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात यावी, असे अनेक ठिकाणी सांगण्यात आले. त्यामुळे लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पातील तालुका समन्वयकांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली व या बाबत पत्रव्यवहार करून माणगाव, तिळवणी, कबनूर, साईनगर माध्यमिक शाळांमध्ये हिमोग्लोबीन तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली. ७५० मुली व महिलांचे हिमोग्लोबीन तपासणी केली गेली. तपासणीचा अहवाल आल्यानंतर ज्या महिला व मुलींचे हिमोग्लोबीन ९ पेक्षा कमी आहे, आशा महिला व मुलींना मार्गदर्शन करून पालेभाज्या, दुग्धजन्य पदार्थ, फळभाज्या, मांसाहरी जेवण कोणत्या प्रकारे घेतले पाहिजे, याबाबत लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राकडून औषधोपचार करून घेण्यसाठी महिला व मुलींना मार्गदर्शन करण्यात आले.

केसस्टोरी – २

**माणगावमधील गैरप्रकार रोखला**

माणगावमध्ये मातृत्ववंदन योजनेच्या फॉर्मसाठी घेतले जाणारे पैसे झाले बंद हातकणंगले तालुक्यातील १४ हजार वस्ती आसणाऱ्या माणगावमध्ये बऱ्याच गरोदर महिलांची नवीन पहिल्या खेपेच्या महिलांची नोंद होते. प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्या गीता चव्हाण या गावामध्ये महिला व वंचित घटकांच्या बैठका घेत होत्या. या बैठकांवेळी jsy योजना, मातृवंदन योजना यांविषयी विस्तृत अशी माहिती दिली जात होती; पण बैठकांवेळी महिलांकडून एक धक्कादायक गोष्ट सांगण्यात आली. माणगाव उपकेंद्रामधून पहिल्या खेपेच्या गरोदर महिलांकडून मातृत्ववंदन योजनेचा फॉर्म भरत आसताना १३०, १५०, १८० आशा स्वरूपात रक्कम घेतली जात होती. याचे कारण विचारले आसता ऑनलाईन फी व झेरॉक्ससाठी पैसे लागतात, अशी कारणे सांगितली जात होती. लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांना ही गोष्ट लक्षात येताच साजणी प्राथमिक आरोग्य केंद्राची देखरेख व नियोजन

समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये वैद्यकीय अधिकारी व इतर लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास हा विषय आणून दिला. तेव्हा वैद्यकीय डॉक्टरांनी माणगाव उपकेंद्रातील आरोग्यसेविका व आशांना त्वरित या गोष्टीची समज दिली व असा प्रकार आढळल्यास कारवाई करण्यात येईल, या शब्दांत सांगण्यात आले. तेव्हापासून लाभार्थ्यांकडून पैसे घेणे बंद झाले आहे.

**केस स्टोरी नं.३**

**आजऱ्यात डेंग्यूला थारा नाही**

जून २०१८ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये डेंग्यूची साथ पसरली होती. ही साथ आजरा तालुक्यात येऊ नये यासाठी तालुक्यामध्ये जनजागृती कार्यक्रम घेतले. यासाठी डास निर्मूलन मोहीम राबविली. गावागावांत जनजागृती रॅली काढण्याचे व मार्गदर्शन मिळावे घेण्याचे नियोजन आरोग्य खत्याच्या कर्मचाऱ्यांसोबत लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी चर्चा करून कार्यक्रमांचे नियोजन केले. गावागावात जनजागरण रॅली काढली. या रॅलीमध्ये सर्वांना समाविष्ट करून घेतले. या रॅलीचा चांगला फायदा झाला. आजरा तालुक्यात डेंग्यूची साथ आली नाही. या रॅलीमध्ये 'संग्राम'चे कार्यकर्ते व आरोग्य विभागाचे कर्मचारी, आशा, अंगणवाडी कर्मचारी, शाळेची मुले, शिक्षक यांनी सहभाग घेतला. गावागावांत रॅली काढून, सभा घेऊन हे कार्यक्रम घेतले. याबाबतच्या बातम्या फोटोसह सोबत जोडल्या आहेत.

केस स्टोरी नं. ४

**ग्रामपंचायतीकडून मिनी आरोग्य उपकेंद्राची निर्मिती**

निसर्गरम्य, हिरवीगार शेती, उत्तरेच्या बाजूला गावाजवळून वाहणाऱ्या हिरण्यकेशी नदीवर वसलेला कोवाड. आजरा तालुक्यातील मलिग्रे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणारे गाव जंगल जमिनीला लागून वसलेल्या गावाला राजकीय परंपरा मोठी आहे. तालुका संघाचे चेअरमन, पंचायत समिती सभापती, पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषद सदस्य अशी पदे गावाकडे घेण्यास आघाडीवर असणारे गाव म्हणजे कोवाड गाव. या गावाला सुरुवातीपासून चांगली दळणवळणाची सोय नाही. दक्षिणेकडे असणाऱ्या मलिग्रेच्या ४ कि.मी. अंतराच्या रस्त्याचा प्रश्न निकालात निघाला. परंतु, दळणवळणाची सोय म्हणून बसची सोयसुद्धा करता आली नाही. मलिग्रे येथे असणारे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणारे हे गाव आहे. गावातील नागरिकांचे आरोग्य बिघडले, तर ४ कि.मी. अंतर चालत जाऊन सर्वसामान्य कुटुंबातील लोकांना उपचार घ्यावे लागतात, त्यामुळे गावातील राजकीय मंडळींनी ग्रामपंचायतमार्फत पंचायत समिती व जि.प.कडे अनेकवेळा कोवाडे गावात आरोग्य उपकेंद्र मंजूर व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. परंतु, त्याला काही यश आले नाही. मलिग्रे प्राथमिक केंद्रांतर्गत लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पांतर्गत या गावची निवड झाली असून, या प्रकल्पांतर्गत गावाला आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळते. या गावच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी आरोग्याबाबत लोकांची अडचण, कुचंबणा लक्षात आली. काहीतरी पर्यायी मार्ग काढून लोकांची सोय करता येईल काय, अशी चर्चा व्ही.एच.एन.एस. समितीमध्ये करण्यात आली. शासनाच्या वतीने १४ व्या वित्त आयोगातून मिळणाऱ्या ग्रामपंचायतीकडील निधीतील २५ टक्के रक्कम आरोग्य व शिक्षणावर खर्च करता येते. यातील आरोग्याचा निधी वापरून ग्रामपंचायतीमध्येच मिनी आरोग्य उपकेंद्र चालू करावे, अशा सूचना आल्या.

याबाबत आरोग्यसेविका एम.पी.डब्ल्यू. आरोग्य अधिकारी यांच्याशी ग्रामसेवक व सरपंचांनी चर्चा करून लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये ग्रामपंचायतीमध्ये मिनी आरोग्य उपकेंद्र चालू करण्याचा निर्णय झाला. औषध ठेवण्यासाठी रॅक व प्रथमोपचारासाठी लागणारी औषधे, वजनकाटा, स्टॉकबुक रजिस्टर, किरकोळ औषधोपचार रजिस्टर इ. साहित्य ग्रामपंचायतीमार्फत व लोकसहभागातून घेण्यात आले व ग्रामपंचायत इमारतीमध्येच मिनी उपकेंद्राची स्थापना करण्यात आली. कोवाड येथे एक वेगळ्या पद्धतीने आरोग्यसेवा सुरू करण्यात आली. आरोग्यसेविका रेशमा पाटील, ग्रामसेवक अंकुश पाटील, सरपंच आक्काताई जगदाळे, ग्रामपंचायत सदस्य, तसेच संग्राम संस्थेच्या कार्यकर्त्या सुरेखा निंबाळकर, तालुका समन्वयक शिवाजी गुरव, आशा कर्मचारी, अंगणवाडी सेविका व  व्ही.एच.एन.एस. सदस्य या सर्वांच्या प्रयत्नांतून गावाला मिनी आरोग्य उपकेंद्र स्थापन झाले. लोकांना औषध पुरवठा व उपचार मिळू लागले. यासाठी तालुक्यामध्ये सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

केस स्टोरी नं. ५

**ग्रामस्थांनी वनखात्याच्या अधिकाऱ्यांना सरळ केले**

मौजे किटवडे (ता. आजरा) येथे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पिण्याचे पाणी जंगलाच्या जमिनीतून येत असून ते तुम्हाला घेता येणार नाही, अशा पद्धतीची भूमिका घेतली. सदरचे गाव अतिपावसाच्या ठिकाणचे असून, ते वनजमिनीला लागून आहे. त्यामुळे सदर गावाला वर्षानुवर्षे कायमस्वरूपी या जमिनीतून सायपन पद्धतीने पाण्याचा पुरवठा होत आहे. मात्र, सदरच्या सायपन पद्धतीने येणाऱ्या पाण्याची स्वच्छता करण्यासाठी ग्रामस्थांनी जंगलामध्ये जाऊन स्वच्छता करण्याचे ठरविले. मात्र, त्या ठिकाणी त्यांना जाण्यास वनविभागाने मज्जाव केला.

याबाबत ग्रामपंचायतीमध्ये व्ही.एच.एन.एस. समितीचे सदस्य, लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेतील कार्यकर्ते काशिनाथ मोरे, ग्रामसेवक प्रियांका भापकर यांच्यासह गावाची व्यापक बैठक घेण्यात आली. यामध्ये ३०० च्या वर ग्रामस्थांनी सहभाग घेतला. पिण्याचा पाण्याचा व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याने याचे गांभीर्य ओळखून सारा गाव एकवटला व चर्चा करण्यात आली. वनजमिनीच्या पाण्यावर आमच्या पिढ्यान्‌पिढ्या अवलंबून असून, हे आमच्या हक्काचे पाणी आहे व सरकारच्या कायद्यानुसार सदरची जमीन हीसुद्धा आमच्या मालकीचीच आहे, असे असताना आम्हा ग्रामस्थांचा अवमान करून पाण्याला विरोध करणे हा जुलूम आहे. तो कदापिही सहन न करण्याचा ग्रामस्थांनी हात उंचावून ठराव केला व तसा वनविभागाच्या विरोधात न्यायालयात दावा दाखल करण्याचा ठराव करून दावादेखील दाखल केला. विशेष म्हणजे या गावसभेसाठी वनविभागाच्या संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले होते, त्यामुळे तेही या सभेला हजर होते. याचवेळी गावच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना गावाने सुनावले की, 'हे पाणी आमच्या हक्काचे आहे. वहिवाटीची वनजमीन हाही आमचा हक्क आहे. ती आमच्या मालकीची आहे, त्यामुळे जोपर्यंत न्यायालयात निर्णय होत नाही, तोपर्यंत आमचे पाणी अडविण्याचा तुम्हाला अधिकार नाही. तसे घडल्यास गावच्या वतीने समाचार घेण्यात येईल'. त्यानंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी माघार घेत 'तुमचे पाणी अडविले जाणार नाही व वहिवाटीसाठी अडवणूक केली जाणार नाही' असे सांगितले.

केस स्टोरी नं. ६

**होय, दुर्गाचा जन्म उत्तूर आरोग्य केंद्रातच झाला**

संजीवनी दत्तात्रय सावंत या बाळंतणासाठी माहेरी उत्तूर (ता. आजरा) येथे आल्या होत्या. बहिरेवाडीतील दत्तात्रय सावंत यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला आहे. सासर व माहेरची परिस्थिती गरिबीची. वडील शिवाजी होरंबळे सेंट्रिंगचे काम करतात, तर आई सुनीता शिवाजी होरंबळे या घरकाम करतात. गेली तीन वर्षे

त्या आजाराने त्रस्त आहेत. संजीवनी यांचे पती दत्तात्रय सावंत हेदेखील मोलमजुरी करतात. वडील शिवाजी व आई सुनीता यांना मुलीच्या बाळंतपणाची चिंता वाटू लागली. मुलगी माहेरी बाळंतपणासाठी उत्तूर गावी आली. संजीवनी ह्या तपासणी व डोस घेण्यासाठी उत्तूर प्राथमिक आरोग्य केंद्रात जात होत्या. काही अडचण आल्यास सिझर वगैरे करावे लागल्यास खासगी दवाखान्यात जावे लागेल हा लोकांचा अनुभव. त्यामुळे आई, वडिलांनी मुलीच्या बाळंतपणाच्या खर्चाची तयारी म्हणून बचतगटाकडील कर्ज घेण्याचे ठरविले. सिद्धकला महिला बचतगटाकडे आईने कर्जाची मागणी केली. बचतगटाने ताबडतोब कर्ज मंजूर करून ५० हजार रुपये दिले. दरम्यान, लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या कार्यकर्त्या लता पाकले यांनी उत्तूर आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने गरोदर महिलांचा मेळावा घेतला व या कार्यक्रमात त्यांनी सविस्तर माहिती देण्यात आली.

सरकारी रुग्णालयात बाळंतपणाकरिता स्वतंत्र खोलीची व्यवस्था, तज्ज्ञ डॉक्टर, स्वच्छता, २४ तास महिला कर्मचारी, ए.एन.एम., ऑपरेशन थिएटर व अद्यावत साधनसामुग्री तसेच पेशंट व त्यांच्यासोबत असणाऱ्या नातेवाईकांना तीन दिवस जेवण, आशा कर्मचारी, बाळंतपण अडचणीचे असेल तर उपजिल्हा किंवा जिल्हा रुग्णालयाकडे पाठविण्यासाठी डॉक्टरांसह ॲम्ब्युलन्सची सोय याची सविस्तर माहिती देऊन विश्वास दिला. त्यानंतर गरोदर महिला संजीवनी सावंत यांची ५ फेब्रुवारी २०१९ रोजी उत्तूर आरोग्य केंद्रात नॉर्मल डिलिव्हरी झाली आणि दुर्गाचा जन्म झाला. दोन्ही कुटुंबीयांमधील तणाव दूर होण्याबरोबरच त्यांना समाधान वाटले. त्यानंतर आईने बचतगटाकडील काढलेल्या कर्जापैकी ५००० रुपये किरकोळ खर्चासाठी वापरले आणि बाकीचे पैसे परत केले. सरकारी दवाखान्यात बाळंतपण झाल्याने गरिबाचे पैसे वाचले, हे मात्र खरे.

■■■

# लोकाधारित देखरेख व नियोजन कार्यक्रम











# लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकिया, सांगली

## तालुका बत्तीस शिराळा

**१) प्रस्तावना**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात शिराळा परिसरातील ३२ खेड्यांचा महसूल येथील भुईकोट किल्ल्यावर जमा केला जात होता. त्यावरून शिराळा गावास बत्तीस शिराळा असे नाव पडले. शिराळा हा पश्चिम महाराष्ट्रातील एक डोंगराळ तालुका आहे. घनदाट जंगले व मुसळधार पाऊस असणारा हा प्रदेश. शिराळा तालुक्यातील जास्त गावे ही डोंगराळ आहेत, तसेच पूर्वभागातील लोकांची शेतीही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे या तालुक्यातील जास्तीत जास्त पुरुष मुंबईमध्ये कामासाठी म्हणून राहिले आहेत.

ज्यावेळेस लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकल्प या तालुक्यात राबविण्याचे ठरले, त्यावेळी ज्या भागास आरोग्य अधिकार/हक्क मिळत नाहीत, किंबहुना वंचित आहेत, अशा गावांची कार्यकर्त्यांनी निवड केली.

**प्रकल्पांतर्गत असणारी प्राथमिक आरोग्य केंद्रे व गावे**

**१) चरण**

| | |
|---|---|
| १) चरण | २) मोहरे |
| ३) नाठवडे | ४) काळुंदे |
| ५) खराळे | ६) चिंचेवाडी |
| ७) पणुंब्रे | ८) किनरेवाडी |
| ९) कुसळेवाडी | १०) कदमवाडी |
| ११) करूंगली | १२) मराठेवाडी |

**२) मणदूर**

| | |
|---|---|
| १) मणदूर | २) सोनवडे |
| ३) आरळा | ४) खुंदलापूर |
| ५) पाचगणी | ६) गुढे |
| ७) मिरूकेवाडी | ८) मानेवाडी |
| ९) बर्डेवाडी | १०) मणदूर, धनगरवाडा |
| ११) इनामवाडी | १२) खोतवाडी |

**३) शिरसी**

| | |
|---|---|
| १) शिरसी | २) बांबवडे |
| ३) धामवड | ४) पाचुंब्री |
| ५) गिरजवड | ६) कोंडाईवाडी |
| ७) अंबेवाडी | ८) टाकवे |

९) पणुंब्रे १०) घागरेवाडी

११) वाकुर्डे

'संग्राम'च्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून या तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये काम सुरू आहे. पूर्वी आपण प्राथमिक आरोग्य केंद्रात एचआयव्हीबाधित व्यक्तीस व्यवस्थित औषधोपचार मिळावेत तसेच त्याच्याशी भेदभाव व कलंकीत दृष्टिकोनातून डॉक्टर तसचे कर्मचारी पाहणार नाहीत, यासाठी काम सुरू होते. लोकाधारित नियोजन आणि देखरेख प्रकल्पाचा गाभा हादेखील याच्याशी निगडित होता. त्याच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्यसेवा बळकट करून समाजातील वंचित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविली. या प्रकल्पांतर्गत सार्वजनिक आरोग्यसेवा बळकटीकरणासाठी गावापातळी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका, जिल्हा तसेच राज्य पातळी अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर काम केले जाते. देखरेखीच्या माध्यमातून दृष्टिपथास येणारे प्रश्न व ते निर्गमीत करण्याची प्रक्रियासुद्धा या सर्व पातळ्यांवर निरंतर सुरू असते. या प्रक्रियेत फक्त आरोग्य व्यवस्थेत समाजापोटी निर्माण होणाऱ्या प्रश्नांवरच केवळ चर्चा होते असे नाही, तर जेव्हा आपण दर्जेदार सेवा मिळाली पाहिजे असे म्हणतो, तेव्हा सेवा देणाऱ्या व्यक्तीच्या आरोग्य आणि कामाच्या ठिकाणचे वातावरण तसेच कामाच्या ठिकाणचे प्रश्नदेखील या प्रक्रियेद्वारे मांडले जातात. त्यामुळे ही प्रक्रिया सार्वजनिक आरोग्यसेवा देणारी संस्था व आरोग्यसेवा घेणारे गावकरी आणि पी.आर.आय. सदस्य यांच्यातील दुवा बनून काम करते.

देखरेखीच्या माध्यमातून निदर्शनास आलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींमार्फत नियोजन करणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, हा या प्रक्रियेचा उद्देश आहे.

**३) डेटा कलेक्शन**

प्रक्रियेंतर्गत प्रक्रियेची सुरुवात करताना आपणास प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, अंगणवाडी व ग्रामपंचायतीची माहिती असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने राज्य समन्वयक संस्थेने प्रश्नावली दिली होती. त्या सर्व प्रश्नावल्या कार्यकर्त्यांनी समजावून घेतल्या व भरल्या. या प्रश्नावल्या भरल्यानंतर गावपातळीवर उपकेंद्र तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कोणकोणत्या कमतरता आहेत, तसेच प्रश्नावलीच्या माध्यमातून गावातून जी माहिती आली, त्यामध्ये गावाचे क्षेत्रफळ किती आहे, कोणकोणत्या सुविधा आहेत, शिक्षणाची स्थिती, रस्त्यांची परिस्थिती तसेच जात व धर्मनिहाय लोकसंख्या किती, या सर्वांची इत्यंभूत माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे आरोग्यव्यवस्था बळकटीकरणाच्या दृष्टीने आणि आरोग्यसेवा सामान्य व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यात कोणकोणते अडथळे आहेत, याची कल्पना आली आणि देखरेख प्रक्रियेचे काम सुरू केले.

**२) ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समिती**

शासनाच्या वतीने प्रत्येक गावासाठी ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. सदर समितीमध्ये कोणकोणत्या व्यक्ती, घटकांचा समावेश असावा याच्या सूचना लेखी स्वरूपात देण्यात आल्या आहेत; पण जेव्हा कार्यकर्त्यांनी शासनाच्या निर्णय पत्राप्रमाणे या समित्या आहेत का हे पाहिले असता, त्यांच्यामध्ये उणिवा आढळल्या, तसेच अंगणवाडी सेविका या समितीच्या सचिव होत्या; पण या समितीस मिळणारा निधी कशावर खर्च करायला याविषयी सदस्यांमध्ये एकवाक्यता होत नसल्यामुळे तो खर्च होत नव्हता. तसेच अनेक सचिवांनी काम करण्यास असमर्थ असल्याची लेखी पत्रे वरिष्ठांना दिली होती. त्यातच शासनाने सदर समित्यांचे पुनर्घटन करून आशा सेविकांना सचिवपद देण्याचा आध्यादेश काढला. या पत्राच्या आधारे तालुक्यातील देखरेख प्रक्रियेद्वारे आम्ही सर्वजण शिराळा गटविकास

अधिकाऱ्यांना भेटलो व आम्ही ज्या ३५ गावांमध्ये लोकाधारित नियोजन व देखरेख प्रकिया चालते, तेथील ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समितीचे पुनर्घटन करतो असे सांगितले. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी परवानगी दिली. त्यानुसार प्रक्रियेच्या माध्यमातून ३५ गावांमध्ये पुनर्घटन पूर्ण केले. प्रत्येक गाव आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पोषण समितीत जास्तीत जास्त वंचित घटकातील सदस्य तसेच ज्या स्त्रिया प्रतिनिधी आहेत, त्यादेखील वंचित घटकातून कशा सामील होतील व ते कसे गरजेच आहे, हे गावपातळीवरील लोकप्रतिनिधींना समजावून सांगितले. जवळपास सर्वच गावांमध्ये 'संग्राम' संस्था फार वर्षांपासून काम करीत आहे, तसेच त्याचा परिणाम या समित्यांचे पुनर्घटन करताना दिसत आहे, तसेच २ ते ३ गावांमध्ये विरोध झाला; पण आपल्या कामावर विश्वास असणाऱ्या लोकप्रतिनिधींना जाऊन भेटल्यावर त्यांनी तसे पुनर्घटन करून घेण्यास सांगितले.

**३) आशा सचिवांचा मेळावा**

ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा, पोषण आणि स्वच्छता समितीचे पुनर्घटन होऊन आशांची सचिव म्हणून नेमणूक केल्यावर त्यांच्या ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत घेतली आणि पंचायत समितीबरोबर बोलणे (ॲडव्होकसी) करून सचिवांचे काम काय, अकाऊंटस् कसे करायचे, या विषयावर कार्यशाळा आयोजित केली. प्राथमिक आरोग्य केंद्र चरण आणि मणदूरअंतर्गत येणाऱ्या सर्व गावांच्या आशा सचिवांचा कार्यशाळेत समावेश होता. ही कार्यशाळा चरण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मिटिंग हॉलमध्ये घेण्यात आली. अगोदर ज्या अंगणवाडी सेविका होत्या, त्यांच्या अकाऊंटस् व खर्चाची जबाबदारी कोण घेणार, तसेच सचिव म्हणून त्यांना कोणते कामे करावी लागणार? असे प्रश्न आशांमध्ये होते.

'संग्राम'च्या वतीने आम्ही सर्वप्रथम शासन आदेशाची झेरॉक्स प्रत प्रत्येक सचिवास दिली, ती त्यांना वाचून घेण्यास सांगण्यात आले. त्यानुसार ज्यावेळेस आशा सचिवांची निवड करण्यात आली. त्या दिवसापासूनच्या आर्थिक व्यवहारास अशा जबाबदार असून, मागील आर्थिक व्यवहारास जी सचिव होती, ती जबाबदार तसेच यासंदर्भातील ग्रामपंचायतीने ठरावदेखील केला आहे. त्याबरोबरच ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समिती अनेक आरोग्याचेच नव्हे, तर महिला सबलीकरण आणि सक्षमीकरण कसे योगदान देऊ शकते, याविषयी चर्चा झाली. कारण, या समितीस येणारा फंड व त्याचा विनियोग इतक्याच कामासंदर्भात ही समिती कार्यरत नाही, तर काही सूचना आणि स्त्रियांचे प्रश्न मांडण्यासाठी ह्या समितीद्वारे कसे व्यासपीठ निर्माण होईल, याविषयीही चर्चा झाली. आर्थिक व्यवहार करताना कोणती काळजी घ्यायची, शासन निर्णयात विहीत केल्याप्रमाणे आलेल्या फंडांचा विनियोग कसा करावा, तसेच कोणताही खर्च रोख स्वरूपात न करता चेकनेच (धनादेश) का करावा, यासंदर्भात खुलासेवार चर्चा झाली.

**४) प्राथमिक आरोग्य पातळीवरील देखरेख व नियोजन समित्या**

या प्रक्रियेत गावपातळीवरून ते राज्यपातळीवरील देखरेख व नियोजन समितीस अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि त्यास काही विशेष अधिकारदेखील आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थायी सुविधांचा अभाव आहे का? औषधसाठा नियमित आहे का? कर्मचारी वेळेवर येतात का? परिसर स्वच्छ आहे का? अशा विविध विषयांशी तसेच उपकेंद्र आणि अंगणवाड्यांशी निगडित अनेक प्रश्नांना वाचा फोडणारी तसेच ग्रामपंचायत स्तरावर अनेक प्रश्न सुटण्यासारखे असतात, त्यांचे मंच म्हणजे प्राथमिक आरोग्य पातळीवरील देखरेख आणि नियोजन समिती होय.

म्हणूनच या समितीची स्थापना करताना त्याचे सदस्य हे कृतिशील हवेत तसेच त्यांना वेळ देता यावा, त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेतील गावांमध्ये याविषयी चर्चा केली तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली व समिती कार्यरत केली. त्यामध्ये महिला प्रतिनिधींबरोबरच वंचित घटकातील जास्तीत जास्त लोकांना कसे सामावून घेता येईल, याविषयी जनजागृती करून समितीची स्थापना केली. आतापर्यंत चरण व मणदूर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये देखरेख आणि नियोजन समित्यांची स्थापना झाली असून, गावपातळी/उपकेंद्रस्तर आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर जी माहिती संकलन झाली, त्यातून जे मुद्दे समोर आले, त्यावर समितीच्या मिटिंगमध्ये चर्चा झाली.

मणदूर प्राथमिक आरोग्य केंद्रात समित्या स्थापन करण्यासंदर्भातील प्रक्रिया झाली आहे. ज्यांना सदस्य म्हणून नियुक्त करावयाचे आहे, अशा लोकांना भेटलो आहे; पण कार्यकर्ती सोडून गेल्याने ते अपुरे आहे, पण पुढील वर्षात तीदेखील पूर्ण होऊन तेथील समिती कार्यान्वित होईल.

**५) तालुका पातळीवरील देखरेख व नियोजन समिती**

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तराप्रमाणे तालुका पातळीवरील देखरेख आणि नियोजन समितीची स्थापना करण्यासाठी शिराळा पंचायत समितीचे तालुका वैद्यकीय अधिकारी व पंचायत समिती सभापती व उपसभापती सम्राट नाईक यांच्यासोबत प्राथमिक स्वरूपाची बैठक झाली. त्यामध्ये ही प्रक्रिया काय आहे व अशा प्रकारची समिती का असावी, याविषयी चर्चा झाली; पण हे सर्व लोक आपला राजकीय फायदा कसा होईल, त्यादृष्टीने समितीचे सदस्य सुचवत होते; पण कार्यकर्त्यांनी त्यांना या समितीपाठीमागची भूमिका व हक्क आधारित दृष्टिकोन याविषयी माहिती दिल्यावर त्यांनी हे लोकप्रतिनिधी आहेत यापैकी आपणास व ही प्रक्रिया पुढे नेण्याच्या दृष्टीने जे प्रतिनिधी हवेत ते घ्या व आम्हास समितीचे सदस्य निवडून टिपणी द्या असे ठरले. त्यानुसार वंचित घटकातील लोकप्रतिनिधी, स्त्री लोकप्रतिनिधी व पत्रकार, सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्ते अशी यादी तयार करून तालुकास्तरावरील देखरेख समिती स्थापन करून त्याची एक मिटिंग घेण्यात आली. सदर मिटिंगमध्ये लोकाधारित देखरेख नियोजन प्रकल्प ही प्रक्रिया कशी आहे, याविषयी चर्चा झाली.

**६) जिल्हास्तरावरील देखरेख व नियोजन समिती**

तालुकास्तराप्रमाणे जिल्हा स्तरावरदेखील जिल्हा कार्यक्रम अधिकारी, एन.एच.एम. व जिल्हा समन्वयक रुग्ण कल्याण यांच्यासोबत अनेकवेळा बोलणे करून जिल्हा स्तरावरील देखरेख व नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या आरोग्य सभापतींनी यास थोडा विरोध केला. त्यांनाही वाटत होते की, ही प्रक्रिया जलभागात का नाही. त्यावेळेस त्यांना आम्ही ऐच्छिक पद्धतीने गेली १० वर्षे ही प्रक्रिया संपूर्ण सांगली जिल्ह्यात राबवीत आहेत. मग त्यांचा विरोध मावळला ही प्रक्रिया व फंड एन.एच. व सार्वजनिक आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे कार्यान्वित होते हे सर्व बोलूण त्यांचे गैरसमज दूर केले.

यानंतर याची पहिली सभा सी.ई.ओ. यांच्या दालनात पार पडली. त्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच तालुकास्तरावर जे प्रश्न सुटले नाहीत, त्या प्रश्नांवर या मिटिंगमध्ये चर्चा झाली. वर्षात दोन मिटिंग होणे अपेक्षित असताना ग्रामपंचायत निवडणूक व लोकसभा निवडणुकीच्या अचारसंहितेमुळे दुसरी मिटिंग घेता आली नाही. कारण, या काळात लोकप्रतिनिधींना धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत. पुढील वर्षी किमान २ बैठका घेऊन ही समिती आरोग्य हक्कावर जागरूक करून कार्यरत ठेवण्याचा या प्रक्रियेचा मानस आहे.

या सर्वस्तरावर समित्या स्थापन झाल्यावर त्याचा सकारात्मक बदल दिसणे सुरू झाले.

**१) शिरसी प्राथमिक आरोग्य केंद्रास पाणीपुरवठा**

शिरसी प्राथमिक आरोग्य केंद्र हे गावातून साधारणपणे अर्धा किलोमीटर लांब आहे. सर्वप्रकारच्या व्यवस्थेने सुसज्ज असे हे केंद्र असतानादेखील प्रक्रिया राबविताना असे लक्षात आले की, या दवाखान्यात बाळंतपण केले जात नसून, अधिक प्रमाणात रेफरल दिले जाते. मग त्या गरोदर महिलेला एकतर कराड किंवा तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या शिराळा येथे पाठविण्यात येत होते. असे का केले जाते याची माहिती घेण्यासाठी त्याच्या मुळाशी गेल्यावर असे लक्षात आले की, प्राथमिक आरोग्य केंद्रातील बोअरमधून पुरेसा पाणीपुरवठा होत नाही, त्यामुळे या केंद्रात बाळंतपण करणे शक्य होत नाही. तसेच ओ.टी.च्या स्वच्छतेसाठी खूप पाणी लागते. अनेक कुटुंबीयांना कराड किंवा शिराळा येथे जाऊन बाळंतपण करणे खर्चिक वाटते. किंबहुना अनेक कुटुंबे कर्जबाजारी होऊन बाळंतपण खासगी दवाखान्यात करून घेत.

हा प्रश्न आम्ही प्रक्रिया म्हणून ग्रामपंचायतीच्या मिटिंगमध्ये तसेच गाव आरोग्य पाणीपुरवठा व स्वच्छता आणि पोषण समितीच्या मिटिंगमध्ये मांडला, तसेच जिल्हा परिषद सदस्य आशा झुमूर आणि सरपंचांसोबत वारंवार चर्चा केली. त्यावेळी असे ठरविण्यात आले की, १४ व्या वित्त आयोगाच्या फंडातून सेपरेट पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत टाकायची. त्यानुसार १४व्या वित्त आयोगातून पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. ग्रामपंचायतीने नळ कनेक्शन देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रास पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यामुळे आता शिरसी आरोग्य केंद्रात बाळंतपण केली जात आहेत.

**२) समितीची मिटिंग**

गाव आरोग्य पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समितीच्या मिटिंगच्या अगोदर गावातील वंचित घटकातील महिलांच्या कार्यक्रमातून या समितीची मिटिंग केव्हा आहे, तसेच आपले काही प्रश्न आसतील तर आपण उपस्थित करा यादृष्टीने प्रकियेंतर्गत महिला कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सदर कार्यकमातून पणुंब्रे, पाचुंब्री, टाकवे, चिंचेवाडी, मानेवाडी येथे दूषित पाणीपुरवठा होण्याबरोबरच वेळेवर पाणीपुरवठा होत नाही, याविषयी तक्रारी होत्या. आम्ही त्या महिलांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी समितीच्या मिटिंगला येऊन आपणच आपले मुद्दे मांडले पाहिजेत हे पटवून दिले. आपल्या हक्कासाठी आपणच खंबीरपणे उभे राहिले पाहिजे तसेच जे या प्रश्नी त्रासाला सामोरे जातात त्यांनी तो मांडला, तर त्या प्रश्नांची धार आणखीन वाढते आणि त्यात अधिक सत्यता असते. हे मुद्दे स्त्रियांना पटवून दिल्यावर त्यांना ते पटले व जेथे जेथे अपुरा व दूषित पाणीपुरवठा होतो, त्या गावातील समितीच्या मिटिंगला स्थानिक व त्यातल्या त्यात वंचित घटकांतील स्त्रियांनी व कार्यकर्त्यांनी प्रश्न मांडले व त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न झाला. पाचुंब्री आणि टाकवे येथील समितीच्या मिटिंगवेळी पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना बोलवून घेऊन समज दिली. यावेळी राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचे स्वागतदेखील करण्यात आले.

**३) ग्राम आरोग्य पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समिती मासिक मिटिंग**

या समितीच्या मिटिंग अगोदर कागदोपत्री दाखविल्या जायच्या. आशांची सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतर तसेच समितीचे पुनर्घटन झाल्यापासून समित्यांच्या नियमित मासिक मिटिंग होऊ लागल्या. लोकसहभाग वाढल्यामुळे मिटिंगच्या अगोदरच मिटिंगमध्ये कोणत्या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे, याविषयी आशांबरोबर गावातील लोक बोलू लागले. इतकेच नव्हे तर लोक या समितीच्या मिटिंगमध्ये प्रश्न मांडू लागले. यामुळे या प्रक्रियेंतर्गत या समित्या कार्यरय रहाव्यात म्हणून त्यांच्यासमवेत किशोरवयीन मुलींचे मेळावे, आरोग्य

तपासणी शिबिर, महिलांचे मासिक पाळीचे प्रश्न या विषयांवर गावपातळीवर जनजागरणाचे कार्यकम होऊ लागले, त्यामुळे आरोग्य हक्क चळवळीस बळकटी येऊ लागली आणि चळवळीत लोकसहभागाचा टक्का वाढला.

**४) मिरूकेवाडी दूषित पाणीप्रश्न आणि झालेली प्रक्रिया**

मणदूर ग्रामपंचायतअंतर्गत मिरूकेवाडी हे गाव येते. गावाचा बराच भाग जंगल आणि डोंगराळ आहे. ग्रामपंचायतीने डोंगरातून सायपन पद्धतीने पाणी आणले आहे. ते पाणी डोंगराच्या पायथ्याशी बांधलेल्या टाकीत नैसर्गिक पद्धतीने साठते. हेच पाणी मिरुकेवाडीवासीयांना दिले जाते; पण अनेक दिवसांपासून गावास दूषित पाणी येत होते, यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी झाल्या. टाकीची स्वच्छतापण करण्यात आली; पण दूषित पाणी बंद होत नव्हते. त्यामुळे गाव आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने गावफेरीचे नियोजन केले. सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य तसेच समिती सदस्य प्रक्रियेतील कार्यकर्त्यांनी पाणी जिथून येथे त्या सुरुवातीच्या व्हॉलपर्यंत पाहणी केल्यावर टाकीपासून गावापर्यंत असणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईन तीन ठिकाणी फुटल्याचे निदर्शनास आले. मग सरपंच म्हणाले, 'खुर्चित बसून प्रश्न सुटत नाहीत, तर त्यासाठी समाजापर्यंत पोहोचावयास पाहिजे. मगच ही प्रक्रिया परिवर्तनाची नांदी ठरेल.' त्या दिवसापासून सरपंच वसंत पाटील प्रत्येक महिन्याला गावफेरी काढतात आणि गावपातळीवरील सर्वच गटांतील समस्या ऐकून घेतात. किंबहुना त्यांचे निर्गमीकरण होत नाही, तोपर्यंत ते पाठपुरावा करतात.

**५) मातृवंदन योजनेचा लाभ**

महिला कार्यक्रम आयोजित करत असताना प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या आरोग्यसुविधा व राज्य शासनाच्या विविध योजना यांविषयी आम्ही चर्चा करतो. हे करीत असताना चरणमधील वंचित घटकामधून असे निदर्शनास आले की, तीन स्त्रियांना मातृवंदन योजनेचा लाभच मिळालेला नाही. त्याची ए.एन.एम. (ऑक्झिलरी नर्सिंग मिडवाईफरी)कडे चौकशी केली आसता त्या म्हणायच्या की, त्यांच्या खात्यावर पैसे वर्ग झाले आहेत. कार्यकर्तीनेपण त्या पोर्टलवर पाहिल्यास पैसे वर्ग झालेत असेच दिसत होते; पण त्या स्त्रिया म्हणायच्या की पैसे मिळाले नाहीत. त्यावर कार्यकर्त्यांनी त्यांना त्यांची बँकेची पासबूक घेऊन येण्यास सांगितले व त्यात एंट्री आहे का ते पाहिले; पण तशी कोणतीच एंट्री दिसत नव्हती. मग ती पासबुके व त्या स्त्रियांना घेऊन कार्यकर्ती ए.एन.एम.कडे गेली व तिला पासबुके दाखवली असता, रक्कम चुकीच्या बँक खात्यावर जमा केल्याचे निदर्शनास आले. सुरुवातीला ती ए.एन.एम. टाळाटाळ करीत होती; पण कार्यकर्तीने आम्ही हा प्रश्न जनसुनावणीत मांडणार असे म्हटल्यावर ती रक्कम संबंधितांच्या नावावर जमा केली, तसेच इथून पुढे दुर्लक्ष होणार नाही, याचीही ग्वाही दिली.

**६) आशांचे औषधांचे किट रिफील केले**

सार्वजनिक आरोग्यसेवा व समाज यांच्यामधील दुवा म्हणजे आशा कार्यकर्ती. सार्वजनिक आरोग्यसेवेचा कोणताही उपक्रम पूर्णत्वास जायचा असेल तर आशा कार्यकर्ती हवीच. आशांची नियुक्ती झाली त्यावेळेस त्यांना प्राथमिक उपचारासाठी औषधाचे किट दिले गेले होते. त्यामुळे आशा कार्यकम राबवित असताना कोणास त्यातल्या त्यात स्त्रियांना डोकेदुखी, अंगदुखी, हगवण, सर्दी, मासिक पाळी पुढे ढकलणे या प्राथमिक स्वरूपाच्या तक्रारींवर त्यांच्याकडे औषधे उपलब्ध होती; पण अलीकडच्या अनेक वर्षांत शासनाने त्यांचे किट रिफिल केले नव्हते. आशांची अशी मागणी होती की, प्रथमोपचारासाठी औषधे हवीत. हा मुद्दा गाव आरोग्य,

पाणीपुरवठा, पोषण व स्वच्छता समितीसमोर मांडण्यात आला. त्यावेळी समितीने सकारात्मक निर्णय घेऊन समितीच्या निधीतून आरोग्यास जो निधी खर्च करावयास आहे, तो आशा, डॉक्टर, ए.एन.एम. यांनी मिळवून देऊन औषधे खरेदी केली. त्याचा लाभ गरजूंना होत आहे आणि खरेदी ही कमिटीमार्फत झाल्यामुळे त्यात गैरव्यवहार होण्याची शक्यता कमी झाली.

**७) अंगणवाडीतील मुलांचे आरोग्य आणि आहार**

प्रक्रियेंतर्गत सहभागी असणाऱ्या गावांतील अंगणवाड्यांची पाहणी करून अंगणवाड्यांच्या इमारती तसेच आहारविषयी त्यांची काय परिस्थिती आहे, याविषयी माहिती घेतली असता अनेक अंगणवाड्यांचे छप्पर खराब झाले होते, तर काही अंगणवाड्यांच्या भिंतींना तडे गेले होते. याविषयी ग्रामपंचायतीच्या मासिक मिटिंगमध्ये चर्चा घडवून आणली. त्यातून काही जिल्हा परिषद सदस्यांच्या स्थानिक फंडातून तसेच ग्रामपंचायतीच्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून या अंगणवाड्यांची डागडुजी करण्यात आली.

अंगणवाडी सेविका व आहार व्यवस्थापक यांच्याबरोबर आहार करीत असताना परिसर स्वच्छता आणि आहार यांविषयी कार्यक्रम घेण्यात येतो. धनगरवाडा येथील अंगणवाडीला भेट दिल्यानंतर असे निदर्शनास आले की, आहार व्यवस्थित व निवडून दिलेल्या तक्त्याप्रमाणे दिला जात नाही, तसेच वजन, उंचीचे रजिस्टर व्यवस्थित नव्हते. गावामध्ये महिला कार्यक्रम घेऊन त्या अंगणवाडीच्या समस्येविषयी चर्चा केली. त्यानंतर स्त्रिया एकत्र होऊन अंगणवाडीतत गेल्या आणि त्यांनीही पाहणी केली असता सदर बाब निदर्शनास आली. त्यांनी त्या अंगणवाडी सेविकेस आणि मदतनिसास, 'तुझी मुले इथं शिकत असती, तर तू अशीच काळजी घेतली असतीस का?' असा प्रश्न विचारून फैलावर घेतले. त्यावेळी इथून पुढे व्यवस्थित काळजी घेते, असे अंगणवाडी सेविका म्हणाल्या व प्रत्येक महिन्याला अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि त्या अंगणवाडीतील मुलांच्या आया यांची मासिक मिटिंग घेण्यास सुरुवात केली. त्यातून अंगणवाडीला किरकोळ स्वरूपातील मदत हवी असल्यास स्त्रिया त्यासाठी तयार झाल्या.

**८) औषधसाठ्याची माहिती**

प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषधसाठ्याचा सर्व्हे करून तो एसएमएसद्वारे राज्य समन्वय संस्थेस पाठविणार आला. ज्यामध्ये अत्यावश्यक २४ औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असून बंधनकारक आहे; पण अनेक औषधांचा साठा बफरस्टॉकच्या खाली आढळून आला. यासंदर्भात डॉ. सुनील पाटील व संचालक आरोग्यसेवा यांच्याबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ही बाब निदर्शनास आणून दिल्यावर शासनाच्या खरेदीमध्ये नवीन एजन्सीमुळे दिरंगाई झाली असल्याने एप्रिल २०१९ पर्यंत औषधपुरवठा सुरळीत होईल असे ते म्हणाले; पण त्यांनी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णकल्याण निधीतून संबंधित औषधे खरेदी करण्याच्या सूचनाही दिल्या. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रवेशद्वारी सध्या किती औषधसाठा उपलब्ध आहे, हे लिखित स्वरूपात असणे बंधनकारक आहे, असे असतानासुद्धा काही औषधनिर्माते त्याचं पालन करीत नव्हते; पण हेसुद्धा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तसेच औषधनिर्मात्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या भिंतींवर रोजच्या रोज किती औषधसाठा आहे तो लिहिला जातो. किंबहुना औषधसाठा लिहिला नसेल तर कार्यकर्ती तो साठा लिहिण्यास भाग पाडते.

**९) महिला कार्यक्रम/किशोरवयीन कार्यक्रम/महिला बचतगट कार्यक्रम**

जास्तीत जास्त महिलांनी सार्वजनिक आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, यासाठी वंचित घटकातील महिलांबरोबर

महिला कार्यक्रम घेतले जातात. त्यात मासिक पाळी व त्या दिवसातील स्वच्छता तसेच एचआयव्ही/एडस् व गुप्तरोग, बाळंतपण व घ्यावयाची काळजी, बाळंतपणातील शासनाच्या वेगवेगळ्या योजना व त्यासाठी लागणारी कागदपत्रे, महिलांचे हक्क व आरोग्य अधिकार या वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली जाते. तसेच गुप्तरोग व एचआयव्हीपासून बचाव कसा करावयाचा, यासाठी निरोधचा वापर व प्रात्यक्षिक करून दाखविले जाते.

**१०) महालॅब व त्याचा उपयोग**

शासनाने पीपीपीद्वारे प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात महालॅब उभी केली आहे. यासंदर्भात महिला कार्यक्रमांद्वारे प्रबोधन केले जाते. आपणास कोणत्याही डॉक्टरने कोणतीही तपासणी करावयास सांगू देत ती खासगी लॅबमध्ये न करता आपण ती महालॅबमधून करून घ्यावी, यासाठी महिलांमध्ये प्रबोधन केले जाते. रक्ताच्या सर्व चाचण्या इथे पार पडतात.

**११) विकेंद्रित नियोजन आराखडा कार्यशाळा**

विकेंद्रित नियोजन आराखडा (Decentralised Health Plan) हा आपल्या प्रक्रियेत समाविष्ट नाही; पण आपण रिसोर्स पर्सन म्हणून त्यात सहभागी व्हावे असे शासनाचे मत होते. त्यामुळे आपण 'संग्राम' संस्था, शिराळा पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सभापती, उपसभापती यांच्या कार्यशाळेचे आयोजन केले. सदर कार्यक्रमातून गावपातळीवर, उपकेंद्र पातळीवर, प्राथमिक आरोग्य केंद्रपातळीवर आरोग्यसेवेच्या निगडित गरजा काय आहेत व त्या कोणकोणत्या टप्प्यावर सोडविता येतील व अशा कोणत्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा आहेत, ज्या शासनाच्या पीआयपीमध्ये सामील करता येतील यासंदर्भात कार्यशाळा पार पडली.

**१२) मिशन इंद्रधनुष्य**

राज्य आरोग्यसेवेमार्फत ज्या तालुक्यात बाळंतपण, लसीकरण, शासकीय योजना यांच्या कामात कमी पडतात, त्या तालुक्यांचा समावेश 'मिशन इंद्रधनुष्य'मध्ये केला जातो. शिराळा तालुका यावर्षी याबाबतीत रेडझोनमध्ये होता. यासंदर्भात मंडल कार्यक्रम अधिकारी (राष्ट्रीय आरोग्य अभियान) कुडचे मॅडम यादेखील जिल्हा आरोग्य नियोजन कार्यशाळेस उपस्थित होत्या. त्यांनी लोकाधारित देखरेख प्रक्रियेत या कार्यक्रमात मदत करावी, असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे कार्यकर्त्यांनी विविध कार्यकमांत बाळंतपण व गरोदरपणातील लाभापासून वंचित स्त्रियांना तो लाभ होण्यासाठी प्रवृत्त केले, तसेच कागदपत्रांच्या अडचणी असल्यास त्या सोडविण्यासाठी मदत केली.

**१२) ग्रामसभा**

शक्य तितक्या ग्रामसभांना उपस्थित राहून कार्यकर्त्यांनी लोकाधारित देखरेख प्रक्रियेविषयी ग्रामसभेत मांडणी केली. तसेच आरोग्याचे हक्क अधिकार व सार्वजनिक आरोग्यसेवा बळकटीकरणासाठी लोकलढा उभा करणे व लोकसहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

**१३) अतिजोखमीच्या मातांसोबत**

प्रक्रियेंतर्गत ज्या गरोदर स्त्रियांचे हिमोग्लोबीन ३ पेक्षा खाली आले आहे, त्यांना अतिजोखमीच्या माता संबोधले जाते. गरोदर माता ज्यावेळी लसीकरणास येतात, त्यावेळी त्यांचा रक्तदाब, वजन, उंची, एचआयव्ही टेस्ट केली जाते. त्यातून ज्या मातांचे हिमोग्लोबीन प्रमाणापेक्षा कमी आहे किंवा ज्या स्त्रिया व क्लिरस

पॉझिटिव्ह येतात त्यांचा कार्यकर्त्यांमार्फत फॉलोअप घेतला जातो. याच्याव्यतिरिक्त ज्या गरोदर माता प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचत नाहीत, अशा मातांची माहिती महिला कार्यकमातून मिळते. त्यांची भेट घेऊन त्यांना बाळंतपणात घ्यावयाची काळजी आणि लसीकरणाचे फायदे यांविषयी माहिती देऊन त्यांना औषधोपचारासाठी तयार केले जाते.

वंचित घटकांतील वंजारी गोसावी समाजातील स्त्रिया रुग्णालयात (प्राथमिक आरोग्य केंद्रात) अजिबात जात नव्हत्या. त्या म्हणायच्या, 'आमच्या जातीत घरातच सर्व करतात.' तसेच त्या लसीकरणही करीत नव्हत्या. त्या ठिकाणी कार्यकर्त्यांनी ४ वेळा कार्यक्रम घेऊन तेथील २ महिलांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले व त्यांचे लसीकरण पूर्ण केले. त्यातील एका स्त्रीचे हिमोग्लोबीन ६ होते. तिला आयर्न सुक्रोसचे इजेक्शन देऊन उपचार पूर्ण केले. त्यामुळे पुढील दोन महिन्यांत तिचे हिमोग्लोबीन ९ च्यावर गेले. हे पाहून तेथील स्त्रियांमध्ये रुग्णालयात जाण्याबाबतचा न्यूनगंड कमी होऊन येथून पुढे आम्ही रुग्णालयात जाऊन औषधोपचार घेऊ असे त्या म्हणाल्या.

## प्रक्रियेतून न झालेल्या बाबी

**१) जनसंवाद**

अ) प्रा. आ. केंद्र पातळीवरील

ब) तालुका पातळीवरील

क) जिल्हा पातळीवरील

यावर्षी सदर स्तरावरील जनसंवाद घडणे अपेक्षित होते; पण लोकसभेच्या आचारसंहितेमुळे हे घडून येणे शक्य झाले नाही. कारण, लोकप्रतिनिधी यात सहभागी होऊ शकत नव्हते. तसेच ते महत्त्वाचे व धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात ते घेता येत नव्हते. त्यामुळे जनसंवाद घेणे अशक्य झाला; पण पुढील वर्षाच्या सुरुवातीला ते पूर्ण करण्यात येतील.

---

**तक्रार निवारण**

**नाव : अनिता प्रकाश लोहार**

रा. चरणवाडी, ता. शिराळा, जि. सांगली.

मी अनिता प्रकाश लोहार (वय २३, रा. चरणवाडी, ता. शिराळा, जि. सांगली). ऑक्टोबर २०१७मध्ये माझे बाळंतपण झाले. बाळंतपणाअगोदर माझे तिसऱ्या महिन्यात प्रधानमंत्री मातृत्ववंदना योजनेसाठी नाव दाखल करून घेतले होते. सोबत आधार कार्ड, रेशनकार्ड, बँक पासबुक व गरोदरपणातील लसीकरणाचे कार्ड या सर्वांची झेरॉक्स प्रत जोडून अर्ज दाखल करून घेण्यात आला. या योजनेंतर्गत पहिला महिन्यात १००० रुपये, सातव्या महिन्यात २००० रुपये व प्रसूतीनंतर २००० रुपये असे ५००० रुपये माझ्या बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित होते. माझ्या प्रसूतीनंतर मी बँकेत जाऊन चौकशी केली असता अशी कोणतीही रक्कम खात्यावर जमा झाली नव्हती.

यासंदर्भात मी प्राथमिक आरोग्य केंद्रात ए.एन.एम. कांबळे यांच्याकडे चौकशी केली असता त्या म्हणाल्या, 'तुमच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत.' पण मी त्यांना सांगत होते पैसे जमा नाहीत. असे अनेक

दिवस मी त्याचा पाठपुरावा केला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यावर कळस म्हणजे त्या मला म्हणाल्या, 'तुझ्या माहेरच्या बँक खात्यावर जमा झाले असतील.' पण माझे माहेरी कोणतेही बँक खाते नव्हते.

या सगळ्याला वैतागून मी त्यांचा नाद सोडला. माझ्या प्रसूतीनंतर दीड वर्षाने 'संग्राम'च्या कार्यकर्त्या अलका पाटील यांनी आमच्या लोहार गल्लीमध्ये महिला कार्यक्रम घेतला होता. सदरच्या कार्यक्रमासाठी मीही गेले होते. त्यावेळेस त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या सुविधा व गरोदरपणातील घ्यावयाची काळजी तसेच विविध सरकारी योजनांविषयी माहिती देत होत्या. त्यांचा कार्यक्रम झाल्यावर त्यांना मी माझी अडचण सांगितली. त्यांनी अगोदर माझी चौकशी केली व लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकल्प शिराळा तालुक्यात 'संग्राम' संस्थेच्या वतीने सुरू आहे व त्यासाठी चरण प्राथमिक आरोग्य केंद्रास महिला कार्यकर्त्यांची गरज आहे. तेव्हा तू काम करशील का असे विचारले. मला सामाजिक कामाची आवाड होती. नक्की कशा प्रकारचे काम करावे लागले, याची माहिती घेऊन मी हो म्हणाले व 'संग्राम' सीबीएमपी प्रकल्पात चरण ब्लॉक कार्यकर्ती म्हणून काम सुरू केले.

सुरुवातीला माझ्या असे लक्षात आले की, समाजातील अजून बऱ्याच लोकांना आरोग्यसुविधा मिळत नाहीत. त्यांना ती कशी मिळवून देता येईल, यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यातच मला मातृवंदना योजनेचा लाभ मिळाला नव्हता. त्याचे एक कुतूहल होते की, या पैशाचे नक्की काय झाले असेल? यासंदर्भात मी डॉ. जमादार यांच्याशी बोलले. तसेच अलका पाटील आणि मी पुन्हा कांबळे सिस्टरना यासंदर्भात विचारणा केली. त्यांनी आम्हास एएनसी पोर्टलवर मला मातृवंदना योजनेचे पैसे आदा झाले आहेत असे दाखविले. मग दुसऱ्या दिवशी आम्ही माझे बँक पासबुक घेऊन त्यांच्याकडे गेलो आणि सदरची एंट्री कुठे आहे, याची विचारणा केली; पण त्या उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्या. आम्ही सदरचा मुद्दा येणाऱ्या जनसुनावणीमध्ये मांडणार आहोत, असे सांगितल्यावर त्या म्हणाल्या, १५ दिवसांत काय ते सांगते.

आठ दिवसांनी पाहते तर माझ्या बँक खात्यावर ५४०० रुपये जमा झालेले दिसले; पण मला अजूनही कुतूहल होते की, इतके दिवस माझे पैसे कुणाकडे होते? त्यावळी असे लक्षात आले की, सदरची रक्कम रामचंद्र कांबळे यांच्या बँक खात्यावर जमा झाली होती. आज मी 'संग्राम' संस्थेबरोबर जोडली गेल्यामुळे मला बळ आले व मी माझ्या हक्काचे पैसे प्राप्त शकले; पण समाजामध्ये आजही कितीतरी माता अशा हक्कापासून वंचित असतील, त्यामुळे प्रत्येक महिला कार्यक्रमात मी यासंदर्भात अवर्जून बोलते. सरकारी योजनांचा लाभ घेतेवेळी कागदपत्रांची पूर्तता करताना काय काळजी घ्यावी हे मी सांगते. ज्याप्रमाणे माझा हक्क डावलला गेला, त्याप्रमाणे समाजातील कोणत्याही स्त्रीचा हक्क डावलला जाऊ नये, असे मला मनोमन वाटते.

■■■

# विद्रोही महिला मंच

महिलांसाठी विद्रोही महिला मंच स्थापन करण्यात आला असून, या मंचच्या माध्यमातून सांगली जिल्ह्यात ग्रामीण महिलांना प्रबोधन करण्यासोबतच त्यांच्या आरोग्यविषयी जनजागृती तसेच महिलांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार तसेच हिंसेविरोधी कार्य करण्यास पुढाकार घेण्यात येतो. विद्रोही महिला मंचला २०१८ ते २०१९ या कालावधीत काम करत असताना आलेले यश खालीलप्रमाणे...

१) हिंसात्मक (उदा. अन्याय, अत्याचार, मारहाण इ.) प्रकारांना कसे सामोरे जायचे, याबाबत जागृती करण्यासाठी जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचलो.

२) गावपातळीवर 'पीएलव्ही' (पॅरा लिगल व्हॉलंटिअर) म्हणून कायद्याची माहिती देऊ शकलो.

३) ग्रामीण स्तरावरील वंचित घटकांमधील सदस्यांची नेमणूक करून त्यांना स्वतःमधील ध्येयाची जाणीव करून दिली.

४) ग्रामसभेमध्ये महिलांना बोलण्याची व प्रश्न मांडण्याची संधी मिळावी, यासाठी प्रयत्न केले.

५) थोर विचारवंतांचे विचार, अनुभव कथन करून त्याबाबत समाजात प्रबोधन करण्याचे कार्य केले.

६) गावपातळीवर महिलांची संघटना उभा करण्यात यशस्वी झालो.

## ■ विद्रोही महिला मंचच्या कामाची माहिती

१) समाजामध्ये महिलांवर अन्याय, अत्याचार होत असल्याचे दिसत असले, तरी त्यातही वंचित घटकांतील महिला जास्त प्रमाणात अशा प्रवृत्तीला बळी पडत असल्याचे निदर्शनास आले. त्याअनुशंगाने विद्रोही महिला मंचने गावा-गावांमध्ये जाऊन महिलांसाठी प्रबोधन कार्यक्रम घेतले. त्याचबरोबर बचतगट, अंगणवाडी तसेच गल्ल्या-गल्ल्यांमध्ये कार्यक्रम, ग्रुप चर्चा घडवून आणण्यासोबतच वंचित घटकांतील महिलांच्या बैठका घेऊन अन्याय, अत्याचाराबाबत जागरूकता निर्माण केली.

हिंसा म्हणजे काय? हिंसेचे प्रकार कोणते? हिंसा झाल्यास कोणाची मदत घ्यावी? न्यायव्यवस्थेची माहिती, गावपातळीवरील ग्रामएकता समितीची या कार्यक्रमांद्वारे माहिती दिली. या माध्यमातून आम्हाला जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचणे शक्य झाले.

मागील वर्षाच्या प्रारंभी विद्रोही महिला मंचमार्फत एकूण २१४ महिलांवर झालेल्या हिंसेबाबतच्या तक्रारी हाताळल्या. यामध्ये वंचित घटकांतील ८५, मुस्लिम १३, मराठा ४० आणि इतर ५० अशा महिलांचा समावेश होता.

२) अशा महिलांच्या तक्रारींचे निवारण करीत असताना असे निदर्शनास आले की, त्या तक्रारींचे निवारण गावपातळीवर होणे अशक्य होऊ लागले. उदा. पती-पत्नीमधील भांडणात त्यांना गावपातळीचा निर्णय मान्य होत नाही, म्हणून आम्ही महिलांची कायदेविषयक माहिती घेऊ लागलो. त्यानंतर 'पीएलव्ही'चे ट्रेनिंग घेतले आणि ज्यांना कायद्याची मदत लागेल, त्या महिलांपर्यंत पोहोचून त्यांना विधि प्राधिकरण सेवेची माहिती देऊ लागलो. परिणामी, २१४ पैकी १६ महिलांना आम्ही 'पीएलव्ही'मार्फत न्याय देण्यात यशस्वी ठरलो.

३) गावपातळीवर ग्रामपंचायतमध्ये परंपरेनुसार जातीयता, रुढी–परंपरांनुसार पुरुषांचेच वर्चस्व असते आणि त्यातूनच जात–धर्मानुसार गाव चालविले जाते; पण समाजातील वंचित घटकांचा विचारच केला जात नसे. त्यांना कायम गावकुसाबाहेर ठेवले होते.

यासाठी ग्रामएकता समिती तयार करत असताना आम्ही वंचित घटकातील सदस्यांना प्राधान्य दिले. कारण, गावामध्ये परंपरेनुसार जात बघून न्याय दिला जात असे. वंचित समाजावर अगोदरपासूनच अन्याय होत होता; पण ग्रामएकता समितीमध्ये जर सवर्ण लोक जास्त घेतले, तर वंचित लोकांचा आवाज जास्तच दाबला जातो. त्यामुळे अन्यायाविरोधी आवाज उठविण्यासाठी अशा वंचित लोकांना 'ग्रामएकते'मध्ये सामाविष्ट केले.

हे सर्व करत असताना गावातील लोकांना आपले ध्येय काय आहे, हे पटवून दिले. कारण, गावामध्ये सर्वधर्मसमभाव रहावा आणि हिंसा नष्ट व्हावी, हे पटवून दिले आणि 'ग्रामएकते'मध्ये सदस्याची नेमणूक केली.

सांगली जिल्ह्यात विद्रोही महिला मंचमार्फत ग्रामएकता समिती निर्माण केली असून, प्रत्येक समितीमध्ये वंचित घटकांतील स्त्री–पुरुषांना सदस्य म्हणून घेतले गेलेच पाहिजे, यादृष्टीने प्रक्रिया राबविली. आजअखेर ७९ ग्रामएकता समितींमध्ये एकूण १०६५ सदस्यांपैकी ५१६ वंचित सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे.

४) विद्रोही महिला मंचच्या सर्व कार्यकर्त्यांना 'संग्राम'मार्फत भारतातील थोर समाजसुधारकांविषयी लताताईंनी माहिती दिली. त्यानंतर आम्ही महिलांपर्यंत हे विचार पटवून देऊ लागलो.

या माहितीचा आधार घेत महिलांना समाजसुधारकांचे विचार सांगून प्रत्येक गावामध्ये गौतमबुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जिजाबाई, सावित्रीबाई फुले, माता रमाई, फातिमा बी शेख यांच्या विचारांचा प्रसार करू लागलो, तसेच जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये थोर समाजसुधारकांची जयंती साजरी करू लागलो. त्याचबरोबर ग्रामपंचायतीमध्ये संविधानदिन साजरा करू लागलो. हे सर्व करीत असताना महिलांना समाजातील विचार समजू लागले. 'पीएलव्ही'कडून माहिती मिळू लागली आणि यामधून महिला सक्षम होऊन त्या ग्रामसभेला उपस्थित राहून आपले प्रश्न मांडू लागल्या. तसेच आपला हक्क, अधिकार मागू लागल्या.

५) विद्रोही महिला मंचमार्फत गेल्या वर्षभरामध्ये आम्ही सातत्याने महिलांच्या आरोग्याबाबत तसेच घरगुती हिंसेविरोधी विविध पातळ्यांवर जनजागृती अभियान राबविले. यामध्ये गावपातळीवरील स्त्रियांमध्ये सतत संपर्कात राहून संघटना बांधणीविषयीदेखील माहिती दिली, त्यामुळे अनेक महिला विद्रोही महिला मंचशी जोडल्या गेल्या आहेत. संघटनेचा भाग बनत आहेत. विद्रोही महिला मंचमार्फत इतर सामाजिक चळवळींबरोबर आमचा सहभाग वाढला आहे. याचे उदाहारण म्हणजे महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद, जनआरोग्य अभियान, लोकाधारित देखरेख प्रकिया, लोकअदालत, संविधान बचाव मोर्चा यांमध्ये सहभागी झालो आहोत. समाजामध्ये स्त्रियांची संघटना उभारत असताना 'संग्राम'मार्फत प्रकाशित केलेल्या 'स्त्री समाजसुधारक' या पुस्तिकेचा आम्ही कार्यकर्त्या वापर करीत आहोत.

विद्रोही महिला मंच संघटनेचे जाळे वाढविण्याच्यादृष्टीने जागतिक महिला दिन संपूर्ण सांगली जिल्ह्यामध्ये ग्रामएकता समितीमार्फत गावपातळीवरच साजरा करण्याची प्रकिया गेल्या वर्षी राबविली. याचाच भाग म्हणून जिल्हाभरातील ८ तालुक्यांमध्ये रॅलीचे आयोजन केले होते, ज्यामध्ये जास्तीत जास्त महिला सहभागी झाल्या होत्या. तसेच १३ ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

■ **कामाचा आढावा**

वर्षभर काम करताना जाणवलेली आवश्यक आव्हाने

१) आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारविरोधात महिलांना परखडपणे बोलण्यास उद्युक्त करणे.

२) सर्व स्तरातील लोकांना बरोबर घेऊन ग्रामएकता तयार करणे.

३) वंचित घटकातील सदस्यांचा सहभाग वाढवून राजकारणविरहित समानतेचे विचार पटवून देणे.

४) महिला सदस्य, सरपंचांबरोबरच सर्व ठिकाणी महिलांचा सहभाग वाढविल्यामुळे पोलिस ठाणे तसेच न्यायालय इत्यादी ठिकाणी दखल घ्यायला लावणे.

५) विद्रोही कार्यकर्ती म्हणून शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न करणे.

--

१) जन्मापासून स्त्रीला अन्याय व अत्याचाराला तोंड द्यावे लागते, त्यामुळे बऱ्याचदा हे तिला व्यक्त करायला समजत नाही. याविषयी इतरांशीही ती बोलू शकत नाही. कार्यकर्ते जेव्हा महिला कार्यक्रम आयोजित करतात, तेव्हा महिलांना विश्वासात घेतल्यावर त्या अन्याय, अत्याचाराविषयी व्यक्त होऊ लागतात.

२) गावपातळीवर ग्रामएकता समिती स्थापन करत असताना सदस्यांना भेटून ग्रामएकतेचे महत्त्व सांगणे. पोलिसपाटील, सरपंच, निवृत्त शिक्षक, डॉक्टर, वकील यांना भेटून त्यांना ग्रामएकतेचे महत्त्व पटवून दिणे. या सर्वांना एकत्रित करून मिटिंग घेणे. मिटिंगमध्ये महत्त्वाचे मुद्दे मांडणे. इतके सर्वकाही प्रयत्न करून अचानक आमच्या मिटिंग रद्द केल्या जातात.

३) गावपातळीवर काम करताना तिथले राजकारण पाहून प्रतिष्ठित लोक तसेच राजकीय नेत्यांचा विचार घेऊन ग्रामएकता स्थापन केली. यामध्ये गावातील वंचित घटक दुरावू नये म्हणून त्या घटकातील जास्तीत जास्त लोक सदस्य म्हणून घेण्याचा प्रयत्न केला. गावातील सर्वच स्तरांतील लोकांना समतेचे विचार पटवून दिले. जिल्ह्यातील प्रत्येक गावात विरोध झाला; पण त्याला सक्षमपणे तोंड देऊन ग्रामएकता स्थापन करण्यात यशस्वी झालो.

४) गावपातळीवरील ग्रामएकतेमध्ये असणाऱ्या सदस्यांमध्ये महिलांचा सहभाग असल्याने महिला सरपंच, आशा वर्कर यांचा सहभाग असल्याचे बीट हवालदारांना माहिती असल्याने महिला तक्रार करण्यासाठी पोलिस स्टेशन किंवा कोर्टात गेली तर तिची दाद घेतली जात नव्हती. आता मात्र ती घेतली जात आहे; पण हे सर्व करताना बीट हवालदारांना समजावून सांगावे लागले.

समाजामध्ये कार्यकर्ते म्हणून जाण्याआगोदर शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार समजून घेऊन समाजात सांगणे हे एक आव्हान होते. यासाठी प्रशिक्षणाद्वारे लता पी. एम. या ज्येष्ठ महिला अधिकार चळवळीच्या कार्यकर्त्या आहेत. त्यांच्याकडून थोर नेत्यांचे विचार समजून घेतले. त्यांनी यासाठी वेगवेगळ्या पुस्तकांचा आधार घेतला. आम्हाला यातून खूप काही शिकायला मिळाले. स्त्रियांचे विचार समजून घेणे हे आव्हान होते. त्यातून संस्थेने 'स्त्री समाजसुधारक' पुस्तकाचे प्रकाशन केले.

■ **विद्रोही महिला मंचला मदत करणारे लोक**

१) सरपंच : गावपातळीवरील तक्रार असेल, तर ग्रामएकता समिती स्थापन केल्यापासून सरपंच या कमिटीतील एक सदस्य म्हणून दोन्ही बाजूंना नोटीस पाठवून मिटिंग लावण्याचे नियोजन करतात.

२) ग्रामपंचायत सदस्य : समाजामध्ये किंवा वॉर्डनिहाय काही अडचणी असतील, तर त्याविषयी मिटिंगमध्ये चर्चा केली जाते.

३) पोलिसपाटील : ग्रामएकता समिती स्थापन झाल्यापासून गावातील तक्रारी ते स्वत: हाताळू लागले.

४) सामाजिक कार्यकर्ते : त्यांची समाजामध्ये एक वेगळी ओळख असते. त्यांना काम करण्याची आवड असते, त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमामध्ये ते उत्साहाने सहभाग घेऊन मदत करतात.

५) वकील : न्यायव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून गावपातळीवर सामोपचाराने वाद मिटविण्यास मदत होते. महिलांविषयी कार्यक्रमावेळी महिलांचे हक्क व अधिकार यांची माहिती पोहोचविली जाते.

६) डॉक्टर : लोकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासोबतच शाळांमध्ये तसेच महिला कार्यक्रमांमध्ये आरोग्याबाबत माहिती दिली जाते.

७) बीट हवालदार : काही वाद असतील तर ते गावपातळीवर पोलिस चौकीला मिटविण्याचा प्रयत्न करतात. पूर्वी महिला पोलिस चौकीला जायला घाबरत; पण आता ग्रामएकतेमुळे बीट हवालदार कार्यकमाला उपस्थित असतात. त्यामुळे महिलांमधील भीती कमी होण्यास मदत झाली आहे.

८) आशा : आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही आशा कार्यकर्त्या प्रत्येक गावातील तळागाळापर्यंत पोहोचते. तिथल्या प्रश्नांची माहिती ते आपल्यापर्यंत पोहोचविते.

९) अंगणवाडी सेविका : आरोग्य व पोषण आहाराबाबतची माहिती अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून दिली जाते.

१०) संग्राम मैत्रिण : मैत्रिणीच्या माध्यमातून गावपातळीवर संघटन होण्यास मदत झाली. प्रत्येक कार्यक्रमावेळी तिची मदत होते. संग्राम कार्यकर्ती नसली तरी गावपातळीवर काही समस्या निर्माण झाल्यास ती स्वत: कार्यकर्ती म्हणून ती समस्या हाताळते.

११) तालुकापातळी : महिला समुपदेशन केंद्र, लिगल एड, पोलिस स्टेशन यांची मदत होते. महिला संरक्षण अधिकारी लिगल एडच्या माध्यमातून तक्रार नोंदविण्यास यांची मदत होते.

■ **विद्रोही महिला मंचला समाजातून विरोध करणारे घटक**

१) ग्रामपंचायत सदस्य (स्थानिक पातळीवर)

२) राजकारणी लोक

३) तंटामुक्ती समिती

४) प्रतिष्ठित व्यक्ती

५) हिंसाग्रस्त घरातील लोक

६) मध्यस्थी करणारे लोक

७) पोलिस स्टेशन

८) समाजकंटक

९) जातीयवाद निर्माण करणारे लोक

१०) विद्रोही महिला मंचला विरोध करणारे

१) **ग्रामपंचायात सदस्य :** ग्रामएकता समितीच्या माध्यमातून कार्य करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्यांशी भेट घेतली असता त्यांनी सुरुवातीला सहकार्य केले नाही. तंटामुक्ती समिती आहे, तुम्ही नवीन काय करणार आहात, असे त्यांचे म्हणणे होते.

२) **राजकारणी लोक :** स्वत:चे महत्त्व वाढावे, पक्षाला मान मिळावा, आम्ही सांगतो तेच सदस्य हवेत, जातीय भेद, धर्मभेद, गरीब, श्रीमंत अशा मुद्द्यांवर विरोध केला जात होता.

३) **तंटामुक्त समिती** : आमची तंटामुक्ती समिती अस्तित्वात असताना तुम्ही नवीन समिती कशाला करता असे म्हणून विरोध होत होता.

४) **प्रतिष्ठित व्यक्ती :** त्यांना मान न मिळाल्यास स्त्री–पुरुष भेदभाव, धर्मभेदभाव यांद्वारे दबावातून विरोध झाला.

५) **अन्यायग्रस्त घरातील लोक :** ज्या व्यक्तीवर अन्याय होतो, त्या व्यक्तीला आम्ही ग्रामएकते समितीच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असताना इज्जतीला घाबरून त्यांना आमच्यापर्यंत पोहोचण्यास विरोध होतो. घरचे विरोध करतात आणि शेजारी मदत करीत नाहीत, अशी अवस्था होते.

६) **मध्यस्थी करणारे लोक :** त्यांना न्याय मिळण्यापेक्षा स्वत:च्या शब्दांची, मतांची जास्त किंमत असते. म्हणून न्यायप्रक्रियेत अडथळे निर्माण करून ते विरोधाची भूमिका स्वीकारतात.

७) **पोलिस स्टेशन :** तक्रारीची दाद न घेणे, प्रकरण दडपणे, राजकारणी, प्रतिष्ठित व्यक्तींच्या सांगण्यावरून विरोध केला जातो.

८) **समाजकंटक :** समाजातील शांतता बिघडवून गुंडप्रवृत्तीतून स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी काही कारण नसताना, पूर्ववैमनस्यातून विरोध केला जातो.

९) **जातीयवाद निर्माण करणारे लोक :** सरपंच महिला असेल अन् त्यातूनही वंचित असेल, तिचा पती राजकारणी असेल तर ते विरोध करतात. कार्यकर्तेसुद्धा जातीय भेद, लिंगभेद करतात. त्यातून विरोध होतोच; पण जास्त लोक ज्या जातीचे आहेत, तेसुद्धा विरोध करतात.

१०) **विद्रोही महिला मंचला विरोध करणारे लोक :** कुटुंबातील पती, सासू, सासरे, जावा, दीर, शेजारी, पैपाहुणे, इस्ट मित्र यांच्याकडूनही आम्हाला काही ठिकाणी विरोध होत होता.

सांगली जिल्ह्यात विद्रोही महिला म्हणून काम करीत असताना १३ ठिकाणी महिलांना त्रास झाला. त्यामुळे या १३ ठिकाणच्या प्रतिष्ठित व्यक्तींना आमचे म्हणणे पटवून देऊन प्रसंगी विरोध पत्करून पुढे जावे लागले.

- **राजकीय क्षेत्रातून कार्यकर्त्यांना धमकीचे फोन**

विद्रोही महिला मंचच्या माध्यमातून काम करीत असताना आम्हाला गावपातळीवर बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. जेव्हा आम्ही एखाद्या महिलेला ग्रामएकता समितीद्वारे न्याय देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आम्हाला धमकीचे फोन येतात. तक्रारदार महिलेने आम्हाला महिला संस्थेकडे नेले किंवा ग्रामपंचायतमध्ये तसेच पोलिस स्टेशन, न्यायालय अशा ठिकाणी बोलावल्याचा राग त्यांना आलेला असतो.

तो राग मनात धरून ते लोक कार्यकर्त्यांवर संतापतात. बऱ्याच वेळेला ते राजकीय नेत्यांची भीती

घालतात. (उदा. आमदार, सरपंच किंवा गावातील इतर प्रतिष्ठित व्यक्ती यांना सांगतो अशी धमकी देतात.) तसेच आम्ही तुमच्या संस्थाप्रमुखांना भेटतो, असा इशाराही कार्यकर्त्यांना दिला जातो.

अशा धमक्यांना न जुमानता विद्रोही महिला मंच महिलेच्या खंबीरपणे पाठीशी राहून तिच्या निर्णयाला प्राधान्य देतो, त्यामुळे तिच्यात एकप्रकारचा आत्मविश्वास वाढून ती पुढील कार्य जोमाने करते.

**श्रमिक जनतेचा जाहिरनामा परिषद**

जगण्याच्या हक्कांचे आंदोलन ६ मार्च २०१९

(शिवाजी मंदिर, मुंबई)

या परिषदेसाठी अनेक संस्था, संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉ. कुमार शिलारकर होते. या कार्यक्रमाची सुरुवात कॉ. धनाजी गुरव यांनी केली. 'लोकशाही मिळवण्यासाठी संविधान अस्तित्वात आणण्यासाठी आपल्या लोकांनी गोळ्या खाल्ल्या. चित्रातला राम मारायला शिकवतो. आमचा घाम जगण्याचा हक्क फुलवायला शिकवतो. आमच्या घामामध्ये राम आहे', असे बुद्धांनी सांगितले. कारण श्रम करणारा माणूसच सर्वांत श्रेष्ठ आहे. ही धरती कुठल्याही शेषनागाच्या फणावर उभी नसून, ती कष्टकऱ्यांच्या श्रमावर आणि घामावर उभी आहे.

कॉ. कुमार शिलारकर यांनी, श्रमिक शेतमजुरांना त्यांचे हक्क, शेतीमालाला दीडपड भाव मिळावा, अशी मागणी केली आहे. पीक विमा योजना, पिकांचे नुकसान झालेले शासनाने द्यावे. शेती आणि कृषी उद्योजकांमध्ये स्त्रियांना स्थान दिले पाहिजे.

**ब्रायन लोलो** : वनहक्क, नैसर्गिक संसाधन, जमीन, पाणी, जंगल, जगण्याचे साधन एक वस्तू बनली आहे. कूळकायदा, पैसा, कायदा हा लोकांच्या संघर्षातून मिळाले आहे. ते नष्ट करायला सरकार प्रयत्न करीत आहे. सामूहिक जंगलावर सर्वांना हक्क मिळायला पाहिजे. जे कायदे शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत, ते अजून भक्कम व्हायला पाहिजेत. त्यामध्ये स्त्री-पुरुष समान असावेत.

**श्वेता मयुरेश** : शहरी विकास जमीन कशा पद्धतीने लुबाडली जाते. लोकांना त्यांच्या जागेवरून हटवू नये. पाण्याचा मूलभूत हक्क आहे, तो सरकारने उपलब्ध करून द्यावा.

'हम हमारा हक मांगते, नहीं किसेसे भिक मांगते', आपल्या गरजा, आपल्या मागण्या या जाहीरनाम्याच्या स्वरूपात मागत आहे. प्रत्येक वाडीवस्तीपर्यंत एस.टी पोहोचली पाहिजे. कारण या एस.टी.वर विद्यार्थ्यांचे शिक्षण अवलंबून असते. एस.टी.ची रिक्त पदे पारदर्शकतेने भरावीत.

**कॉ. शंकर पुजारी** : असंघटित क्षेत्र, लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही, ७ टक्के असलेल्या कायद्याची अंमलवबजावणी करावी. मजुरांना किमान ३००० हजार पेन्शन असावी. शिक्षण मोफत असावे, मजुरी १८,००० हजार असावी.

**रेशन मुद्द्यावर मांडणी :** मनरेगा-रोजगार हमी योजनेच्या कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, अन्नपूर्णा योजना चालू करावी.

**पोषण आहार :** पोषणाच्या मागण्या अंगणवाडी आयटीसीटी गरोदर महिला व मुलांना एकवेळचे ताजे शिजविलेले, पोटभर अन्न मिळावे.

**आरोग्यव्यवस्था सुधारावी**

**शिक्षणाचा कायदा** : माणसासारखं जगण्यासाठी ज्ञान व शिक्षण हवं आणि ते मोफत मिळावं. सर्व प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी.

सर्वप्रकारच्या हिंसा थांबवाव्यात, भेदभावविरोधी कायदा यावा. स्त्री–पुरुषांसाठी समान कायदे असावेत व त्यांची अंमलबजावणी व्हावी. वैश्या व्यवसाय गुन्हेगारीतून वगळणे गरजेचे आहे. लिंगभाव आधारित माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**दुपारचे सत्र :**

नवाब मलिक, कॉ. अशोक ढवळे, राजवीर (काँग्रेस पक्ष अध्यक्ष), ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, उल्का महाजन व सहकारी बाबा आढाव हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत जाहीरनामा तयार करण्यात आला.

■■■

# विद्रोही महिला मंच कार्यक्रम







# वँप रिपोर्ट

वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी वेश्या अन्यायमुक्ती परिषदे(वँप)मार्फत गेली २५ वर्षे विविध कार्ये केली जातात. हे काम करताना समोर आलेल्या आव्हानांना तोंड देण्यासोबतच त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारविरोधी संघटित होऊन कसे लढावे, याचे प्रशिक्षण, मार्गदर्शन करण्यात येते, तसेच एचआयव्हीसोबत जगणाऱ्या व्यक्तींकरिता आधार, काळजी या गोष्टी करण्याबरोबरच त्यांच्या औषधोपचारासाठी विशेष काळजी घेतली जाते. हे काम 'संग्राम'शी जोडून वँप, वँप प्लस, वँप मैत्रिणी, वँप संघटिका आणि वँप इन्स्टिट्यूटमार्फत कम्युनिटी को-ऑर्डिनेटर्सच्या माध्यमातून प्रामुख्याने केले जाते.

**वँपसमोर आव्हाने काय होती?**

१) गजकर्णाबद्दल मोठं आव्हान होते.

२) मालाच्या घरी रेड पडली.

३) पोलिसांचे शोधपथक

४) ट्राफिकिंग बिल

५) मुधोळमध्ये पोलिसांचा त्रास

६) व्याजाचे पैसे

७) गर्भपात

८) औषधाची कमतरता- एआरटी

८) गोकुळनगर येथे गुंडाचा त्रास

९) रिर्पोटिंग

गजकर्णाबद्दल बायकांकडून खूप तक्रारी येत होत्या. डॉक्टर व्हिजिटच्यावेळी डॉक्टरांना दाखवले. डॉक्टरांनी गजकर्णाबद्दल माहिती दिली. डॉक्टरांनी गजकरणाबद्दल माहिती दिली. सोमवार मिटिंगमध्ये चर्चा झाली. मीना मॅडमने विनयसरांशी फोनवर सल्ला-मसलत केली. आणि औषध मागवून घेतली. ८५ बायकांना दिले. एक आठवड्याचे आपण दिले. दुसऱ्या आठवड्यएाचे त्यांनी घेतले.

मालाला अगोदर गुंड त्रास देत होते. कारण माला विरोध करत होती. तिचे म्हणणे होते की या मुलांनी कस्टमरला मारुन पैसे काढू नये. तिला या बद्दल मारण्याचा प्रयत्न पण केला. तिला कशात तरी अडकवायचे म्हणून पुण्याला फ्रीडम फर्म या संस्थेला सांगून तिच्या घरी रेड करायला लावली. तिच्या घरातील मुलगी वयाने मोठी होती, तरी त्या मुलीला घेऊन गेले. आणि मालाला घरवाली म्हणून जेलला पाठवले. माला दोन महिने आत होती. खूप प्रयत्न करुन तिला सोडवले.

मिरज येथे डीवायएसपी विद्या जाधव गल्लीत येऊन सगळ्या बायकांना तुमची कागदपत्रे दाखवा. पण यात बंगाली आणि नेपाळी बायकांच्यामध्ये खूप तणाव होता. आणि त्यांचं म्हणणं होत की, हे कागदपत्रे पोलीस स्टेशनला आणून द्या. यासाठी आम्ही मीना मॅडमला फोन केला. तेव्हा मॅडम म्हणाल्या की, कागदपत्रे देऊ नका. आणि यासाठी विद्या जाधव बरोबर संग्रामने ॲडव्होकसी केली. गल्लीत वँपच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. की बायक खूप व्याजाने पैसे काढत आहे. पण ते कसे आहे. रोज आहे का, महिन्याने किंवा

आठवड्यएने यासाठी बायकांबरोबर चर्चा केली. संग्रामशी पण बोलणं झालं. ३० बायकांबरोबर मिटिंग झाली. त्या मिटिंगमध्ये असं सांगितले की, तुमच्याजवळ सोनं असते ते बँकेत ठेवा. बँकेला व्याजपण कमी असते. याचा फायना हा झाला की बायका आजारपणासाठी किंवा काही अडचणीसाठी सोनं ठेवून पैसे आणायला लागल्या. भिशी चालू केली. ज्याला खूप अडचण आहेत त्यांना अगोदर पैसे दिले. ज्यांनी कर्ज काढले होते ते पण फेडायला मदत झाली. मिरजमध्ये एका पोरीला ४० हजार दिले होते. एका माणसाने त्या ४० हजारचे चक्रीव्याज लावून त्याने ३ लाख रुपये केले होते. पण त्या माणसाबरोबर बोलून, भांडण करून ते व्याज घेणे बंद केले. यासाठी जेव्हा बोलणं होत होते. तेव्हा व्हिडिओ शूटिंग केले. त्यामुळे तो चांगलाच घाबरला. की यांच्याकडे पुरावा आहे.

गोकुळनगरमध्ये पण भारतीचे कर्ज खूप होते. तिचे पण व्याज बंद केले. आणि आम्ही मिटिंग घेऊन सर्वजण त्या व्याज वाल्यांशी बोललो. की तुम्हाला व्याज मिळणार नाही. मुद्दलपण त्यांच्याकडे पैसे आल्यावर मिळणार आहे. मुधोळबद्दल सोमवार मिटिंगमध्ये सारखी चर्चा होत होती. की पोलीससारखे कस्टमरला पकडून पैसे काढून घेतात. आणि आमच्या मुलांना आमच्या विरोधात उभा करुन गल्ली बंद करुन धंदा बंद करायच्या प्रयत्नात आहे. मग यासाठी काय करायला पाहिजे. मग असं ठरलं की ३ मार्च मुधोळमध्ये करु या आणि ३ मार्च आंतरराष्ट्रीय वेश्या हक्क दिन म्हणून साजरा केला. आणि पोलिस स्टेशनला निवेदन दिले.

गर्भपाताचा मुद्दा असा होत की बायका गरोदर राहत होत्या. आणि त्यांना बाळ नको असले तर गर्भपात करत होत्या. पण गर्भपात बंदीच्या कायद्यामुळे हॉस्पिटलमध्ये न करता कर्नाटकमधून गोळ्या मागवनू त्या खात असत आणि त्यामुळे कितीही ब्लडिंग होऊन त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत होता. त्या गोळ्यांचा साईड इफेक्ट पण होत होता.

गोकुळनगरमध्ये गुंडाचा त्रास खूप वाढत होता. गुंड कस्टमरला आडवून त्यांना मारुन पैसे काढून घेत होते. त्यामुळे कस्टमर गल्लीत यायचे कमी झाले. जर असे झाले तर खायचे काय हा प्रश्न पडला म्हणून गल्लीत मिटिंग घेऊन आम्ही गस्त घालायचे ठरवले. आणि आम्ही गस्तसाठी संध्याकाळी ७ ते १ वाजेपर्यंत गस्त घालू लागलो. आणि कोणी गुंड दंगा करायला लागले की पोलिसांना फोन करु लागलो.

एआरटीच्या औषधाची कमतरता होती. त्यासाठी vamp च्या कार्यकर्त्यांनी संग्रामशी बोलले आणि 'संग्राम'शी बोलणी करून लगेच औषध मागवली. आम्ही रिपोर्टसाठी खूप कमी पडत होतो. त्यात .... सगळेत लिहणारे वाचणारे नाहीत. यासाठी पॉईट ऑफ व्ह्यू या संस्थेने आम्हाला ट्रेनिंग दिले. मोबाईलमध्ये कसे वॉईस रेकॉर्ड करायचे, फोटो कसे काढायचे, आपण पुरावा गोळा करण्यात मोबाईलचा वापर कसा करायचा ते शिकवले.

आंबा रिव्ह्यूमध्ये आपल्या कामात आपण कुठे कमी पडतो किंवा गॅप कुठे आहे. याबद्दल चर्चा झाली. की आपण पगार घेतो. त्यामानाने काम करायला पाहिजे. आपण आपला बौद्धिक आळस झटकून काम करायला पाहिजे. नवीन काय करायला पाहिजे. आरोग्यसाठी, संघटनाबद्दल त्यावर आम्ही म्हणालो. आम्ही आता इथून पुढे व्यवस्थित काम करतो.

पन्हाळा मिटिंगमध्ये जे बंगाली आणि बांगलादेशी यातला फरक काय हे समजून सांगितले. बंगाली आणि कर्नाटक यामध्ये सारखी भांडण होत होती. यासाठी त्या मिटिंगमध्ये हे पण सांगितले, की आपण मानव अधिकारसाठी काम करतो. मग त्यांना पण मानव अधिकार आहे, काम करण्याचा म्हणून आपण त्यांना पण

संभाळून घ्यायला पाहिजे. आणि आपण काम सोडून आपली व्ययक्तिक काम जास्त करतो. याबद्दल चर्चा झाली. आणि वँप बोर्ड बद्दल आणि इलेक्शन बद्दल चर्चा झाली.

वँप बोर्डाच्या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकाऱ्यांची निवड झाली. त्यांना एक दिवसाचे प्रशिक्षण दिले. यात नियमावलीसुद्धा ठरविण्यात आली. निवडणुकीत उभा राहणारी उमदेवार ४० वर्षांच्या आतील पाहिजे आणि ती धंदा करणारी महिला पाहिजे. थोडंफार लिहायला, वाचायला यायला पाहिजे. जे पण उमेदवार उभा राहणार असतील त्यांनी अर्ज भरून द्यायचा आहे.

सातारामधून तीन व्यक्ती, कराडमधून चार, सांगली स्ट्रीटमधून एक, स्वरूपमधून ४, मिरजमधून ४, गोकुळनगरमधून तीन व राजमाने चाळमधून एका व्यक्तीने अर्ज भरून दिले. ६ सप्टेंबर २०१८ रोजी गोपनियतेने मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान चालू असताना आरती पै, मीना शेषू, शितल प्रताप या सर्वांनी मतदान केंद्रांना भेट दिली. शिवाय डीवायएसपी विद्या जाधव यांनीही भेट दिली. तीन वाजता सर्व निवडणूक अधिकाऱ्यांच्या निगराणीत मतदान पार पडले. निवडणूक अधिकारी आले आणि बॉक्स घेऊन गेले. त्याच दिवशी संध्याकाळी आरोहनमध्ये मतमोजणी झाली. यावेळी सर्व निवडणूक अधिकारी, सल्लागार आणि उमेदवार यांच्या निगराणीखाली मतमोजणी झाली.

त्यानंतर बालाजीनगरमध्ये वँप बोर्डपदासाठी निवडणूक झाली. यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, जनरल सेक्रेटरी आणि जॉईंट सेक्रेटरीपदासाठी उभा राहू इच्छितात. त्यांनी उभा राहू शकतात. यात निवडून आलेले उमेदवार–

१) माया गुरव – अध्यक्ष

२) संगिता मनोजी – उपाध्यक्ष

३) रेणुका काळे – जनरल सेक्रेटरी

४) सुजाता जाधव – खजिनदार

५) रोशनी वर्मा – सदस्य

६) रेणुका कांबळे – सदस्य

७) रुपाली कांबळे – सदस्य

यांची बोर्डासाठी सर्वानुमते निवड झाली.

ट्रॅफिकिंग बिल २०१८ रोखण्यासाठी आम्हाला 'रेड झाली हो' या संशोधनाची खूप मदत झाली. आमच्यासाठी हे संशोधन एक पुरावा आहे. एनएनएसडब्ल्यूचे पार्टनर म्हणून ॲडव्हकसीदृष्टीने जो मोठा परिणाम झाला, त्याला ट्रॅफिकिंग बिल हे मोठं कारण आहे. हे बिल २०१६ मध्ये आलं. परंतु, फक्त सेक्स वर्कर्स आणि त्यांच्या अधिकारासाठी काम करणारे गट सोडले तर इकडे कुणीच लक्ष दिले नाही म्हणून आमचे आम्हीच या बिलाविरोधी आवाज उठवू लागलो. वँप आणि एनएनएसडब्ल्यूच्या काही पार्टनर मिळून संशोधन केले आणि ही गोष्ट माध्यमांच्या नजरेत आणून दिली. 'रेडेड– रेड झाली हो'चा पुरावा घेऊन डॉ. शशी थरूर यांनी माहिती व बालविकासमंत्री मनेका गांधी यांना सांगितले की, 'ट्रॅफिकिंग बिलाबद्दल तुम्ही पुनर्विचार करायला पाहिजे.' त्यानंतर या बिलाबद्दल आम्हाला प्रशिक्षणसुद्धा मिळाले. नंतर या बिलाबद्दल पूर्ण देशात अभियान आम्ही राबविलं. हैदराबाद, पुणे, बेंगलोर, दिल्ली, मुंबई, रांची आणि लखनौ या सात राज्यात मिटिंग्ज घेतल्या गेल्या. या मिटिंगमध्ये २०० हून अधिक लोक जे दुसऱ्या चळवळीशी जोडलेले आहेत, हे

बिल थांबवण्यसाठी साइनिंग कॅम्पेनसुद्धा राबविलं गेलं. फोरमने बनविलेल्या स्टेटमेंटवर ४००० हून अधिक महिलांनी सह्या केल्या. आम्ही नॅशनल नेटवर्कचे प्रतिनिधी आणि डॉ. शशी थरूर यांनी मिळून मंत्री मनेका गांधी यांच्यासमोर आमचे म्हणणे मांडले. जुलैपर्यंत दुसरे गटपण या बिलासंदर्भात आवाज उठवू लागले. लोकसभेत हे बिल रोखण्यासाठी आम्हाला यश आले नाही. पण केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रच्या पार्टनर्सनी स्वत: किंवा आपले प्रतिनिधी पाठवनू राज्यसभा सदस्यांना भेटले. डिसेंबत २०१८ च्या पार्लमेंटमध्ये हे बिल जावू नये यासाठी आम्ही काम केले. यामुळे ट्राफिकिंग बिल २०१८ हे बिल रोखले गेलं.

इचलकरंजीमध्ये ज्या आमच्या ओळखीच्या धंदा करणाऱ्या महिला भेटल्या. त्यांनी आम्हाला सांगितले की, जेव्हापासून आमच्या इथे टीआय कार्यक्रम बंद झाला, तेव्हापासून निरोध तसेच आरोग्याची सेवासुविधा मिळेनासी झाली. यासाठी वँपने इचलकरंजीमध्ये दोन व्हॉलिंटिअर नेमले आणि त्यानंतर जिल्हा एडस् नियंत्रण कक्षाशी (डॉप्क्यू) बोलणं करून त्यांच्याकडून निरोध उपलब्ध केले. शिवाय महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण कक्षाकडे (एम सॅक्स) टीआय कार्यक्रमासाठी प्रस्ताव लिहिला. त्यानंतर दोन वेळा जाट व्हिजिट झाली आणि वँपला इचलकरंजी टीआय कार्यक्रम मिळाला.

सेक्स वर्कर्स, ट्रान्सजेंडर्स यांच्यावर ओढवणाऱ्या अन्याय, अत्याचार तसेच हिंसेच्या घटनांची माहिती एकत्रित करून ती जागतिक पातळीवरील 'सिडॉ' नावाच्या समितीसमोर मांडण्यासाठी सर्वेक्षण केले. त्यानंतर बालाजीनगरमध्ये सिडॉबद्दल प्रशिक्षण दिले. त्यात कोणत्या विषयावर सर्वेक्षण करायला पाहिजे, त्याचे विषय खालील दिले आहेत–

१) कस्टमरबरोबर होणारी हिंसा – २४ फॉर्म

२) गर्भपात – ७ फॉर्म

३) ट्रान्सजेंडर्सचे आरोग्य – ९ फॉर्म

४) जातीचा दाखला – २३६ फॉर्म

५) शिक्षण – २२१ फॉर्म

६) स्थलांतर – २१ फॉर्म

७) हिंसा – ६७ फॉर्म

८) सावकारी हिंसा – २१ फॉर्म

याप्रमाणे सर्वेक्षण करून माहिती संकलित करण्यात आली.

सातारा येथे पोलिसांमार्फत वारंवार रेड होत होती. सारखी रेड करणं, बायकांना विनाकारण कस्टडीत ठेवणं, कोर्टात दंड भरायला लावणं, या बाबी घडत होत्या. त्यानुषंगाने पोलिसांकरिता सेन्सिटायझेशन वर्कशॉप घेणं गरजेचं होतं, त्यानुसार सातारा येथे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

वँपने राष्ट्रीय स्तरावरसुद्धा वर्षभरात बरेच काम केले. त्याअंतर्गत दिल्ली येथील सहज संस्थेने आयोजित केलेल्या मिटिंगमध्ये सहभाग घेतला. 'लिव्हिंग नो वन बिहाईंड' या मिटिंगमध्ये सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल, तीन आणि पाच या विषयावर चर्चा झाली या मिटिंगमध्ये असंघटित कामगार यांना आमंत्रित केलं गेलं. यात सेक्स वर्कर्सना आरोग्यसेवा घेताना येणाऱ्या अडचणीबद्दल चर्चा झाली.

'पार्टनर्स ऑफ लॉ इन डेव्हलपमेंट' (पीएनडी) यांची दिल्ली येथे झालेल्या मिटिंगमध्ये वँप कार्यकर्त्या

सहभागी झाल्या होत्या. मिटिंगमध्ये त्यांनी त्यांनी सेक्स वर्कर्सवर होणारी हिंसा आणि कलम ३७० बद्दल आपलं म्हणणं सविस्तरपणे मांडलं, तसेच पोलिसांकडून होणाऱ्या त्रासाबद्दलही सांगितले.

लखनौ येथे आयोजित केलेल्या 'डोमेस्टिक व्हायलंस अगेन्स्ट वूमन' या विषयावरील मिटिंगसाठी वँपच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून महिलांवर होणारी हिंसा, पोलिसांकडून होणारा विनाकारण त्रास याबाबत म्हणणे मांडले.

'पॉईंट ऑफ व्ह्यू' यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी वँप आणि मुस्कानचे कार्यकर्ते गेले होते. त्यात त्यांना फेसबुक, ट्वीटर कसं चालवायचं, याचं प्रशिक्षण मिळालं.

श्रमिक जनतेचा जाहीरनामा ही मुंबई येथे परिषद झाली. त्यात वँप, विद्रोही महिला मंच (व्हीएमएम) आणि मुस्कानचे कार्यकर्ते गेले. वेगवेगळ्या विषयावर बोलणं झालं. आपला धंदा करणाऱ्या व्यक्ती आणि कायदा यावर चर्चा झाली.

पितृसत्तेबाबत आपण कसं काम करावं. जाती-धर्माच्या नावावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध कसं उभा रहावं, समाजात लग्न ही संकल्पना महत्त्वपूर्ण आहे का?, लग्नाची गरज आहे का?, मिटिंगच्या दुसऱ्या दिवशीच्या चर्चेत सेक्स काय आहे, किती प्रकार आहे, सेक्स कोण-कोण करते आदींची माहिती मिळाली. समाजात लग्नाची गरज असल्यास स्त्री, पुरुष, मुले, मुली यांच्यावर काय परिणाम होईल, या गोष्टींवर तिसऱ्या दिवशी दिल्ली येथे मिटिंग चर्चा झाली.

दिल्ली येथे कंट्री कोऑर्डिनेटिंग मेकॅनिझमची (सीसीएम) मिटिंग झाली. सीसीएममध्ये याअगोदर दोन वर्षे एआयएनएसडब्ल्यू होते. त्यामुळे आम्ही म्हणत होतो की, यावेळेस एनएनएसडब्ल्यूला मिळावे. त्यासाठी एआयएनएसडब्ल्यूचे म्हणणे होते की, 'आमचं रजिस्ट्रेशन झालं आहे. आमच्याकडे एफसीआरए आहे. आमची संस्था ही एनएनएसडब्ल्यूपेक्षा मोठी आहे. त्यामुळे यावेळीसुद्धा आम्हालाच मिळावं.' यावर एनएनएसडब्ल्यूनेही म्हणणे मांडले की, 'दोन वर्षे तुमच्याकडे होतंच ना, यावेळी आम्हाला द्या. ' असं म्हणून निशाचं नवा सुचवलं. त्यावर पण एआयएनएसडब्ल्यूचं म्हणणं होतं की, 'निशा तर ट्रान्सजेंडर आहे.' यावर मुद्द्यावर आम्ही त्यांना खूपच बोललो. त्यानंतर एक महिन्यानंतर एनएनएसडब्ल्यूला मिळाले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे तीन दिवसांची सातवी जागतिक महिला आरोग्य हक्क परिषद झाली. त्यामध्ये सर्व स्तरांतील वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळ्या भागातील लोकांच्या आरोग्याच्या प्रश्नांवर चर्चा झाली. त्यांच्या आयुष्यातील चांगल्या-वाईट गोष्टींचा अनुभवही यावेळी व्यक्त करण्यात आला. मागासलेल्या समुदायांच्या आरोग्यावर दुसऱ्या दिवशी सत्र झाले. त्यात स्त्रियांना समान हक्क देण्याबद्दल आवाज उठविला, तसेच मुस्लिम महिला, सेक्स वर्कर्स व दलित महिला, ट्रान्सजेंडर, घटस्फोटीत, विधवा यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराबाबत चर्चा झाली. या चर्चासत्रांमध्ये वँप, मुस्कान, व्हीएमएम, नजरियाच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडले. सत्राच्या तिसऱ्या दिवशी लैंगिकतेसाठी समाजाच्या चौकटीतून बाहेर येणे यावर चर्चा झाली.

हे सगळं करीत असताना आम्हाला बऱ्यापैकी यश मिळालं. आंबा येथे झालेल्या आढावा बैठकीनंतर आणखी जोमाने आम्ही काम करून लागलो. बोर्ड मतदान अगदी लोकशाही पद्धतीने झाले. इचलकरंजीला जाट व्हिजिटमुळं टीआय कार्यक्रम मिळाला. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर काम करायला वँपने मदत केली. आंतरराष्ट्रीय वेश्या महिला हक्क दिनानिमित्त ३ मार्च रोजी काढण्यात आलेल्या रॅलीमुळे पोलिसांचा त्रास बराच

कमी झाला. महिला आरोग्य हक्क परिषदेत आपले म्हणणे मांडण्यासाठी संधी मिळाली. गल्लीत महिलांना मारहाणाबरोबरच त्यांच्यावर अन्याय, अत्याचार वाढले होते. तेही कमी झाले. व्हॉट्सअॅप प्रशिक्षणामुळे व्हॉट्सअॅप ग्रुप तयार झाले आणि कामाचे रिपोर्टिंग करू लागले. सातारा येथील पोलिसांकरिता घेण्यात प्रशिक्षणामुळे तेथील रेड, अन्याय, अत्याचार कमी झाली.

कम्युनिटीमध्ये गजकर्णचा (फंगल इन्फेक्शन) प्रसार वाढला होता. त्यासंदर्भात सोमवारच्या मिटिंगमध्ये चर्चा करून तत्काळ औषधोपचार घेण्याच्यादृष्टीने चर्चा झाली. त्यानुसार औषधोपचार केल्यामुळे गजकर्णचे प्रमाण बरेचसे कमी झाले. पन्हाळा मिटिंगमधील चर्चेत काम कसं सुधारावं, याबाबत प्रामुख्याने चर्चा झाली. त्यानुसार कामातही सुधारणा करण्याकडे आम्ही लक्ष वेधले.

'रेडेड' या पुस्तकाचा पुरावा घेऊन ट्रॅफिकिंग बिल रोखले. आपल्या कम्युनिटीचे प्रश्न कॉमेडीच्या माध्यमातून कसे मांडावेत, याबाबत 'मरा' या संस्थेबरोबर मिटिंग होऊन 'भारतीय डिजिटल पार्टी' (भाडिपा)मार्फत स्टॅण्डअप कॉमेडीचे आयोजन सांगली येथे करण्यात आले होते. येथे ३०० पेक्षा जास्त कम्युनिटीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

■■■

# ‘वँप’अंतर्गत घेतलेले कार्यक्रम















# ‘मुस्कान’ला मिळालेले कामातील यश

मुस्कान याचा अर्थ हास्य असून, याची सुरुवात २००० मध्ये समलिंगी पुरुष आणि ट्रान्सजेंडर्स यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासोबत त्यांना त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणे व अन्याय, अत्याचारविरोधी उभे राहण्यासाठी कम्युनिटी सशक्तीकरण करण्याचे काम मुस्कानच्या माध्यमातून केले जाते. २०१८-१९ या कालावधीत ‘मुस्कान’मार्फत विविध पातळ्यांवर काम केले.

**मुस्कानचे कार्य**

१) ‘दयार’बरोबर चर्चा

२) सातारा येथे पोलिसांची मदत

३) मिरज व कराडमध्ये एफआयआर दाखल

४) ट्रान्स बिलाची माहिती

५) सातारा व सांगली - जिल्हा विधिसेवा प्राधिकरण (दालसा) मिटिंग, मतदान कार्ड

६) इचलकरंजी व कोल्हापूरमध्ये संघटनेची वाढ- टीआय मिळाला

७) किणी टोल नाका- १० टीजींना मदत

८) ३७७ रद्द झाले.

९) सीईडीएडब्ल्यूमध्ये सहभाग

१०) आकाशवाणीवर पहिले नभोनाट्य ‘तिसरं जग’ सादर

११) नॅशनल ट्रान्स पीपल्स मूव्हमेंट (एनटीपीएम)मध्ये सहभाग

१२) एलजीबीटीक्यूआय व इतर संघटना ‘सेतू संवादाचा’

१३) सांगली सिव्हिलमध्ये ट्रान्सजेंडर्सशी भेदभाव

१४) महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद, ‘बाते अमन की’, ‘मावा’ यामध्ये सहभाग

१५) व्हॉटस्ॲप ग्रुप

१६) ट्रान्सजेंडर म्हणून रेशनकार्ड

१७) संघटनेमुळे बचत करण्याची सवय झाली. मालकांवर पैसे खर्च करण्याचे प्रमाण कमी झाले.

■ **ट्रान्स बिलबाबत प्रबोधन**

सांगलीमध्ये ट्रान्स बिलबद्दल डेक्कन हॉलमध्ये कार्यक्रम घेतला. त्या कार्यक्रमाला सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून १५०-२०० ट्रान्सजेंडर्स आले होते. यावेळी ॲड. आरती पै व मीना शेषू यांनी ट्रान्स बिलाची माहिती दिली. या बिलामध्ये बदल करण्यासाठी खासदारांचे समर्थन घेण्याकरिता पत्र देण्याचे ठरले. हातकणंगलेचे त्यावेळचे खासदार राजू शेट्टी आणि साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांना पत्र देण्यात आले. या बिलात बदल करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरची मिटिंग घेण्यात आली. या मिटिंगमध्ये भारतातील सर्व ट्रान्सजेंडर्स आले होते. तेव्हा झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ‘मुस्कान’च्या सुधीर पाटील यांनी सांगितले की,

'महाराष्ट्रामध्ये सर्व जोगाप्पा कम्युनिटी आहे. त्यामुळे मंगती बंद झाली तर आम्ही जगायचे कसे?'

■ **इचलकरंजी व कोल्हापूरमध्ये संघटनेची वाढ**

सांगलीमध्ये झालेल्या ट्रान्स बिलबद्दलच्या कार्यक्रमावेळी इचलकरंजी व कोल्हापुरातून आलेल्या ट्रान्सजेंडर्सनी सांगितले की, 'आमच्या इथे निरोध उपलब्ध नाही. विनानिरोध संबंध ठेवले जातात.' तेव्हा तिथे जाऊन तिथली परिस्थिती पाहून तेव्हा त्याचे मोजमाप करण्यात आले. तेव्हा मदतनीस म्हणून इचलकरंजीमधून समीर व उमेश हे दोघे, तर कोल्हापूरमध्ये अफजल काम करण्यास तयार झाले. मग दोन्ही ठिकाणी ऑफिस घेऊन काम करण्यास सुरुवात करण्यात आली.

■ **किणी टोलनाका : दहा ट्रान्सजेंडर्सना मदत**

किणी वाठार येथील टोलनाक्यावर धंदा व मंगती करणाऱ्या १० ट्रान्सजेंडर्सकडे रोज १०० मागितले जात होते. टोल नाक्याच्या ठेकेदाराला सांगून पैसे न घेण्यास सांगितले. तेव्हा 'संग्राम' कार्यकर्ते व पत्रकारांची मदत घेण्यात आली.

■ **'सिडॉ'मध्ये सहभाग**

महिलांवर होणाऱ्या सर्वप्रकारच्या हिंसा कमी करण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या 'सीडॉ' नावाच्या जागतिक पातळीवरील समितीपर्यंत आपले गाऱ्हाणे मांडण्याकरिता सांगली, कोल्हापूर, कराड आणि साताऱ्यामध्ये अभ्यास करण्यात आला. यामध्ये सांगली, मिरजमधून एक, इस्लामपूरमधून एक, कऱ्हाडमधून एक, सातारामधून दोन, इचलकरंजीमधून दोन आणि कोल्हापूरमधून एक केस स्टडी करण्यात आली.

■ **मीडिया : आकाशवाणीवर पहिले नभोनाट्य**

सांगली आकाशवाणीवर ट्रान्सजेंडर कम्युनिटीबाबत पहिले नभोनाट्य करण्यात आले. यामध्ये 'मुस्कान'कडून सुधीर पाटील व इम्तियाज यांनी भाग घेतला होता.

■ **नॅशनल ट्रान्स पीपल्स मूव्हमेंट : एनटीपीएममध्ये सहभाग**

ट्रान्स बिल १०० दिवसांत टेबलवरती जाणार आहे. म्हणून नॅशनल ट्रान्स पीपल्स मूव्हमेंट एनटीपीएमची राष्ट्रीय स्तरावरील मिटिंग हैदराबादमध्ये घेण्यात आली. या मिटिंगमध्ये देशभरातून सर्व ट्रान्सजेंडर्स सहभागी झाले होते. यावेळी ट्रान्स बिलाबद्दल चर्चा करण्यात आली. या मिटिंगला 'मुस्कान'कडून सुधीर, अमोल आणि सुजाता हे तिघे सहभागी झाले होते.

■ **'मुस्कान'ची मांडणी**

इतर संस्था, संघटनांनी मिळून सेतू संवादाचीही चळवळ सुरू केली. त्याची मिटिंग पुण्यात होती. या मिटिंगमध्ये 'मुस्कान'कडून सुधीर पाटील सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी 'मुस्कान'ची मांडणी केली.

■ **सांगली सिव्हिल – ट्रान्सजेंडर्सशी भेदभाव**

सांगली सिव्हिलमध्ये एक ट्रान्सजेंडर उपचारासाठी गेला असता त्याच्याबरोबर भेदभाव करण्यात आला. तेव्हा त्याने ही माहिती 'मुस्कान'च्या सुधीर पाटील यांना फोनवरून दिली. तेव्हा मुस्कान व वँपचे कार्यकर्ते सिव्हिलमध्ये जाऊन त्या ट्रान्सजेंडरला भेटून नंतर सिव्हिलच्या डीनना याबद्दल सविस्तर सांगितले.

त्यानंतर डीन यांनी संबंधित डॉक्टर व त्या डिपार्टमेंटच्या हेडना बोलावून मिटिंग घेऊन त्यांनी सांगितले की, 'सर्व डॉक्टरांना एमएसएम-टीजीबद्दलची माहिती देणे गरजेचे आहे.'

■ **'मुस्कान'चा सहभाग**

महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदमध्ये मुस्कान संस्थेने सहभाग घेतला आणि जेवणाच्या व्यवस्थेची जबाबदारी घेतली. यावेळी तिथे आलेल्या इतर संस्था, संघटनांना 'मुस्कान'ची ओळख झाली, तसेच बाते आमन की' व 'मावा' या कार्यक्रमातदेखील 'मुस्कान' सहभागी झाले होते.

■ **व्हॉटस्‌अप ग्रुप**

सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी, सातारा आणि कराड येथे व्हॉटस्‌अप ग्रुप काढण्यात आले. त्याद्वारे संघटनेचे काम सर्व कम्युनिटीपर्यंत पोहोचविले जाते.

■ **भिशीची माध्यमातून बचत**

जी लोकं आपल्या पार्टनरवर-जोडीदारावर पैसे खर्च करीत होते, त्याचे प्रमाण संघटनेमुळे कमी झाले आहे. त्यामुळे त्यांना बचत करण्यासाठी पर्याय उपलब्ध झाला म्हणून ते भिशीच्या माध्यमातून बचत करीत आहेत.

**'मुस्कान'च्या कामात आलेले अडथळे**

१) समलिंग संबंधातील व्यक्ती (एमएसएम) व ट्रान्सजेंडर (टीजी) यांच्यातील अंतर्गत भांडणे

२) आरोग्याची काळजी घेण्याबातत

३) काही एमएसएम व टीजी स्वतःच्या कुटुंबात स्वतःच्या ओळखीसंदर्भात मुक्तपणे व्यक्त होत नसल्यामुळे ते समोर येण्यास घाबरतात

४) पोलिस, गुंडांचा त्रास

५) सरकारी कार्यालयात अडथळा

६) गुरू आणि चेला यांचा अडथळा

७) मोबाईल फोन चालू नसणे

८) जागेचा अडथळा

९) एका संघटनेत असून दुसऱ्या संघटनेत हस्तक्षेप करणे.

■ आपल्यात माणुसकीबद्दल आस्था हवी, शिवाय मी एक माणूस असून, मी समोरच्याकडेसुद्धा एक माणूस पाहावे. कारण, एखादा एमएसएम (समलिंगी संबंधातील पुरुष) हा घरातल्यांना एमएसएम आहे हे माहीत नसतं म्हणून तो आपली ओळख लपवतो; पण याउलट एक ट्रान्सजेंडर स्वत:ला स्त्री समजत असतो म्हणून त्याला असं वाटतं की, त्याच्या मनाप्रमाणे सर्वकाही व्हावं. त्यामुळे एमएसएम व ट्रान्सजेंडर्समध्ये अंतर्गत ताणतणाव होतात.

■ ट्रान्सजेंडर व एमएसएम यांना आरोग्याची माहिती नसते. म्हणून ते आरोग्याची तपासणी करण्यास टाळाटाळ करतात. जरी संस्थेतील पीअर किंवा ओआरडब्ल्यू बोलवायला गेला, तर येतो नंतर, उद्या येतो असं

बोलून टाळाटाळ करतात.

■ गुरू कोणत्याही कार्यक्रमात गेला नाही तरी चेल्यांनाही जायचे नाही आणि चेला जरी गेला तर त्याला त्रास देतात किंवा चेल्यांचे मंगती, कार्यक्रम बंद करतात.

■ मोबाईल बंद ठेवल्यामुळे संस्थेच्या मिटिंगमध्ये काय काय झाले किंवा कम्युनिटीमध्ये काय झाले याबाबत काही समजत नाही, तसेच व्हॉटस्‌ॲपवर रिपोर्ट ही कळत नाहीत.

■ जागेचा अडथळा असा आहे की, ट्रान्सजेंडर्सना घर मिळत नाही आणि जर भाड्याने रूम घ्यायची असेल, तर ५००च्या रूमला ५००० भाडे आकारतात आणि वरून लाईट, पाणी बिल वेगळं घेतात.

**■ सातारा येथे पोलिसांची मदत**

सातारामधील वाडे फाट्यावरती एमएसएम, ट्रान्सजेंडर लोक धंदा करतात; पण ते दिवसा पँट-शर्टवर, तर रात्री साडीवर असतात. धंदा करताना त्यांचे मालक व पार्टनर येतात आणि जबरदस्तीने तसेच बिनपैसे देता त्यांच्यासोबत सेक्स करतात आणि इतर गुंडांचापण खूप त्रास आहे. येणाऱ्या गिऱ्हाईकाकडून पैसे काढून घेणे. त्यांना मारहाण करणे, असे प्रकार खूप दिवसांपासून सुरू आहेत. मग यासंदर्भात मिटिंग घ्यायची ठरली आणि सांगली, साताऱ्यामध्ये मिटिंग झाली. या मिटिंगमध्ये, प्रत्येक ट्रान्सजेंडरने धंद्यावरती २०० रुपयांप्रमाणे गिऱ्हाईकाकडून पैसे घ्यायचे ठरले; पण ग्रामपंचायत परिसरात ट्रान्सजेंडर्सना धंद्याला थांबू देणार नाही, असा अर्ज गावकऱ्यांनी पोलिस स्टेशनला दिला. नंतर आम्हाला पोलिसांनी बोलावून घेतले व तेथील ग्रामपंचायतींनी तुमच्याबद्दल तक्रार दिल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही पोलिसांनी आमच्या खासगी जीवनाबद्दल तसेच आमच्या अधिकाराबद्दल तसेच संग्राम संस्थेबद्दलदेखील माहिती दिली. काही दिवसांनी मीना शेषू मॅडमनी 'संग्राम'तर्फे सातारा येथे पोलिसांबरोबर मिटिंग घेतली. त्याच्यामुळे वाडे फाटा येथे ट्रान्सजेंडर लोकांना पोलिस आणि गुंडांकडून होणारा त्रास कमी झाला, तसेच जरी कधी गुंड लोक वाडे फाटा इथे येऊन त्रास देऊ लागल्यास तसेच जर कोणी ट्रान्सजेंडरने पोलिसांना फोन केल्यास पोलिस लगेच त्या ठिकाणी पोहोचून ट्रान्सजेंडर्सना मदत करतात.

**■ 'दालसा'च्या माध्यमातून मतदान कार्ड प्राप्त**

जिल्हा विधि प्राधिकरण सेवा समिती (दालसा)ची मिटिंग सांगली व सातारा येथे घेण्यात आली. यामध्ये जिल्हा दिवाणी न्यायाधीश, त्यासंदर्भातील वकील व त्याचबरोबर 'दालसा'चे कार्यकर्ते हजर होते. सांगलीमध्ये तेथील सर्व ट्रान्सजेंडर व सातारामधील सर्व ट्रान्सजेंडर मिटिंगसाठी हजर होते. या मिटिंगमध्ये ट्रान्सजेंडर्सना मतदान कार्ड मिळावे म्हणून मुस्कान संघटनेने जिल्हा विधि प्राधिकरण सेवा समितीकडे मागणी केली. त्याप्रमाणे सांगलीमध्ये १८, तर कराडमध्ये १५ ट्रान्सजेंडरना मतदान कार्ड प्राप्त झाले.

**■ 'दयार'बरोबर चर्चा**

दयार हे हिजडा कम्युनिटीचे घर आहे. रीत, परंपरा आहे. 'रीत टाकणे म्हणजे हिजडापणात सामील होणे.' दयारमध्ये नायक, गुरू, चेले राहतात.

मंगती करणे, बदाई मागून आपला उदरनिर्वाह ते करतात. 'दयार'चे नियम ठरलेले आहेत. सकाळी ८ ते ९ या वेळेत मंगती/बदाईसाठी जाणे व रात्री ८च्या आत 'दयार'मध्ये परत येणे; पण काही ट्रान्सजेंडर्स हे

'दयार'बाहेर राहतात, जे ट्रान्सजेंडर खांजरा व मंगती मागतात. ते मुस्कान संघटनेत होते. ते सुरुवातीपासूनच मुस्कानशी संबंधित होते; पण काही कारणास्तव त्यांच्याशी संबंध बिघडले गेले. कम्युनिटीला मुस्कान संघटनेमुळे आपले हक्क व अधिकार समजू लागले. त्यामुळे 'दयार'च्या रीती-रिवाजाला अडथळा येईल, तसेच काही चुकीच्या गोष्टी 'दयार'च्या ट्रान्सजेंडर्सना कोणीतरी पसरू लागल्यामुळे संबंध बिघडू लागले. 'दयार'च्या लोकांना त्यांच्या पद्धतीने जगायचे होते.

कालांतराने ट्रान्स बिल आल्यामुळे आम्ही 'दयार'मध्ये जाऊन हे बिल काय आहे, यासंबंधी सविस्तर माहिती दिली. मुस्कान संघटनेने 'दयार'मध्ये येणे-जाणे करण्यातून त्यांच्याशी संपर्क वाढविला. त्यांच्या मनातील गैरसमज दूर केले. त्यांनी ट्रान्स बिलाची माहिती घेण्यासाठी त्यांनी त्यांच्यातीलच एक प्रतिनिधी पाठविला.

ट्रान्सजेंडर्सना ट्रान्स बिलासंबंधी माहिती देण्यासाठी डेक्कनमध्ये कार्यक्रम घेतला; पण या कार्यक्रमाला 'दयार'मधील कोणच ट्रान्सजेंडर आले नाही; पण आम्ही कार्यक्रमाची सर्व माहिती व्हॉटस्ॲप व व्हिडिओद्वारे त्यांच्यापर्यंत पोहोचविली. तेव्हा त्यांना कळाले की, आम्ही त्यांच्यासाठी काहीतरी करीत आहोत. मग आमच्याशी संपर्क ठेवून ते ट्रान्सजेंडर्सदेखील संघटनेत सामील झाले.

मुस्कान संघटनेत व 'संग्राम'च्या टार्गेटेड इंटरव्हेंशनसाठी-टी.आय. प्रकल्पासाठी त्यांनी दोन ट्रान्सजेंडर कामासाठी दिले. सध्या दयार व संघटना यांच्यात संबंध वाढले असून, 'दयार'मधील ट्रान्सजेंडर्स संपर्कात राहतात. संघटनेतील व्यक्ती कायम 'दयार'च्या संपर्कात राहतात, त्यामुळे 'दयार'मध्येही मुस्कान संघटना झाली असून ती संघटित आहे.

**तक्रारींचे निवारण**

## मुस्कान संघटनेमुळे मिळाले रेशनकार्ड

मी मुस्कान शेख (रा. म्हाडा कॉलनी, मिरज). मी एक ट्रान्सजेंडर आहे. मला माझे स्वतंत्र रेशनकार्ड हवे होते. त्यासाठी मी मिरज नगरपालिकेत गेले होते. तेथे मी रेशनकार्डविषयी विचारणा केली. त्यांनी मला एका एजंटची माहिती सांगितली. मग त्या एजंटाकडे गेले. तेव्हा त्यांनी, रेशनकार्ड काढण्यासाठी तुमच्याजवळ काय काय कागदपत्रे आहेत, असे मला विचारले.

तेव्हा माझ्याजवळ फक्त आधारकार्ड होते. माझ्याजवळ उत्पन्नाचा व रहिवासी दाखला नव्हता. ती कागदपत्रे काढावी लागतील नाही तर तुमचे रेशनकार्ड निघणार नाही, असे त्यांनी सांगितले. त्यासाठी त्यांनी माझ्याकडे ७,००० रुपयांची मागणी केली. तेव्हा मी त्यांना म्हणाले की, माझ्याजवळ एवढे पैसे नाहीत. त्यांनी असे सांगितले की, ट्रान्सजेंडर लोकांना आम्ही रेशनकार्ड देत नाही. जर तुम्ही पैसे दिले तर आम्ही तुमच्यासाठी रेशनकार्ड तयार करून देऊ.

मी त्यांना सांगितले की, मी भीक मागून, मंगती करून मी पैसे कमवते. माझ्याजवळ एवढे पैसे नाहीत. मग मी कुठून पैसे आणून देणार? त्यावर ते एजंट म्हणाले की, अजून दोन महिने थांबा आपण काहीतरी करू. नंतर दोन महिने झाले व मी पुन्हा त्यांच्याकडे रेशनकार्ड काढण्यासाठी गेले तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुमचे रेशनकार्ड मिळूच शकत नाही, रेशनकार्ड हवे असल्यास तुम्हाला कोणीतरी तुमचा घरचा वारसदार

लावावा लागेल. मी खूप विनवण्या केल्यानंतर ते म्हणाले, कमीत कमी ५००० रुपये तरी तुम्हाला द्यावे लागतील. मग मी घरी आले. त्यानंतर माझी मैत्रीण अक्षता व मी अन्नधान्य पुरवठा कार्यालयात गेलो. तेथील अधिकाऱ्यांना भेटून झालेला प्रकार सांगितला आणि त्यांना विनंती केली की, आम्हालादेखील स्वत:चे रेशनकार्ड मिळावे. ते अधिकारीदेखील म्हणाले की, ट्रान्सजेंडर लोकांचे रेशनकार्ड आम्ही देऊ शकत नाही. त्यांना मी सांगितले की, मी तर एकटीच राहते व मला राहायला घरदेखील नाही. माझी परिस्थिती खूप गरीब आहे. त्यामुळे मला स्वस्त धान्य मिळावे म्हणून रेशन कार्डची गरज आहे. तसेच मी त्यांना संग्राम संस्थेत पीअर म्हणून काम करते. तेथे मी माझ्यासारख्या ट्रान्सजेंडर लोकांच्या अन्याय व अधिकार तसेच त्यांच्या हक्कासाठी लढते. त्यावर त्यांनी, दोन दिवसांनी काही कागदपत्रे घेऊन येण्यास सांगितले, तसेच त्यांनी मी जेथे राहते तेथील घरमालकाचे लाईट बिलची झेरॉक्स व त्यांना स्वत: सहीसाठी बोलवून आणण्यासाठी सांगितले. काही कागदपत्रे ॲफेडेव्हीट करण्यासाठीदेखील सांगितले. त्यासाठी त्यांनी काही पैसे घेतले नाहीत आणि मला आठ दिवसांत रेशनकार्ड देऊ असे आश्वासन दिले. आठ दिवसांनी मला माझे स्वत:चे रेशनकार्ड मिळाले.

■■■

# ‘मुस्कान’अंतर्गत कार्यक्रम















# ‘मित्रा’चे यश

‘मित्रा’ ही सेक्सवर्कर्सच्या मुला-मुलींची संघटना असून, त्यांचे आरोग्याबरोबरचत्यांना सुरक्षित वातावरणात राहून शिक्षण मिळावे, तसेच त्यांचे आईशी नातेसंबंध दृढ राहण्यासाठी वारंवार प्रबोधन करणे, आणखी महत्त्वाचे म्हणजे अशा मुला-मुलींना आवश्यक असणारी कागदपत्रे मिळवून देणे, याबाबत सहकार्य करणे, अशी कार्ये ‘मित्रा’च्या माध्यमातून केली जातात.

१) जेजे ॲक्टनुसार सीडब्ल्यूसी (बालकल्याण समिती)मार्फत ‘मित्रा’ हॉस्टेलचे रजिस्ट्रेशन झाले. सदरचे हॉस्टेल निपाणी येथे असून, सीडब्ल्यूसीच्या नियमावलीनुसार सर्व मुला-मुलींची कागदपत्रे तयार करून माहितीच्या फाईलींचा बंच करून सीडब्ल्यूसी समितीसमोर मुलांना हजर केले. सीडब्ल्यूसीच्या नियमानुसार अनेक समित्यांची स्थापना केली. सीडब्ल्यूसीकडून मूल्यमापनसुद्धा झाले. या हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलां-मुलींकरिता राहणे व येण्या-जाण्यासाठी रस्ते तसेच स्वतंत्र बाथरूम तयार करून घेतले.

२) मुला-मुलींना आपण शिक्षण द्यावे, त्यांना काही पर्याय देऊ नयेत. कारण, आपल्या मुलांना एवढी समज नसते. त्यांचा निर्णय आपण घ्यावा. त्यामुळे सर्व कम्युनिटीतील मुला-मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली व लहान वयात मुलींचे विवाह होत होते. गेल्या वर्षी मात्र एकसुद्धा बालविवाह झाला नाही. १८ वर्षांखालील मुला-मुलींना कारण समजावून सांगण्यात आम्ही यशस्वी झालो की, विवाह केवळ एकाट्याशी झाला, तरी त्या संपूर्ण कुटुंबाशी नवीन नाते निर्माण होते आणि ते नाते, जबाबदारी सांभाळण्यासाठी आपल्यात तेवढी समज लागते. ती नसताना तिचा विवाह लावून दिला तर कुटुंबात अनेक वादाचे, हिंसेचे प्रकार घडतात. त्यामुळेच मुलगी समजदार म्हणजेच सज्ञान झाल्यावर तिचा विवाह लावून द्यायला पाहिजे.

३) १७ वर्षांची एक युवती एएनएम नर्सचा कोर्स करीत होती. त्यादरम्यान ती एका पुरुषाच्या प्रेमात पडली. विशेष म्हणजे तो विवाहित होता आणि त्याला एक मुलगीसुद्धा होती. तरीही ती युवती त्याची पत्नी म्हणून राहायला तयार होती आणि कोर्स अर्धवट सोडणार होती. त्या युवतीला व मुलाच्या परिवाराला बोलावून समजून सांगितले. प्रेमाचे भूत डोक्यातून जाण्यासाठी तिला स्वाध्यायनमध्ये संस्थेच्या देखरेखीखाली ठेवले. त्यानंतर ती त्या पुरुषाला विसरली व तिने एएनएमचा कोर्स पूर्ण केला. आता तिला नोकरी लागली असून, ती स्वत:च्या पायावर उभी आहे. अशा प्रकारच्या नऊ मुली असुरक्षित ठिकाणी होत्या म्हणून त्यांचे पालक त्यांचा विवाह लावून देणार होते. त्या पळून जाण्याच्या स्थितीत होत्या. मग आम्ही त्यांना स्वाध्यायनमध्ये शिकविले आणि राहण्याची सोय केली.

४) शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. त्यामुळे मुला-मुलींना बाहेरचे जग कसे असते. काय असते, हे जाणून घेण्यास मदत मिळाली. नवनवीन ठिकाणची माहिती मिळाली व या मुला-मुलींनी इतरांना ती सांगितली. त्यामुळे इतर मुलं-मुली आपण शिकलो तर आपल्याला फिरायला मिळते. अनेक प्रकारची माहिती मिळते, म्हणून क्लास आणि मित्रा होस्टेलला मुलांचे प्रमाण वाढले.

५) मागील वर्षी अनेक मुला-मुलींना आईचे नाव लावले.

कऱ्हाड : ४

सांगली : ५

मिरज : २

एकूण : ११

**सन २०१८ ते २०१९**

| विषय | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| सल्पी मेंटरी क्लास | २४ | २० | ४४ |
| स्वाध्यायन | ३ | १० | १३ |
| मित्रा होस्टेल निपाणी | १८ | २३ | ४१ |

**आव्हाने**

१) मुले व मुली शिक्षण घेत असताना तिथल्या नियमाप्रमाणे बहुतांश मुले वागत नाहीत आणि त्यांच्या आयासुद्धा मुलांचे शिक्षणाचे नुकसान झाले तरी मुलं जे सांगतात, तेच ऐकून निर्णय घेतात. त्यामुळे तीन मुलं स्वाध्यायनमधून मधेच निघून गेली आणि दहावीला सर्व विषयांत नापास झालीत. या मुलांना व त्यांच्या मातांना समजावून सांगण्यात आम्ही कमी पडलो.

२) व्हॅम्पचे एकूण एरियात मुलं किती व मुली किती आहेत किंवा ते सध्याला काय शिकतात किंवा आरोग्याच्या काही अडचणी आहेत का, हे जाणून घेण्यास कमी पडलो. यावर्षी आम्ही सर्व्हे करायचे ठरविले आहे व संघटना मजबूत करायचे ठरविले आहे. सर्व्हे करून त्यांचा एखादा कार्यक्रम घ्यायचे ठरविले आहे. जेणेकरून त्यांच्या अडचणी आम्हाला समजतील व त्यावर आपण काय करू शकतो, यांचा विचार करता येईल.

**मित्रा संघटना**

१) ट्यूशन क्लास, मित्रा होस्टेल, स्वाध्ययन याबद्दल सर्व ठिकाणी कम्युनिटी मिटिंगमध्ये माहिती दिली. शिक्षणाचे महत्त्व पालकांना समजावून सांगितले आणि मुलींचा लवकर विवाह होऊ नये म्हणून गल्ल्या-गल्ल्यांमध्ये स्त्रिया एकत्र करून मिटिंग घेऊन लवकर विवाह केल्यावर त्याचे काय दुष्परिणाम होतात, याबाबत स्त्रियांमध्ये जनजागृती केली. विवाह लवकर करू नका असे न सांगता, लवकर विवाह का लावून देता, असे विचारले तेव्हा ‘मुली पळून जातात’ असं उत्तर पालकांमधून आले. असुरक्षित वातावरण, राहण्याची सोय नसल्यामुळे तसेच शिक्षणाच्या महत्त्वाची समज नसल्यामुळे मुलींचे लवकर विवाह लावून देतात. यावर उपाय म्हणून एक पर्याय व्यवस्था निर्माण करण्यात आली. त्यासाठी बालाजीनगरमध्ये स्वाध्ययनची सुरुवात केली. पालकांसोबतही चर्चा करताना, ‘विवाह हा केवळ एका व्यक्ती न होता पूर्ण कुटुंबाशी होतो आणि लहान वयात सर्व जबाबदारी पेलावयास लागते.’ हे पटवून सांगितले.

२) शिक्षणाची आवड निर्माण व्हायला पाहिजे म्हणून सहलीचे नियोजन केले. त्यातलाच भाग म्हणून दिल्ली येथे शैक्षणिक सहल आयोजित केली. दिल्ली, आग्रा, फत्तेपूर सिक्री ही स्थळं दाखविली. कारण, दिल्ली ही भारताची राजधानी असून, इतिहासाच्या पुस्तकामधील भरपूर माहिती येथीलच आहे. इ. आठवीच्या पुढील मुलं व मुली होत्या. १४ मुली व ६ मुलं व मित्रांचे कार्यकर्ते ६ जण गेले होते. स्वाध्ययन, मित्रा होस्टेल व मित्रांचे कार्यकर्ते मिळून टोप संभापूर येथील वॉटर पार्कला गेले होते.

३) दिवाळी सणाला होस्टेलमधील जे काही अडचणींमुळे घरी गेली नाहीत, अशा मुला-मुलींसाठी

दिवाळीचे फराळ तयार करायला शिकविले. आकाशकंदिल बनवायल्या शिकविले. मुलांना बाजार करायला शिकविले. रांगोळी स्पर्धाही घेतली. परत दुसऱ्यांदा टोप संभापूरमधील वॉटर पार्कला जाण्यासाठी सहलीचे आयोजन करण्यात आले.

४) सीडब्ल्यूसीच्या नियमाप्रमाणे हॉस्टेल रजिस्ट्रेशन करून घेतले व त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे तसेच मुला-मुलींची कागदपत्रे गोळा केली. तिच्या नियमानुसार राहण्याची व खाण्याची व्यवस्था वेगवेगळी केली. सीडब्ल्यूसीसमोर २० मुलांना कागदपत्रांसोबत हजर केले आणि रजिस्ट्रेशन केले.

५) 'मित्रा'चे प्रतिनिधी म्हणून सीडब्ल्यूसीच्या हॉस्टेल व्यवस्थापनबाबतच्या माहितीच्या ट्रेनिंगला महेश व अनिल पांढरे हे दोघे गेले होते.

६) हॉस्टेलमध्ये सीडब्ल्यूसीच्या नियमाप्रमाणे होम कमिटी, मॅनेजमेंट कमिटी व फूड कमिटी निवडली.

७) मुला-मुलींची 'गुड टच', 'बॅड टच' व लैंगिक शिक्षणाबद्दल कविता माळी, संगीता भिंगारदिवे यांनी मुलींसाठी, तर राजेंद्र नाईक व शांतिलाल काळे यांनी कार्यशाळा घेऊन मुलांना माहिती दिली.

८) हॉस्टेलची मुले आजारी पडल्यावर 'मित्रा'च्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष जाऊन त्यांची काळजी घेतली.

९) हॉस्टेलमधून जाणाऱ्या मुली-मुलांच्या शाळेत जाऊन भेटली. गॅदरिंगमध्ये मदत केली.

१०) स्वाध्यायनला येणाऱ्या मुला-मुलींच्या पालकांची मिटिंग घेतल्यानंतर शिक्षकांची मिटिंग घेतली. स्वाध्यायन चालविण्याकरिता लागणारा किराणा माल व स्टेशनरी आणून देण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले. तसेच मुले आजारी पडल्यावर त्यांना उपचारासाठी दवाखान्यात घेऊन गेले. काही कारणांमुळे मुलींजवळ राहत होतो.

११) परीक्षेचे नियोजन करून मुलांना परीक्षा केंद्रावर सोडणे आणि परत आणणे या गोष्टी करीत होतो.

१२) अंजली कैंचकनावर ही 'मित्रा' हॉस्टेलमध्ये राहिल्यानंतर ती मेंगलोरला गेली. तेथे ती प्रथम नीट परीक्षा चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाली. त्यावेळी तिला जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एमबीबीएस शिक्षणाकरिता प्रवेश मिळाला. अंजलीची जिद्द आणि 'मित्रा'च्या कार्यकर्त्यांनी तिला दिलेले बळ तसेच 'संग्राम'ने तिला दिलेले आर्थिक मदत, आधार याचे फलित म्हणून ती पुढे यशस्वी होत आहे. मात्र मागे वळून पाहताना तिच्या कागदपत्रांसाठी कार्यकर्त्यांनी घेतलेले खडतर परिश्रम आणि अविरत पाठपुरावा हा तिच्या जीवनमार्गासाठी फारच मोलाचा ठरला, असे आम्हाला वाटते. तिच्या मेहनत आणि जिद्दीचे कौतुक करण्यासाठी इतरांनाही प्रोत्साहन मिळावे या हेतूने 'संग्राम' आणि 'वँप'च्या कार्यक्षेत्रात आम्ही सर्वांनी सेलिब्रेशन केले.

१३) कार्यकर्त्यांच्या प्रोत्साहन व प्रेरणेमुळे ज्योती माळी हिने नर्सिंगचा कोर्स पूर्ण केला.

**प्रत्यक्षातील फरक**

१) शिकवणीमुळे मुलांमध्ये किती फरक पडला.

२) शाळेत जाऊन कितीजण भेटून आला आहे. त्यात किती फरक पडला आहे.

३) ह्यावर्षी गोकुळनगरमधील ७ मुलांना शाळेत प्रवेश करून दिले. ३ इंग्लिश मीडिअम, ४ मुले मराठी शाळेत आहेत.

४) दहावीच्या वर्गात जाऊन आम्ही भेटत होतो. तिला ६० टक्के गुण पडले आहेत.

५) चौथीला एका मुलीला प्रवेश घेऊन दिला होता; पण ती शाळेत जात नव्हती. आम्ही वारंवार तिला भेटून तिच्यासोबत चर्चा केली. तेव्हा ती शाळेत गेली. आता ती पाचवीच्या वर्गात शिकते.

६) दोन मुली नववी पास झाल्या आहेत.

७) सातवीला एक मुलगी आहे. ती खेळात व नृत्य स्पर्धेमध्ये हुशार आहे.

८) आठवीला दोन मुले आहेत. तीपण बऱ्यापैकी हुशार आहेत.


शिकवणीमुळे मुलांना शाळेची आवड वाटू लागली आणि मुले शाळेत जाऊ लागली. शाळेत जे काही कार्यक्रम असतील त्यात भाग घेऊ लागली आहेत. त्यात यश मिळवू लागले आहेत. वेगवेगळ्या स्पर्धांमध्येपण भाग घेऊ लागलेत. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाची आवड वाढू लागली आहे. शाळेत वेगवेगळ्या गोष्टी करण्यास सांगू लागले. संगणक शिकणे, गेम, संगीत, वाद्य वाजविणे, तबला, ढोल वाजविणे, व्यायाम, नाचगाणी, भाषण करणे, आदी गोष्टींत त्यांचा रस  वाटू लागला. त्यामुळे मुले शाळेत जाऊ लागली. पालक मिटिंग वगैरे असेल तर मुलं आपापल्या पालकांना घेऊन जाऊ लागले. पालकांनापण, आपला मुलगा शाळेत जातो आणि त्याला कितीपर्यंत वाचता लिहिता येते, हे समजू लागले.

■■■

# शिकवणी वर्ग, मित्रा हॉस्टेल व स्वाध्यायन













# नजरिया

नजरियाची सुरुवात २०११ साली झाली, तेव्हा फक्त गृहभेटी करत होतो. नंतर महिलांशी बोलू लागलो. मग ग्रुप चर्चा, महिला कार्यक्रम, हायस्कूल कार्यक्रम, मदरसा, उर्दुशाळा, अंगणवाडी पालक मेळावे करू लागलो. मग जेव्हा अहमदाबादचे ट्रेनिंग घेऊन आलो, तेव्हा खरा इस्लाम काय आहे, कुराणमध्ये काय लिहिले आहे, हे समजले आणि तेव्हापासून नजरियाच्या कामाचे स्वरूप बदलले.

नजरिया मुस्लिम महिलांना सरकारी दवाखाना, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊ लागली. महिलांमध्ये ग्रुपचर्चा घडवून त्यांना त्यांचे हक्क, अधिकार यांबाबत माहिती देत आहे. मुलांना शिक्षण देणे किती गरजेचे आहे, हे सांगू लागलो. मदरसामध्ये धार्मिक शिक्षणासोबत शालेय शिक्षण किती महत्त्वाचे आहे, त्याचबरोबर व्यवसायिक शिक्षण, संतुलित आहार, मदरसाच्या मुलांना सर्व सुविधा मिळतात का, यावर काम करीत आहे. कमी वयात लग्न केल्यामुळे त्याचे काय परिणाम होतात, त्याबद्दल चर्चा करीत आहोत. नजरिया धर्म गुरूसोबतही काम करते. जे कुराणमध्ये खरे लिहिले आहे. त्याबद्दल सांगतो. कुराणमध्ये, इस्लाममध्ये जे स्थान महिलांना दिला आहे, त्याबद्दल महिलांबरोबर चर्चा करतो. मुस्लिम समाजात पण काही वंचित घटक आहे. त्यांच्यासोबत काम करीत आहे. पहिला नजरिया तालुक्यात काम करत होते; पण आता खेडोपाडीपण आपल्या कामाचा विस्तार वाढवत आहे.

यावर्षी नजरियाचे सर्वांत मोठे यश म्हणजे नजरिया पहिला इज्तेमाला जात नव्हते; पण खरा इस्लाम काय आहे, याचे ट्रेनिंग घेतल्यापासून आम्ही महिला इज्तेमाला जाऊ लागलो. त्यामध्ये कुराणमध्ये महिलांना किती मोठा दर्जा दिला आहे. त्यांचे हक्क, अधिकारा याबद्दल त्यात लिखित स्वरूपात माहिती आहेत. याबद्दल महिलांशी चर्चा करत आहोत. नजरिया इज्तेमामध्ये जाऊ लागले. कारण, महिलांशी आमोरासमोर बोलण्यासाठीचे एक चांगले माध्यम आहे आणि इज्तेमामध्ये कुराणबद्दल आम्ही सविस्तर बोलू शकतो. ते बोलण्याचे एक चांगले व्यासपीठ आहे. कुराणबद्दल इतर कोठेही आम्ही बोलू शकत नाही. खूप ठिकाणी असे आहे की, कुराण, हदिज चुकीच्या पद्धतीने सांगितले जाते आणि यात अजून एक म्हणजे शिया आणि सुन्नी या लोकांचे वेगळे इस्तमा असतात. खरा इस्लाम काय आहे. याबद्दल नजरिया आता धर्मगुरूंसोबत बोलत आहे आणि इज्तेमा कार्यक्रम होत आहे आणि हे नजरियासाठी सगळ्यात मोठे यश आहे. पहिला तालुकामध्ये काम करत होतो, आता गावपातळीवर पण काम करतो. ज्या गावात इज्तेमा होतात. तिथे इज्तेमा कार्यक्रम घेतो आणि ज्या ठिकाणी इज्तेमा होत नाही त्या ठिकाणी महिला कार्यक्रम घेऊन त्यांना सक्षम करण्याचे काम करत आहे.

**मुख्य कार्य**

**१) सर्व्हे करणे**

यामध्ये आम्ही मुस्लिम समाज जास्त कुठे आहे, त्या ठिकाणी जातो आणि त्यांच्या घरात किती लोक आहेत, मग त्यात स्त्री-पुरुष, मुले-मुली, विधवा, परित्यक्ता, अपंग, मतिमंद असल्यास त्यांचा सर्व्हे करतो आणि नजरिया काय काम करते त्याबद्दल माहिती देतो आणि त्यांना ही संघटना नजरिया महिलांवर होणारे हिंसा, अन्याय यांवर काम करते हेही सांगतो. कारण, एखाद्या महिलेवर अन्याय होत असेल, तर ती आमच्याबरोबर बोलावी आणि तिला मदत व्हावी हा यामागचा उद्देश असतो.

**२) गट चर्चा**

सर्व्हे करीत असताना गल्ल्या-गल्ल्यांमधील महिलांशी संवाद साधून महिलांच्या आरोग्याबद्दल असलेल्या शासकीय योजनांची त्यांना माहिती देतो आणि आरोग्याच्या समस्या असतील तर सरकारी दवाखान्यात जावयास सांगतो. कारण, सरकारी सेवा आपल्यासाठीच आहे, त्याचा उपयोग करून घ्यावा, याबाबत त्यांच्यात जागृती करतो.

**३) महिला कार्यक्रम**

महिलांच्या आरोग्याच्या समस्या आणि त्यासाठी असलेल्या शासकीय योजना तसेच मुलांना शिक्षण देणे किती गरजेचे आहे, याबद्दल माहिती देतो. मुस्लिम समाजात मुलांना दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांना पारंपरिक व्यवसायात घातले जाते. त्यामुळे मुलांना उच्चशिक्षण द्यावे तसेच मुलगा किंवा मुलगी यांचे कमी वयात लग्न लावून देऊ नयेत, त्यामुळे भविष्यात खूप अडचणी, त्रासाला सामोरे जावे लागते, याबाबत त्यांच्यात जागृती करतो.

**४) अंगणवाडी भेट**

जेव्हा आम्ही अंगणवाडीला भेट देतो, तेव्हा परिसरात मुस्लिम मुले किती आहेत आणि किती मुलं शाळेत येतात, याची चौकशी करून जी मुले अंगणवाडीत येत नाहीत त्यांच्या पालकांना भेटून त्यांना शाळेचे महत्त्व सांगतो. तसेच शाळेत पौष्टिक अन्न मिळते आणि ते मुलांसाठी असते हेही पटवून देतो.

**५) मदरसा भेट**

मदरसामध्ये धार्मिक शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर शालेय शिक्षण, व्यावसायिक शिक्षणासोबतच मुलांच्या आरोग्याबद्दल माहिती देतो आणि गरजू मुलांना जमातकडून शिष्यवृत्ती मिळवून देतो. काही अनाथ मुले असतील तर त्यांना शिक्षणासाठी मदरसामध्ये पाठवितो.

**६) जमात भेट**

जमातबरोबर काम करीत असताना गरजू मुलांना मदत करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देतो. महिलांवर अन्याय, अत्याचार झाला असेल, तर नजरिया जमातसोबत चर्चा करून सर्वांशी बोलून त्यांना समोरासमोर बसवून योग्य तो संवाद साधून ती तक्रार मिटवतो. अपंग, मतिमंद, विधवा महिलांना जमातकडून मदत मिळवून देतो. लग्नात जे निकाहनामा तयार करतात, त्याबद्दलही जमातबरोबर चर्चा करतो. निकाह जमात काय लिहिलेले असते, त्याबद्दल चर्चा करण्यास सुरुवात केली आहे. शिवाय जमातसोबत कार्यक्रम घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

**७) गरोदर माता तपासणी दिन (ANC Day)**

गरोदर माता तपासणी दिनी आम्ही सरकारी दवाखान्यात जातो. कारण, तेथे मुस्लिम महिला उपचारासाठी येतात. त्यांना आम्ही आरोग्य, एचआयव्ही, एड्स, आहार यांबद्दल माहिती देतो. सरकारी दवाखान्यात मिळणाऱ्या सेवांचा आपण उपभोग घेतला पाहिजे. कारण, त्या सेवा आपल्याचसाठी असतात, याबद्दल त्यांच्यात जागृती करतो.

**८) हायस्कूल प्रोग्रॅम**

नजरिया हायस्कूल प्रोग्रॅम घेऊन त्यात मुलांना लैंगिक शिक्षण, एचआयव्ही, एड्स, आहार, आरोग्य, त्यांचे हक्क अधिकार, एखाद्याने स्पर्श केला, तर तो चांगला किंवा वाईट कसे ओळखायचे याबद्दलपण माहिती देतो. गरजू विद्यार्थ्यांसाठी जमातकडून मदत मिळवून देतो. त्याचबरोबर स्त्री-पुरुष समानतेबद्दलही सांगतो.

**९) इज्तेमा कार्यक्रम**

नजरिया इज्तेमा कार्यक्रममध्ये शासकीय आरोग्य योजना, आहार, शिक्षणाचे महत्त्व कुराणमध्ये महिलांना किती मोठा दर्जा दिला आहे, प्रत्येक सुराहमध्ये महिलांचा उल्लेख आहे. याबद्दल सांगतो. जर एखाद्या महिलेवर अन्याय, अत्याचार होत असेल तर आम्ही तिच्या मदतीला धावतो. मग ती मदत पोलिस स्टेशन, जमात कोर्ट यांपैकी कोणतीही असो. हुजुरू (स.अ.व.) यांच्या जीवनशैलीवर चर्चा करतो. सुराह निसामध्ये महिलांना प्रोपर्टीमध्ये किती हिस्सा द्यावा, याबाबत कुराणमध्ये उल्लेख आहे. याबद्दलपण माहिती सांगतो. लग्न मेहर किती घ्यावा, याचा हक्क त्या महिलेला आहे याबद्दल सांगतो.

**१०) शासकीय कार्यालय भेट**

अ) पंचायत समितीतील पेन्शन विभागामध्ये संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना यांची माहिती त्या योजनांचा लाभ महिला मिळवून देत आहोत.

**ब) सेतू कार्यालय**

इथे रेशनकार्ड बनवून देणे, विभक्त करून देणे यांचे काम करते आणि कार्यक्रमात माहितीही देतो.

**क) आधार कार्ड**

आधार कार्ड नसलेल्यांना ते कसे मिळवायचे याची माहिती देतो. तसेच काही महिलांना आधार कार्ड कसे काढायचे माहीत नसल्याने त्यांचा ते काढून देण्यास आम्ही मदत करतो.

**ड) मतदान कार्ड**

मतदान कार्ड काढण्यासाठी उद्युक्त करण्याबरोबरच त्यासाठी मदतही करतो.

**इ) आवास योजना**

ग्रामपंचायत, नगरपरिषद येथून आवास योजनांची माहिती घेऊन ती महिलांपर्यंत पोहोचवितो. काहींची कागदपत्रे तयार झाल्यावर ती जमा करण्यासाठी आम्ही त्यांच्यासोबत जातो.

**फ) महात्मा फुले आरोग्य योजना**

कॅन्सर, किडनी, हृदयविकाराचा झटका  आल्यास त्यावर उपचारासाठी जे लाभ आहेत, अशा लोकांना आम्ही महात्मा फुले आरोग्य योजनेची माहिती देतो. त्याकरिता काही सरकारी दवाखाने आहेत, तिथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली जाते.

**त) जमातकडून गरजू विद्यार्थ्यांना मदत मिळवून देतो.**

जे गरजू व गरीब विद्यार्थी असतील, त्यांना जमातकडून शिष्यवृत्ती मिळवून देतो.

**■ नजरियाने केलेल्या कामाचा काय परिणाम झाला?**

जेव्हा नजरिया प्रथम गृहभेटी करीत होते, तेव्हा त्यांच्याशी महिला बोलायच्या नाहीत, शिवाय माहितीही देत नव्हत्या; पण आता त्या मनमोकळेपणे बोलतात. आपल्या समस्या सांगतात. आम्ही त्यांच्यासाठी ग्रुप चर्चा, महिला कार्यक्रम घेतो, तेव्हा त्या स्वतः आरोग्य, आहार यावर बोलतात. आपल्या आसपास कोठेही एखाद्या महिलेवर अन्याय, अत्याचार होत असेल, तर त्याला आम्हाला सांगतात. आमच्याकडून शासकीय योजनांची माहिती घेऊन त्या स्वत: घराबाहेर पडतात. कागदपत्रे तयार करण्यासाठी काही वेळा आम्हाला सोबत घेऊनही जातात. महिलांमध्ये इतकी जनजागृती झाली आहे की, त्या आता आमच्याबरोबर एचआयव्ही, एड्स व निरोधबाबत खुलेपणाने बोलत आहेत.

इज्तेमामध्ये पहिल्यांदा आम्ही जाऊ लागलो. नंतर आम्ही हळूहळू महिलांबरोबर चर्चा करू लागलो. त्यानंतर आरोग्य, आहार यांबाबत चर्चा करू लागलो. मग शासकीय योजनांबद्दल माहिती देऊ लागलो. मग

आम्हाला संस्थेने इस्लाम सिखो हे ट्रेनिंग सईदा हमीद यांच्याकडून दिले. त्याबद्दल आम्ही इज्तेमामध्ये हुजुरू (स.अ.व.) यांच्या जीवनशैलीवर चर्चा करू लागलो. कुराणमध्ये महिलांना जे स्थान दिले आहे, त्यांचे हक्क, अधिकार हे कुराणमध्ये लिखित स्वरूपात आहेत आणि सुराह निसामध्ये प्रत्येक महिलांच्या हक्काबद्दल लिहिले आहे. याबद्दल आम्ही महिलांबरोबर संवाद साधतो. त्यावेळी महिला आम्हाला प्रश्नसुद्धा विचारतात. ज्या महिला पहिला बोलत नव्हत्या, त्या आता मुक्तपणे बोलू लागल्या आहेत. 'महिलांची कमाई खाने हे हराम आहे का, असे कुठे लिहिले आहे का,' असे विचारतात. आम्ही त्यांना सांगतो की, हुजुरू (स.अ.व.) यांच्या काळात महिला कमवत होत्या. मोठमोठे व्यापार होते. त्याचबरोबर महिलांची ती हरामची कमाई कशी झाली आणि हेपण सांगतो की, महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यायला पाहिजे. केवळ महिला डॉक्टरांवर अवलंबून न राहता प्रसंगी पुरुष डॉक्टरांकडेही तपासणी, उपचार घ्यावेत, असेही सांगतो. त्यामुळे महिला आमच्यापर्यंत येण्यास तयार होतात. आम्ही शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्यावर काहींनी तर आपल्या मुला-मुलींना परत शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. त्यांना पैसे, पुस्तकांची गरज असेल तर आम्ही नजरिया जमातकडून ते मिळवून देतो. महिलांबरोबर काम करीत करीत आम्ही जमातच्या लोकांबरोबरही जोडले गेलो आहोत; पण सुरुवातीला जमातवाले आम्हाला भेटत नव्हते आणि भेटलेच तर आमच्याशी बोलायला टाळटाळ करीत होते; पण आता ते संवाद साधतात आणि तक्रार मिटविण्यास मदतही करतात. मुस्लिम समाजात काही

जाती–उपजाती आहेत. त्यात वंचित समाजही आहे आणि शिक्षणापासून तो वंचित आहे. त्यांच्या आई–वडिलांना भेटून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. आजपर्यंत आम्ही ६ मुलांना शाळेत पाठवून दिले आहे.

**■ नजरियाला काम करताना कोणकोणत्या अडचणी आल्या?**

नजरिया जेव्हा महिला कार्यक्रम घेत होती, तेव्हा खूप ठिकाणी जमातीचे लोक आम्हाला विरोध करीत होते. इज्तेमा कार्यक्रम घेताना ट्रिपल तलाकबद्दल बोलू देत नाहीत. फोटो काढू देत नाहीत. यातसुद्धा दोन प्रकारचे इज्तेमा आहेत. १) सुन्नी, शिया असे दोन प्रकारचे इज्तेमा होतात. तब्लिक इज्तेमामध्ये धर्मगुरू आम्हाला जास्त बोलू देत नाहीत. त्यांची परवानगी घ्यावी लागते आणि इज्तेमाला यायचं असेल, तर बुरखा, ड्रेस घालून या. साडी घालून येऊ नको म्हणतात. पालक मेळावा घेताना पुरुष येत नाहीत, त्यामुळे काही महिलापण येत नाही, हे एक आमच्यापुढचे आव्हानच आहे. अजूनपण आम्ही तबलिक महिलांबरोबर निरोधबद्दल बोलू शकत नाही. एचआयव्ही, एड्सबद्दलपण बोलू शकत नाही. जमातचे लोक काही ठिकाणी महिलांना आमच्याशी बोलू देत नाहीत. त्या महिलेवर कितीही मोठा अन्याय, अत्याचार झाला तरी बोलू दिले जात नाही. त्या महिलेवर दबाव आणला जातो.

**■ नजरिया आजपर्यंत काय शिकल्या?**

आम्ही यावर्षी एक नवीन गोष्ट शिकलो. खरा इस्लाम काय आहे, कुराणमध्ये काय लिहिले आहे, हेही आम्ही शिकलो. हे माहीत झाले की, मुस्लिम समाजात जाती–पडजाती आहेत. त्यामध्ये शिया, सुन्नी, भोरा, हनकी यांचा समावेश आहे. कुराणमध्ये प्रत्येक सुरामध्ये महिलांना काय दर्जा दिला आहे, त्याबद्दल लिहिले आहे. मुस्लिम समाजात महिलेला मेहेर का दिला जातो आणि किती द्यावा, याबद्दल माहिती मिळाली आणि ती रक्कम महिलांनीच ठरवायची असते, याबद्दलही माहीत झाले. सच्चा कानून काय आहे, तसेच तलाक कोणत्या पद्धतीने दिला जातो, हेही माहीत झाले.

महिलेला आई–वडील, पत्नी यांच्याकडून किती हिस्सा दिला जातो, याची माहिती मिळाली. पुरुषाला चार लग्न करायचा हक्क आहे; पण त्यात काही अटी आहेत. त्याला आपली पहिल्या पत्नीची इच्छा तिची परवानगी घ्यायला हवी आणि त्या दोघांना समान दर्जा द्यायला पाहिजे. नजरियाला मुस्लिम कायदा कानूनची माहिती मिळाली नव्हती. ती मिळाली. मुस्लिम पर्सनल लॉ हे धर्म गुरूंनी बनविले आहे.

**■ नजरियाने काय शिकले आणि आपल्या कामात त्याचा बदल कसा केला?**

इस्लाम सिखो कार्यशाळा झाली. नंतर आम्ही इज्तेमामध्ये जाऊ लागलो. त्या माहितीच्या आधारावर कुराणमध्ये महिलांना काय दर्जा आहे, त्यांचे हक्क, तसेच मेहरची रक्कमही महिलाच ठरविते आणि तिला तो अधिकार आहे याचीही माहिती देतो. खरा इस्लाम काय आहे, याबद्दल नजरिया माहिती देतात. कुराणमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या सुरामध्ये महिलांचा उल्लेख केला आहे. महिलांना आपल्या हक्कांसाठी, अधिकारासाठी लढले पाहिजे आणि आपल्या हक्कासाठी लढावे. आपल्यावर एखादी व्यक्ती अन्याय करीत असेल आणि आपण ते सहन करीत असाल, तर आपणही तेवढेच गुन्हेगार ठरतो.

वर्षाच्या अखेरीस नजरियाच्या कार्यकर्त्यांशी आढावा बैठक घेतली गेली यात. आमच्या कामाचा काय परिणाम झाला, याबाबत चर्चा केली. आम्ही जेव्हा सर्व्हे करीत होतो, तेव्हा जमात आमच्याबरोबर बोलत नव्हती आणि एखादी तक्रार असेल तरीही बोलत नव्हती आणि एखाद्या तक्रारीबद्दल आमचे मत मांडले, तर ते त्याला महत्त्व देत नव्हते. आम्हीपण ऐकत नव्हतो. जर तक्रारीबाबत जमातमध्ये महिलेला न्याय मिळाला नाही तर आम्ही पोलिस स्टेशनला जातो. दक्षता कमिटीमध्ये तक्रारी मिटवू लागलो. मग जमातकडे महिलांचे

जाणे कमी झाले. कारण, ते लोक महिलांचे मत ऐकून घेत नव्हते; पण काय झालं नवरा आहे, बाईने त्याचे ऐकायचे, पुढे पुढे बोलायचे नाही, असे त्यांचे मत असते. आम्ही ती महिला काय म्हणते, तिचे मत काय आहे, तिला काय करायचे आहे, हे पहिला विचारतो, मगच तक्रार मिटविण्यास जातो. आम्ही महिलांना त्यांचे हक्क, अधिकार त्या स्वत: मागाव्यात आणि त्यासाठी लढाव्यात अशी मदत करतो.

आता जमात आम्हाला बोलावते. आमच्याशी काही गोष्टींवर चर्चाही करते. काही ठिकाणी तर जमात आम्हाला घेऊन तक्रार मिटविते. काही महिला जमातपर्यंत जात नाहीत; पण जमातवाल्यांना जर कळाले की, त्या महिलेला त्रास होत आहे, तर त्या महिलेला त्रास होत असल्याचे ते आम्हाला सांगतात. तुम्ही काही तर करा; पण तिला न्याय मिळवून द्या, असेही सांगतात. आम्ही त्या महिलांना जाऊन भेटतो. दोघांचे मत ऐकून दोघांना समोरासमोर बसवितो आणि ती तक्रार मिटवितो. आजपर्यंत आम्ही जमातकडून आलेल्या २५ तक्रारी मिटविल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे-

१) पती-पत्नी -९ तक्रारी

२) सासू, सासरे, पती - ४ तक्रारी

३) नणंद, पती, सासू - १

४) सासू, दीर, जाऊ - २

५) मारामारी -१

६) सासू, सून - ३

७) लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसा - २

यावर्षी नजरियाने २५ तक्रारी मिटविल्या आहेत. आम्ही काम करीत असताना काही हिंदू महिलांच्या तक्रारी मिटविल्या आहेत. एका महिलेला तर आम्ही सहा लाख रुपये मिळवून दिले आहेत.

नजरिया हे आता मोठ्या प्रमाणात काम करीत आहे. इज्तेमामध्ये आम्ही महिलांना त्यांचे हक्क अधिकार याबद्दल बोलत आहे. जे कुराणने लिखित स्वरूपात आहे, त्याबद्दल बोलत आहे. आरोग्य हक्क, शासकीय योजना यावर चर्चा करतो. काही महिलांना शासकीय योजना मिळवून दिल्या आहेत.

## नजरियाचा विशेष कार्यक्रम : इफ्तार पार्टी २०१८

सहा जून २०१८ रोजी सांगली येथील बालाजीनगरमध्ये दरवर्षीप्रमाणे इफ्तार पार्टी आयोजित करण्याचे ठरले. त्याचे नियोजन करण्यासाठी मिटिंग घेण्यात आली. या मिटिंगला नजरिया उपस्थित होत्या. याअगोदरच्या इफ्तार पार्टीला महिलांसह पुरुषांनाही बोलावण्यात येत आहे; पण नजरिया स्त्रीवादी भूमिकेतून कार्य करते, म्हणून यावर्षी केवळ महिलांचीच इफ्तार पार्टी आयोजित करण्याचे ठरविले. कारण, महिलांना आपले मत मांडण्यासाठी एक व्यासपीठ तयार होईल. त्या मोकळेपणाने बोलतील. पुरुष असले की, महिला बोलताना कचरतात किंवा बोलतच नाहीत. त्यामुळे यावर्षी केवळ महिलांचीच इफ्तार पार्टी करण्याचे ठरवून त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले.

या पार्टीत महिलांना रोजाचा उपवास सोडण्यासाठी खजूर, काजू, बदाम, अंजिर, बेदाणे, फालुदा असे विविध मेनू ठेवण्याचे ठरविण्यात आले. तसेच महिलांना वजू करण्यासाठी पाणी उपलब्ध करणे, त्यासाठी बादली, मग, नमाज पठणासाठी चटई यांची सोय केली. नमाजानंतर महिलांना जेवणासाठी बिर्याणी करण्याचे

ठरविले. रावसाहेब जेवण, तर सलीम यांच्यावर फालुदा तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. उर्वरित ड्रायफ्रूट्सची बाजारातून खरेदी केली.

६ जून २०१८ रोजी सकाळी नजरियाच्या सर्व कार्यकर्त्या बालाजीनगरमध्ये आल्या. प्रथम सर्व परिसर स्वच्छ करून मंडप घालण्यात आला. नमाज पठण करताना कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये याचीही काळजी घेतली. पावसाचे दिवस असल्यामुळे महिलांची काही ठिकाणी सोय केली होती. तसेच पाऊस आला तर ऑफिसच्या मिटिंग हॉलमध्ये नमाज पठणाची सोय केली होती.

इफ्तार पार्टीसाठी येताना प्रत्येक महिला कार्यकर्त्याने सोबत तालुक्यात किमान ५ महिलांना सोबत आणण्याचे ठरविले होते. प्रथमच केवळ महिलांसाठी इफ्तार पार्टी ठेवत असल्यामुळे त्या येतील की नाही, ही शंका होती. मात्र, ३० जणी येणे अपेक्षित असताना तब्बल १०० वर महिलांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

कोणतीही गोष्ट मनापासून करावयाची हे संस्थेचे वैशिष्ट्य असल्याचे इथेही दिसून आले. इफ्तार पार्टीत महिलांना रोजा सोडण्यासाठी मोठे ताट सजविण्यात आले. ताटात काजू, बदाम, खजूर, बेदाणे, अंजिर ठेवण्यात आले. सोबत फालुदाही वाढला. दरम्यान, रोजा सोडण्याच्या अगोदर उपस्थित महिलांना 'संग्राम' संस्था आणि नजरिया काय काम करतात, याबद्दल सविस्तरपणे सांगण्यात आले. तसेच यावर्षी केवळ महिलांचीच इफ्तार पार्टी घेण्याबद्दलचे उद्दिष्ट सांगण्यात आले. महिलांनी रोजा सोडल्यानंतर नमाजपठण केले. त्यानंतर महिलांनी जेवण केले आणि कार्यक्रम संपला. सर्वांच्याच सहकार्य आणि पुढाकाराने कार्यक्रमात कोणतीही उणीव राहिली नाही. यानिमित्त नजरियाच्या कार्याची माहिती उपस्थितांना सांगण्यात आली.

■■■

# 'नजरिया' अंतर्गत कार्यक्रम













# 'संग्राम' आयोजित कॅरल सिंगिंग कार्यक्रम

१४ आणि १५ डिसेंबर २०१८

**ठिकाण :** सांगली आणि मिरज शहर परिसर

भारतीय राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला त्यांच्या व्यक्तिगत धर्माचे किंवा सांस्कृतिक जीवन, आचार, विचार पद्धतीचे आयुष्य निर्भयपणे जगण्याची मुभा दिली आहे. इतकेच नव्हे तर हे निर्भय वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारवर संविधानाने दिली आहे.

संविधानाने दिलेल्या मानवाधिकाराच्या कक्षेत प्रत्येक धर्मियाला आपल्या धार्मिक, सांस्कृतिक अभिव्यक्तीचा पूर्ण हक्क मिळतो. याच मानव अधिकाराच्या चौकटीतून 'संग्राम' संस्थेच्या वतीने ख्रिस्तीधर्मीय घेण्यात आली. संस्थेच्या कार्यकर्त्यांसह सांगली, मिरज भागातील ख्रिस्ती समाजातील लोकांबरोबरच इतरधर्मीय आणि विशेष करून कार्यक्रम ठिकाणातील सामाजिकदृष्ट्या प्रभावी आणि 'संग्राम'च्या कार्यास पाठिंबा दर्शविणाऱ्यापर्यंत पोहोचून नियोजन करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक ठिकाणी एक, दोन स्थानिक व्यक्तींची प्रमुख उपस्थिती म्हणून हजर राहण्याच्या दृष्टीने निमंत्रणे देण्यात आली.

ठरलेल्या ठिकाणी त्या विभागातील ख्रिस्ती धर्मगुरु बरोबरच नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक कार्यकर्ते, चर्च संबंधित सदस्य, सामाजिक चळवळीशी निगडीत असणारे कार्यकर्तेही सामील झाले होते. ख्रिसमसची पारंपरिकता दिसण्यासाठी कॅरल सिंगिंग करणाऱ्या ग्रुप करिता ट्रकची सोय करण्यात आली होती. त्यावर विद्युत रोषणाई केली गेली. सोबतीला संग्राम आणि संघटनातील कार्यकर्ते यांनी विशेष प्रकारे सजावट ही केली होती. स्वाध्यायनच्या मुलींना देवदूतची वेशभूषा तर मित्रा संघटनेच्या कार्यकर्ता सांताक्लॉज बनून सर्वांना शुभेच्छा देण्यात सज्य झाले होते.

या ट्रकला आकर्षक रोषणाई केली, त्यामध्ये ख्रिसमस ट्रि, फुगे, पताका यांचा वापर केला होता.

दिनांक १४ आणि १५ डिसेंबर या दोन्ही दिवशी हा कार्यक्रम घेण्यात आला. पहिल्या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिसिंह नाना पाटील चौक, विश्रामबाग येथे झाली. यावेळी सांगली जिल्हा काँग्रेस शहर कमिटीचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील उपस्थित होते. सोबत धर्मगुरु पी. बी. काळे होते. प्रार्थना करुन कार्यक्रम सुरु झाला. मा. पृथ्वीराज पाटील म्हणाले की,' संग्रामने सुरु केलेला हा कार्यक्रम उत्तम असून त्यासाठी माझ्याकडून शुभेच्छा देतो. संग्रामने अधिक एक आठवडा आनंदाचा घातला त्याबद्दल धन्यवाद. त्यानंतर जी.टी.सी. कॉयर ग्रुप, मिरजने ख्रिसमसची गीते सादर केली.

पुष्पराज चौकमध्ये सदरच्या कार्यक्रमासाठी मा. के. डी. शिंदे, जनता दल, सांगली आणि मा. अमित शिंदे, अध्यक्ष, सांगली जिल्हा सुधार समिती यांनी स्वागत आणि आपले विचार मांडले. ते म्हणाले, 'येशूचा जन्म दिवस आपण साजरा करत आहोत. संविधानाने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. आपला देश सर्व धार्मियानाचा आहे. हे धर्म ज्या ज्या देवतांवर आहे, त्या देवतांचे पुण्यस्मरण करणे, सर्व धार्मियांना आपापल्या धर्मानुसार जन्मदिवस साजरा करता येतो. त्यानुसार आज येशूच्या जन्मदिवसानिमित्त आजच कार्यक्रम आहे. ह्या देशात आपण सर्व एक आहोत. सर्व लोक, जातिधर्माचे लोक एक आहेत. येशूने ज्याप्रकारे सांगितले, करुणा आहे, शांती आहे, नैतिकता आहे, ह्या सर्व गोष्टी पाळण्यासाठी आपण जमलो आहोत. हा कार्यक्रम आयोजित केला म्हणून आनंद वाटतो. अमित शिंदे म्हणाले, 'मागच्या वर्षीपेक्षा ह्यावर्षी कार्यक्रमाची व्याप्ती वाढली आहे, ती अशीच वाढावी ही अपेक्षा.

मिशन कम्पौंडमध्ये स्थानिक ख्रिस्ती समाजातील सर्वजण एकत्रित येऊन अभियानाच्या ट्रकचे स्वागत केले आणि आपले मनोगत मांडले. यावेळी स्थानिक चर्चचे महिला मंडळ, तरुण मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. डी. ए. काळे यांनी सर्वांचे स्वागत करून कार्यक्रम आयोजित केला. आम्हा सर्वांना आज अगदीच आगळेवेगळे दिसते आहे. एक नवीन अनुभव येत आहे. असे म्हणून कार्यवाह मीना शेषू आणि संग्राम संस्थेच्या कामाबद्दल आभार मानले. मला सर्वांचे वारंवार अभिवंदन करावेसे वाटत आहे. असे ते म्हणाले. सुरुवातीला येशू जन्म दिवसाची माहिती देवून जगभरात ख्रिसमस आनंदाचा दिवस म्हणून साजरा केला जातो असे सांगितले. स्थानिक महिला मंडळातील सुषमा ननदिकर या म्हणाल्या की आज विशेष आभार मानतो की संग्राम संस्थेने आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. संग्रामचे संचालक आणि मीना शेषू यांनी देशातील विविधेतमध्ये एकता आहे. याचे प्रतीक म्हणून कार्यक्रम केला म्हणून आभार. सामाजिक बांधिलकीला पुढे नेण्याचे हे काम आहे.

लीना सावर्डेकर म्हणाल्या,'ख्रिस्तीधार्मियांना असलेले धार्मिक स्वातंत्र्य टिकण्याच्या दृष्टीने सुरू केलेला कार्यक्रम आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. सुवार्ता सांगण्यासाठी जमलेल्या सर्वांचे त्यांनी कौतुक केले आणि सर्व सहभागींचे आभार मानले.

माग्रेट देवकुळे म्हणाल्या, 'आज हा दिवस आपल्यासाठी फार मोठा आनंदाचा आहे. आमच्या आनंदोस्तावामध्ये संग्रामच्या सर्व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आणि आयोजन केले याबद्दल खूप खूप आभार. विशेष करून मीना शेषू यांचे आभार मानते.'

काँग्रेस भवन येथील कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून जयश्री मदन पाटील, ज्येष्ठ कार्यकर्त्या महिला काँग्रेस आणि माजी नगरसेविका ज्योती आदाटे हजर होत्या. त्या म्हणाल्या,' मला असे समजले होते की मागे गेल्या काही वर्षांपूर्वी असा कार्यक्रम करताना काहींनी प्रतिबंध केला होता त्यास सांगू इच्छिते की, हा आमचा देश आहे. आणि संविधानाने अधिकार दिलेले आहेत. कुणीही त्यावर प्रतिबंध घालता कामा नये. हे आपले घर आहे. आपली माणसे आहेत. म्हणून सर्वांनी एकोपाने राहिले पाहिजे. आम्ही सर्व धर्मांचे पालन आणि आदर करणार.

जयश्री पाटील यांनी 'संग्राम'ने सुरू केलेल्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. आपल्या देशात सर्व धर्मांतील लोक एकोप्याने राहतात. धर्माच्या शिकवणीप्रमाणे सर्वांनी प्रेमाने जग जिंकावे. स्टेशन चौकमध्ये पी. बी. काळे यांनी प्रास्ताविक करून गीते सादर केली गेली.

दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात मिरज येथील गांधी चौक येथे झाली. सदरच्या कार्यक्रमास स्थानिक मिरज चर्चचे धर्मगुरू एम. एम. वाघमारे आणि राष्ट्र सेवा दलाचे विकास मगदूम हे प्रमुख उपस्थित होते. वाघमारे म्हणाले, 'मिरजमध्ये हा कार्यक्रम आयोजत केला त्याबद्दल स्वागत आणि संग्रामने सर्व धर्माची सांस्कृतिक वसा जपण्यासाठी केलेले काम महत्वाचे आहे.

राष्ट्र सेवा दलाचे मगदूम यांनी सांगितली की,' चांगल्या गोष्टीचे आचरण करणे महत्त्वाचे असते. सतत वाईट गोष्टींचा मार आपल्यावर होत असतो. अशा परिस्थितीत चांगला माणूस म्हणून जगावे म्हणून सतत विचार मांडावे लागतात. वेगवेगळ्या माध्यमातून संस्कार करत असतो. प्रभू येशू आणि बुद्ध यांचे कार्य पाहता ती फक्त माणसे राहिली नाहीत, तर कालांतराने ती भगवान झाली. कारण त्यांनी सत्याचा प्रवास समजून घेतला. माणूस म्हणून काय उद्देश असावा याचा त्यांनी अभ्यास केला. माणसाप्रमाणे आजच्या जगात आपण जगत आहोत. काय याची जाणीव होण्याकरिता जागृती कार्यसाठी आजचा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. समता

येण्याचा प्रयत्न करुया. आपले सुख आपण एकमेकास वाटूया.

मिरज येथील शास्त्री चौक येथे प्रमुख उपस्थिती म्हणून संगीता हारगे, नगरसेविका, सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका यांच्याबरोबर वेश्या अन्यायमुक्ती परिषदेच्या सामाजिक कार्यकर्त्या, मीनाक्षी कांबळे हजर होत्या. संगीता हारगे म्हणाल्या, 'या कार्यक्रमाचा उद्देश फक्त 'संग्राम'चा नाही तर सर्वांचा आहे. माणुसकीधर्म जपणे गरजेचे आहे. संविधानाने दिलेला अधिकार जपण्याकरिता आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. मानवधर्माचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवूया. मीनाक्षी कांबळे म्हणाल्या, 'आम्ही 'संग्राम' संस्थेचे स्वागत करतो. आजच्या कार्यक्रमातून सर्वांपर्यंत शांततेचा संदेश देण्याचे काम आम्ही सर्वजण करीत आहोत.

कर्मवीर चौक मिरज येथील कॅरल सिंगिंगसाठी ग्रेस मेसेंजर ग्रुप सहभागी झाला होता. त्यांनी गीते सदर केली. या कार्यक्रमावेळी मा. रवींद्र फडके सर यांची विशेष उपस्थिती लाभली. ते म्हणाले, 'मानवता वाद वाढवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. माझी निवड केली कारण मी स्वताला कधी ब्राम्हण समजलो नाही. कधीही जान्हवे घातले नाही. मी स्वत:ला पहिल्यांदा माणूस समजतो. मी नमाज पढू शकतो. मी रोजा पण ठेवतो. रमजानमध्ये मी रोजा करतो. ख्रिसमसच्या वेळेस कॅरल सिंगिंगमध्ये सहभागी होतो. हिंदूंचे सण असोत, दुर्गाष्टमी असो, नवरात्र असो, सगळे आणि सगळ्यांचे सण माझे आहेत. हिंदूपण मीच आहे, मुस्लीमपण मीच आहे, ख्रिस्तीपण मीच आहे. सर्व जातीचा मीच आहे आणि मी भारतीय आहे. आपण सगळेजण एक होऊया, सगळ्या जातिपाती विसरून जाऊया. फडके सर यांच्या विचार मांडणीनंतर ग्रेस मेसेंजर ग्रुपने ख्रिसमसची गीते सादर केली आणि 'संग्राम' आयोजित कॅरल सिंगिंग कार्यक्रमाचा सांगता समारोप झाला.

**'स्त्री समाजसुधारक' पुस्तकाचे प्रकाशन**

मानवी अधिकार व सत्यशोधनाचे, माणसांमध्ये अमूलाग्र परिवर्तन घडण्यासाठी झटणाऱ्या सर्व सामाजिक क्रांतिकारकांचे जीवनकार्य आणि त्यांनी सामाजिक चळवळीतून मांडलेल्या स्त्रीकेंद्रित व स्त्रीवादी विचारांची देवाण-घेवाण करण्याच्या हेतूने 'स्त्री समाजसुधारक' पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकामध्ये लता प्रतिभा मधुकर (सामाजिक क्रांतीचा आपला इतिहास आणि वारसा), कॉ. धनाजी गुरव (बसवण्णा, शरण चळवळ आणि स्त्रिया), युवराज जाधव व मयूर खराडे (छत्रपती शिवाजी महाराजाचे स्त्रीविषयक धोरण), प्रशांत नागावकर (महात्मा ज्योतिराव फुले यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन), कॉ. रंजना कान्हेरे (सावित्रीबाई फुले (स्त्री शिक्षणाची उद्गाती), ॲड. के. डी. शिंदे (राजर्षी शाहूंची स्त्री उद्धारांची भूमिका), कॉ. धनाजी गुरव (डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रियांचे प्रश्न) या साहित्यिकांनी आपले लेखनीतून विचार मांडले आहेत. सदर पुस्तकाचा प्रकाशन सोहळा 'संग्राम'तर्फे ५ मार्च, २०१९ रोजी कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनमध्ये संपन्न झाला. डॉ. मेघा पानसरे (विभागप्रमुख, विदेशी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांच्या हस्ते, तर संस्थेच्या कार्यवाहक मीना सरस्वती सेशू यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी लेखकांनी आपापल्या लेखाविषयी मांडणी करून उपस्थितांमध्ये खुली चर्चा घडवून आणली.

■■■

# ‘संग्राम’अंतर्गत विशेष कार्यक्रम










महिला आरोग्य हक्क
कोल्हापूर
महाराष्ट्र.. सामाजिक, राजकीय वर्तमान
आणि महिलांचे आरोग्य
१५, १६ व १७ नोव्हेंबर २०१८






SANGRAM



# २०१८–१९ मधील कार्यक्रमाची आकडेवीर

**नजरिया कार्यक्रमातील आकडेवारी**

| अ.क्र. | कार्यक्रम | एकूण |
|---|---|---|
| १. | गट चर्चा | २५५ |
| २. | भेटलेल्या व्यक्तींची संख्या | १८४५ |
| ३. | महिला कार्यक्रम | ८२ |
| ४. | भेटलेल्या व्यक्तींची संख्या | १५०३ |
| ५. | इस्तमा कार्यक्रम | २४४ |
| ६. | भेटलेल्या व्यक्तींची संख्या | ३६८३ |
| ७. | हायस्कूल कार्यक्रम | ९ |
| ८. | भेटलेल्या व्यक्तीची संख्या | ३९० |
| ९. | अंगणवाडी कार्यक्रम | ७७ |
| १०. | भेटलेल्या व्यक्तींची संख्या | ४७१ |
| ११. | एएनसी – पी.एच.सी. | ९२ |
| १२. | उपस्थितांची संख्या | १०१० |
| १३. | निरोध वाटप | ० |
| १४. | जमात भेट | ७५ |
| १५. | उपस्थितांची संख्या | ५०४ |
| १६. | मदरसा भेट | ५० |
| १७. | उपस्थितांची संख्या | ५०३ |

**घरगुती हिंसा तक्रारी**

| अ.क्र. | घरगुती हिंसा | एकूण |
|---|---|---|
| १. | नवरा | २९ |
| २. | सासू आणि सासरे | ८ |
| ३. | नणंद, दीर/भावजय | ३ |
| ४. | घरातील व्यक्तीकडून | ८ |
| ५. | शेजारी–पाजारी यांच्याकडून | ७ |
| | **एकूण** | **५५** |

**घरगुती हिंसा तक्रारींचे निवारण**

| अ.क्र. | घरगुती हिंसा सोडवल्या | एकूण |
|---|---|---|
| १. | नजरिया आणि व्ही एम एम | ३२ |
| २. | जमात | १ |
| ३. | महिला दक्षता समिती | १४ |
| ४. | पीएलव्ही | ९ |
| | **एकूण** | **५६** |

**कल्याणकारी योजनांसाठी अर्ज**

| अ.क्र. | शासकीय योजना अर्ज दिले | एकूण |
|---|---|---|
| १. | संजय गांधी निराधार योजना | ५६ |
| २. | श्रावण बाल योजना | १५ |
| ३. | मतदान कार्ड | ७० |
| ४. | इंदिरा आवास योजना | ३० |
| ५. | रेशन कार्ड | ७३ |
| ६. | आधार कार्ड | १४९ |
| ७. | महात्मा फुले आरोग्य योजना | २ |
| ८. | जमात कडून स्कॉलर शिप | २ |

**कल्याणकारी योजनांचा लाभ**

| अ.क्र. | शासकीय योजना मिळवून दिल्या | एकूण |
|---|---|---|
| १. | संजय गांधी निराधार योजना | ३३ |
| २. | श्रावण बाल योजना | ७ |
| ३. | मतदान कार्ड | ६६ |
| ४. | इंदिरा आवास योजना | ३ |
| ५. | रेशन कार्ड | ७४ |
| ६. | आधार कार्ड | १५० |
| ७. | महात्मा फुले आरोग्य योजना | ३ |
| ८. | जमातकडून स्कॉलर शिप | ३ |

**कुटुंबांच्या भेटी**

| अ.क्र. | भेट | एकूण |
|---|---|---|
| १. | एकूण कुटुंब भेटी | ३३५३ |
| २. | पुरुष | ३३८१ |
| ३. | स्त्रिया | ४०९६ |
| ४. | मुले | २१०६ |
| ५. | मुली | २१४२ |
| ६. | विधवा | ३०८ |
| ७. | परित्यक्ता | ८० |
| ८. | दिव्यांग (मुले २७ + मुली २२) | ४९ |
| ९. | मतिमंद (मुले १९ + मुली १७) | ३६ |

**विद्रोही महिला मंचमार्फत राबविलेले कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रम | एकूण | एकूण |
|---|---|---|---|
| १ | महिला कार्यक्रम | ३९७ | ८९८७ |
| २ | बचत गट | २९७ | ३६३८ |
| ३ | युवक युवती | १४२ | १९०० |
| ४ | तरुण मंडळ | ९० | १११८ |
| ५ | शाळा आणि कॉलेज | २१ | १३९० |
| ६ | अशा वर्कर | १४३ | २७८४ |
| ७ | ग्रामपंचायत भेटी | १८० | ३६१९ |
| ८ | ग्रामपंचायत कार्यक्रम | ९१ | १५२८ |
| ९ | ग्रामएकता समिती मिटिंग | ८७ | ८३८ |
| १० | प्राथमिक आरोग्य केंद्र भेटी - पुरुष | २९२ | २४६८ |
| ११ | प्राथमिक आरोग्य केंद्र भेटी- महिला | | ४६९४ |
| १२ | प्राथमिक आरोग्य केंद्र भेटी- मुले | | ९११ |
| १३ | प्राथमिक आरोग्य केंद्र भेटी- मुली | | ११७७ |
| १४ | प्राथमिक आरोग्य केंद्रात गरोदर महिलांना भेटी | २६२ | ३४०० |
| १५ | निरोध वाटप | ८६० | २९३७ |
| | **एकूण** | **२८६२** | **४१३८९** |

**तक्रारी व त्यांचे निवारण**

| अ.क्र. | घरगुती हिंसा | एकूण संख्या | एकूण तक्रारींचे निवारण | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | नवऱ्याकडून | १४२ | ग्रामएकता समिती | ५२ |
| २. | सासू-सासऱ्याकडून | २९ | महिला दक्षता समिती | ३८ |
| ३. | दीर-भावजयकडून | ८ | पी.एल.व्ही. | १६ |
| ४. | कुटुंबीयांकडून | १३ | संग्राम | १०४ |
| ५. | शेजाऱ्यांकडून | २२ | न सुटलेल्या | ४ |
| | **एकूण** | **२१४** | **एकूण** | **२१४** |

**सामाजिक योजनांसाठी अर्ज**

| अ क्र. | सामाजिक योजना | 'संग्राम'कडे आलेले अर्ज | जमा केलेले अर्ज | मान्य झालेले अर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | संजय गांधी निराधार योजना | १८९ | १८९ | ७६ |
| २ | श्रावण बाळ योजना | ५७ | ५७ | ३१ |
| ३ | बाळ संगोपन योजना | ३० | ३० | १७ |
| ४ | इंदिरा आवास योजना | १४८ | १४८ | ९६ |
| ५ | रेशन कार्ड | १९८ | १९८ | १२४ |
| ६ | आधार कार्ड | ४१७ | ४१७ | ३४२ |
| ७ | महात्मा फुले आरोग्य योजना | ४१ | ४१ | २८ |
| | **एकूण** | **१०८०** | **१०८०** | **७१४** |

**विशेष कार्यक्रम**

| अ.क्र. | प्रशिक्षण, बैठका, मिटिंग | कार्यक्रम संख्या | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|
| १. | विद्रोही महिला मंच अभ्यास गट | ३ | ८९ |
| २. | ८ मार्च, जागतिक महिला दिन फेरी | ८ | ३३० |
| ३. | लोकाधारित देखरेख प्रक्रिया-राज्यस्तरीय बैठक | ३ | ८७ |
| ४. | विद्रोही चळवळ सभा | ९ | ११६७ |
| ५. | मुलींवर होणाऱ्या हिंसेविरोधी मूक निषेध | १ | ७० |
| ६. | महिला आरोग्य हक्क मिटिंग | ४ | ५५२ |
| ७. | लोक अदालत | २ | ९९ |
| ८. | डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम | १९ | १५०० |
| ९. | समभाव महोत्सव | १ | ३०० |
| १०. | रेडेड संशोधन बाबत प्रशिक्षण | १ | १०० |
| ११. | जनआरोग्य अभियान | २ | ३६ |
| १२. | ग्रामसभांमध्ये उपस्थित | ५१ | ३१०० |
| १३. | मुस्लीम अधिकार आंदोलन शिबिर | २ | १६ |
| १४. | रुग्ण कल्याण समिती बैठका | ५ | ६२ |

# संस्थेची माहिती

## १. सर्वसाधारण माहिती

**नाव** : संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम)
**स्थापना** : २७ मार्च १९८६
नोंदणीकृत ऑफिसविकास भवन शेजारी, कुंडल रोड, विटे, जि. सांगली.
**कार्यालय** : * आरोहण, घनश्याम नगर , माधवनगर रोड, सांगली, भारत. ४१६४१६
* बालजगत, पार्श्वनाथ इंग्लिश मेडियम स्कूलच्या पाठीमागे, कुपवाड रोड, बालाजीनगर, सांगली ४१६ ४१६.
**दूरध्वनी** : +९१ २३३ २३१२८६६/२३१२१९१
**ई मेल** : sangramsansthagmail.com
**वेबसाईट** : www.sangram.org

## २. अधिकृत व्यक्ती

**नाव** : मीना सरस्वती सेशू
**हुद्दा** : कार्यवाह
**ई मेल** : meenaseshu@gmail.com

## ३. नोंदणीबाबतची माहिती

**नोंदणी** : सोसायटी
**नोंदणी क्रमांक** : सोसायटी नोंदणी कायदा १८६०, महा/१५०२/सांगली
मुंबई संस्था नोंदणी कायदा १९५०, एफ/१४५६
नोंदणी दिनांक २७ मार्च १९८६ आणि ९ मे १९८६
**ठिकाण** : सांगली
**कार्यक्षेत्र** : संपूर्ण भारत

## ४. आयकर विभागांतर्गत नोंदणी

**सेक्शन '१२ ए'अंतर्गत नोंदणी** : KOP/Main - ४ /२१७ (ड/५१३) / १२८
**नोंदणी ठिकाण** : कोल्हापूर
पॅन नंबर : AAAAS1569B
टॅन नंबर : KLPS0690C

## ५. एफसीआरएअंतर्गत नोंदणी

नोंदणी क्रमांक : ०८३९६००४७ , नोंदणी दिनांक ७ मे १९८७
**कार्यक्षेत्र** : दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक

**निधी पुरवणाऱ्या संस्था**

१. एक्शन प्लस
२. अमेरिकन ज्युविश वर्ल्ड सर्विसेस (ए.जे.डब्ल्यू.एस.)
३. फंड फॉर ग्लोबल हुमन राईटस (एफ.जी.एच.आर.)
४. भारत सरकार- राष्ट्रीय आरोग्य अभियान
५. लिवाईस स्ट्रॉस फाऊंडेशन
६. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी - महाराष्ट्र सरकार
७. ह्यूमन कॅपॅबिलिटी फाऊंडेशन
८. वूमेन्स फंड आशिया
९. फंड फॉर जस्ट सोसायटी
१०. ग्लोबल अलायन्स अगेन्स्ट ट्राफिक इन वूमेन

कार्यकारी मंडळ

१. प्रभा कुलकर्णी (उद्योजिका), अध्यक्षा, डी.एस.पी. ऑफिससमोर, विश्रामबाग, सांगली.
२. सुजाता कुलकर्णी (वकील), उपाध्यक्षा, आदित्य बंगला, बालाजीनगर, कुपवाड रोड, सांगली.
३. मीना सरस्वती सेशू (सामाजिक संशोधक), कार्यवाह, आरोहण, घनश्यामनगर, सांगली
४. शीतल हरीश प्रताप (फायनान्स डायरेक्टर), खजिनदार, अक्षय अपार्टमेंट,चिंतामणीनगर, सांगली.
५. प्रतिभा मुळीक (कृषितज्ज्ञ), सदस्या, बालाजीनगर, कुपवाड रोड, सांगली.
६. सई पाटील (ब्यूटिशियन), सदस्या, 'प्रशांती', राम मंदिरजवळ, सांगली.
७. प्रिया प्रभू (डॉक्टर), सदस्या, आकाशगंगा अपार्टमेंट, कर्मवीर भाऊराव चौक, मिरज.

**मित्रा होस्टेल आणि उत्तर कर्नाटकातील कार्यक्रम**

| **नाव** | **पद** |
|---|---|
| अनिल पांढरे | मित्रा हॉस्टेल वार्डन, शिकवणी शिक्षक |
| अनसया दोडमनी | पीअर एज्युकेटर |
| दुर्गव्वा पानी | आऊटरिच वर्कर |
| हसीना मुल्ला | मित्रा होस्टेल- स्वयंपाकी |
| कल्याणी हरिजन | पीअर एज्युकेटर |
| माला हरिजन | आऊटरिच वर्कर |
| राजश्री कारिपगोळ | मित्रा होस्टेल - मदतनीस |
| रूपाली शिवने | मित्रा होस्टेल- स्वयंपाकी |
| शालव्वा सालामटप्पी | को-ऑर्डिनेटर |
| सुवर्ण इंगळगावी | को-ऑर्डिनेटर |

**नजरिया – मुस्लीम महिला संघटना**

| **नाव** | **पद** |
|---|---|
| बिस्मिल्ला हुजरे | आरोग्यसेविका |
| जाहिदा पखाली | --''-- |
| जुबेदा अत्तार | --''-- |
| पाकिजा गोदड | --''-- |
| साहिरा अत्तार | --''-- |
| शबाना मुजावर | --''-- |
| शाहीन मकानदार | --''-- |
| तबस्सुम मुल्ला | --''-- |

**वँप – तंटामुक्ती समिती सदस्या**

| **नाव** | **पद** |
|---|---|
| बंगरव्वा पुजारी | तंटामुक्ती समिती सदस्या |
| गदेव्वा म्हेत्रे | --''-- |
| हणमव्वा दोडमनी | --''-- |
| कमलव्वा म्हेत्रे | --''-- |
| कस्तुरी कांबळे | --''-- |
| महादेवी हादीमनी | --''-- |
| रेणुका कांबळे | --''-- |
| शंकरव्वा हिरामणी | --''-- |
| शोभा राजस्वामीराज | --''-- |
| सुभद्रा कांबळे | --''-- |
| सुमन कांबळे | --''-- |

**विद्रोही महिला मंच – सांगली जिल्हा अभियान**

| नाव | पद |
| --- | --- |
| अपर्णा मुजुमले | आरोग्यसेविका |
| अरुणा कदम | --''-- |
| भारती भोसले | --''-- |
| कल्पना हारणे | --''-- |
| कविता सपकाळ | --''-- |
| मीनाक्षी जगताप | --''-- |
| पौर्णिमा घागरे | --''-- |
| प्रतिभा पवार | --''-- |
| राजश्री खंदारे | --''-- |
| राजश्री वाघमारे | --''-- |
| रंजना वारे | --''-- |
| संगीता भिंगारदिवे | मुख्य महिला संघटिका |
| सपना कांबळे | आरोग्यसेविका |
| सिंधुताई पवार | --''-- |
| सुलभा होवाळे | मुख्य महिला संघटिका |
| स्वाती सवने | आरोग्यसेविका |
| उज्ज्वला सुतार | --''-- |

**टीआय – एमएसएम आणि टीजी, सांगली**

| नाव | पद |
| --- | --- |
| राजेंद्र नाईक | प्रोजेक्ट डायरेक्टर |
| राजेंद्र पाटील | प्रोजेक्ट मॅनेजर |
| रावसाहेब मोरे | सल्लागार |
| महादेव कोळी | एम.इ.ए. |
| इम्तियाज हकीम | आऊटरिच वर्कर |
| अस्लम मुलाणी | पीअर एज्युकेटर |
| मीरासाहेब कांबळे | --''-- |
| माणिक माळी | --''-- |
| उत्तम इंगळे | --''-- |
| नागेश हेगडे | --''-- |
| मुस्कान शेख | --''-- |
| अक्षता रणखांबे | --''-- |

**सीसीटीआय, सातारा**

| नाव | पद |
|---|---|
| दुर्गा पुजारी | प्रोजेक्ट डायरेक्टर |
| निलव्वा सिद्धरेड्डी | प्रोजेक्ट मॅनेजर |
| सुजाता जाधव | सल्लागार |
| प्रशांत भोसले | एम.इ.ए. |
| अमर भोंडवे | आऊटरिच वर्कर |
| अमोल साळुंखे | --''-- |
| मलाव्वा नड्गेरी | पिअर एज्युकेटर |
| रेखा शिंदे | --''-- |
| अंबरनाथ चव्हाण | --''-- |
| छाया जाधव | --''-- |
| आनंदा चव्हाण | --''-- |

**टीआय, मिरज**

| नाव | पद |
|---|---|
| महादेवी मादर | प्रोजेक्ट डायरेक्टर |
| मीनाक्षी कांबळे | प्रोजेक्ट मॅनेजर |
| सुभद्रा केंगार | सल्लागार |
| पूजा काळे | एम.इ.ए. |
| भारती कांबळे | आऊटरिच वर्कर |
| रेणुका काळे | पीअर एज्युकेटर |
| वैशाली खुडे | --''-- |
| बिराप्पा मकानी | --''-- |
| बसव्वा कांबळे | --''-- |
| शारदा कांबळे | --''-- |
| लता निकम | --''-- |
| पात्राबाई वाघमारे | --''-- |
| जयश्री कोळी | --''-- |
| सुरेखा कांबळे | --''-- |

**टीआय, कोल्हापूर**

| नाव | पद |
|---|---|
| अफझल बारस्कर | आऊटरिच वर्कर |
| महेश रावल | --''-- |
| इस्माईल शेख | -- |

**टीआय, सांगली**

| नाव | पद |
|---|---|
| चंदा वजने | प्रोजेक्ट डायरेक्टर |
| सुशीला मुदेनाव्वर | --''-- |
| महेश मनोजी | प्रोजेक्ट मॅनेजर |
| संजय यमगर | एम.इ.ए. |
| कविता माळी | सल्लागार |
| दीपक मोटे | ७आऊटरिच वर्कर |
| माया गुरव | --''-- |
| रोशनी काटे | --''-- |
| अंजना मडे | पीअर एज्युकेटर |
| मालन पुजारी | --''-- |
| महादेवी पुजारी | --''-- |
| सपना चंदनशिवे | --''-- |
| तयाव्वा कोपद | --''-- |
| मंजू सोरगावी | --''-- |
| शोभा गत्ते | --''-- |
| सुमन पाटील | --''-- |
| सुनीता कांबळे | --''-- |
| कितेव्वा गणेचारी | --''-- |
| किरण पवार | --''-- |
| शुभांगी साळुंखे | --''-- |

**स्वाध्यायन**

| नाव | पद |
|---|---|
| बिस्मिल्ला शेख | केयर टेकर |
| माया गुरव | को-ऑर्डिनेटर |
| मयुरेश अभ्यंकर | शिकवणी शिक्षक |
| नेहा भोसले | --''-- |
| वैशाली सावंत | --''-- |
| वैभव पाटील | --''-- |
| उर्मिला कुलकर्णी | --''-- |
| आशिष चौगुले | --''-- |
| योजना चौगुले | --''-- |
| महावीर तेरदाळ | --''-- |
| नितीन आवळे | --''-- |

**वँप इन्स्टिट्यूट**

| नाव | पद |
|---|---|
| राजेंद्र नाईक | कम्युनिटी को-ऑर्डिनेटर |
| किरण देशमुख | --''-- |
| नेहा चटोपाध्याय | ॲडमीन ऑफिसर |
| एमन खान | प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर |

**नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स, केरळ व परभणी**

| नाव | पद |
|---|---|
| जसिमा एन | कम्युनिटी को-ऑर्डिनेटर |
| ललिता साथीसन | --''-- |
| अंबिका सावित्री | सल्लागार |
| मीना धापसे | कम्युनिटी को-ऑर्डिनेटर |
| कमला बागील | आऊटरिच वर्कर |
| सीमा शर्मा | --''-- |

**लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकल्प, सांगली आणि कोल्हापूर**

| नाव | पद |
|---|---|
| गौतम कांबळे | जिल्हा समन्वयक |
| शिवाजी गुरव | तालुका समन्वयक |
| लता पाकले | ब्लॉक फॅसिलिटेटर |
| सुरेखा निंबाळकर | --''-- |
| काशिनाथ मोरे | --''-- |
| गीता चव्हाण | --''-- |
| योगेश सनदी | तालुका समन्वयक |

**लोकाधारित देखरेख आणि नियोजन प्रकल्प, सांगली**

| नाव | पद |
|---|---|
| प्रशांत भोसले | जिल्हा समन्वयक |
| अलका पाटील | तालुका समन्वयक |
| सविता जाधव | ब्लॉक फॅसिलिटेटर |
| अनिता लोहार | --''-- |
| दीपाली भोसले | --''-- |

**वँप संघटना मेंबर**

| नाव | पद |
|---|---|
| जया जाधव | वँप संघटना मेंबर |
| महानंदा ममदापूर | --''-- |
| मंजू सोरगावी | --''-- |
| संगीता मनोजी | --''-- |
| सत्याव्वा म्हेत्रे | --''-- |
| सुनील तेरदाळे | --''-- |
| सुनीता शिनालकर | --''-- |

**'संग्राम' कोअर टीम**

| नाव | पद |
|---|---|
| मीना सरस्वती सेशू | कार्यवाह |
| शीतल प्रताप | फायनान्स डायरेक्टर |
| शशिकांत माने | एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर |
| शांतिलाल काळे | ॲडमिन डायरेक्टर |
| रूपाली काळे | अकाऊंट असिस्टंट |
| आरती पै | डायरेक्टर- कसम (पॉलिसी युनिट) |

■■■

---

## अहवाल तयार करणाऱ्यांची नावे

✻ **विद्रोही महिला मंच** : यशोदा न्यायनीत, संगीता भिंगारदेवे, सुलभा होवाळे

✻ **वँप** : किरण देशमुख, संगीता मनोजी, मीनाक्षी कांबळे, रेणुका काळे, माया गुरव

✻ **मुस्कान** : राजेंद्र पाटील, अमर भोंडवे, अमोल साळुंखे, अमृता सुतार

✻ **टीआय** : महादेव कोळी, कविता माळी, सुभद्रा केंगार, सुजाता जाधव, रावसाहेब मोरे

✻ **सीबीएम** : योगेश सनदी, शिवाजी गुरव, लता पाकले, प्रशांत भोसले, अलका पाटील

✻ **नजरिया** : शाहीन मकानदार, जुबेदा अत्तार

✻ **मित्रा** : राजेंद्र नाईक, माया गुरव, भारती कांबळे, महेश मनोजी, दीपक मोटे

'समाज बदलला जाऊ शकतो, यावर लोकांनी विश्वास ठेवला पाहिजे, अशी 'संग्राम'ची भूमिका आहे. अन्य लोकांच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या मूठभर कार्यकर्त्यांपूर्ता हा प्रश्न मर्यादित नाही. ज्याला समाजबदलाची निकड मनोमन पटते, त्याने आपल्या अधिकारांसाठी सक्षमतेने लढले पाहिजे.' हे विचार घेऊन समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काम करता करता 'संग्राम' संस्थेने रौप्यमहोत्सव वर्षात पदार्पण केले.





## संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम)

**स्थापना** : २७ मार्च १९८६

**नोंदणीकृत ऑफिस** :

विकास भवन शेजारी, कुंडल रोड, विटे, जि. सांगली.

**कार्यालये**

१) आरोहण, घनश्यामनगर, माधवनगर रोड, सांगली– ४१६ ४१६.

२) बालजगत, पार्श्वनाथ इंग्लिश मीडिअम स्कूलच्या पाठीमागे, कुपवाड रोड, बालाजीनगर, सांगली – ४१६ ४१६.

दूरध्वनी +९१ २३३ २३१२८६६/२३१२१९१

ई मेल : sangramsanstha@gmail.com

वेबसाईट : www.sangram.org